# माणूस

शनिवार । ५ फेब्रुवारी १९७७ । साठ पैसे

भांडवलशाही मनोवृत्तीची वगैरे असली तरी अमेरिकन जनताही राजकारणातले काही नैतिक आदर्श उराशी बाळगून होती. निक्सनने या आदर्शांना धक्का दिला. त्यामुळे त्याची राजकीय धोरणे अमेरिकेच्या दृष्टीने फायदेशीर असूनही सर्वसाधारण अमेरिकन जनतेला मात्र तो नकोसा झाला. त्याला सत्ता सोडावी लागली. . . .

या साऱ्या इतिहासावरून भारतीय जनतेला काही बोध घेण्यासारखा आहे काय ?



## अशी चौकशी, अशी फाशी !

लवकरच पूर्ण होत असलेली लेखमाला

पृष्ठ ९ ते २४

**साप्ताहिक माणूस**

वर्ष सोळावे – अंक छत्तिसावा

५ फेब्रुवारी १९७७

मूल्य साठ पैसे

संपादक
**श्री. ग. माजगावकर**
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

□

वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये

□

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

□

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

□

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

□

दूरध्वनी : ४३४५९

□

# सर्कस अखेर संपली ?

नकली तोफांच्या आवाजाने
बँडच्या जयघोषात सुरू झालेली
एक सर्कस आज संपली आहे.
विदुषकांच्या माकडचेष्टा आणि
माकडांच्या विदुषकी नकला
आज अखेर संपुष्टात आल्या आहेत.
दोरावरून झोके घेणारे,
एकचाकी सायकलस्वार
आज अखेर खाली आलेत.
आता हत्ती स्टुलावर बसणार नाहीत
वाघ-शेळी एकत्र जेवणार नाही
छातीवर कुणी दगड फोडणार नाहीत
वाघ-सिंह रिंगमास्टरच्या तावडीतून सुटले,
आता कुणी चाबूक उडवणार नाहीत.

अहो ! सर्कस संपुष्टात आली.
प्रेक्षकांनो निराश होऊ नका
नुसती सर्कस पाहून पोट भरू नका.
सुबुद्ध प्रेक्षकांनो, आमची एकच विनंती हाय
अशी सर्कस आता परत भरवू नका.
विदुषकांना फाजील चाळे करू देऊ नका.
पुन्हा सर्कस भरली तर
तेच विदुषकी चाळे पुन्हा केले तर
मग मात्र तुमची सुटका नाय !
आयुष्याची बहुमोल क्षणे
सर्कसच्या तंबूत व्यतीत करण्यापलिकडे
तुमच्या हातात काही राहणार नाय !

लक्षात ठेवा, सर्कस आता संपली हाय !

—एस्. एस्. रावळे

# इये मिसाचिये नगरी

**' चांगले झाले असता जे उड्या मारतात, तेच वाईट झाले असता का रडू लागतात ? का दुःखीकष्टी होतात ?**

—कुरल : सर्ग ३८

## ☐ कलंक शोभा

महान दाक्षिणात्य संत तिरुवरलुवर हा भारतीय होता. त्याने भारतात सर्वत्र उड्या मारणारे लोक पाहिले. हेच लोक कालांतराने दुःखीकष्टी झालेलेही पाहिले तेव्हा त्याला हे दोन प्रश्न पडले. परंतु या प्रश्नांची उत्तरे काही या संताला देता आली नाहीत. परवा (तसा महिना झाला, पण ही म्हणायची एक पद्धत) हरिश्चंद्र बिराजदार या पैलवानाने, बेळगाव मुक्कामी सत्पाल या पैलवानाला चीतपट मारले; तेव्हा आम्ही अनेक लोक उड्या मारताना पाहिले ! पुण्या–मुंबईतील वृत्तपत्रांनी मथळे दिले– ' महाराष्ट्राचा कलंक धुऊन निघाला !' कलंक कधी निर्माण झाला, हे आम्हाला कळलेले नसल्याने, तो धुऊन निघाल्याची बातमी वाचताना सुखद धक्का बसला. बेळगाव कर्नाटकात आहे, हा मुळात महाराष्ट्रावरचा कलंक आहे, असे सर्व संयुक्त महाराष्ट्राचे मत असताना, बेळगावात महाराष्ट्राचा कलंक धुण्याची ' हरिविजयाची ' कथा घडली, यावरून बेळगाव महाराष्ट्रात येणे किती इष्ट आहे, हे आमच्या लक्षात आले. तुमच्या बहुधा आले नसेल !

एखाद्या मराठी मल्लाला उत्तर भारतीय मल्लाने कुस्तीत मारले तर तो जर कलंक असेल, तर दिल्ली, कलकत्ता व मद्रास या तीन ठिकाणी इंग्लिशांकडून भारताच्या क्रिकेटचे जे तीन वेळा पानपत झाले, त्यामुळे निर्माण झालेली ' कलंकशोभा ' किती अवर्णनीय असेल, नाही का ? भारतीय संघात महाराष्ट्राचे तीन-चार कलंक, कर्नाटकचे तीन-चार कलंक, तामिळनाडूचा एक कलंक आणि उत्तर भारतावरचे दोन-तीन कलंक समाविष्ट आहेत. पुन:पुन्हा इंग्लिश संघाने भारतीय संघालाच ' धुतल्यामुळे ' हा ' अखिल भारतीय कलंक ' आता कसा धुऊन काढायचा, हा निवडसमितीपुढे प्रश्न पडलेला आहे !

सध्या भारतीय क्रिकेटला लाभलेली निवडसमिती ही एक अफलातून समिती आहे. राखीव खेळाडूला देखील ते परस्पर डच्चू देतात. आलटून पालटून काही खेळाडूंना पैसे वाटप करणे, ही गोष्ट समितीला महत्त्वाची वाटत असावी, वेस्ट इंडीजविरुद्ध आणि परदेशात काहीही करू न शकलेला खेळाडू पार्थसारथी शर्मा हा दोन कसोटीत खेळतो; कारण तो निवडसमितीशी संबंधित कुणाचा तरी जावई आहे आणि डावखोरा फलंदाज-गोलंदाज करसन घावरी, दोन्ही डावात नाबाद असूनही पुढच्या कसोटीत गाळला जातो. का ? नाबाद राहिला म्हणून ? जो नियम शर्माला तो हेमंत कानिटकरला का लावत नाहीत ? महाराष्ट्रावरचा हा आणखी एक कलंक कुणाला कसा दिसत नाही ? हा कोळसा उगाळावा तेवढा काळाच आहे. पण भारतीय क्रिकेटवरचा अखिल भारतीय कलंक धुतल्याशिवाय–सध्या रडत असलेली आणि दुःखीकष्टी झालेली क्रिकेटप्रेमी जनता उड्या मारू लागणे कठीण आहे.

काही तरी ताबडतोब केले पाहिजे. आपले खेळाडू काय दर्जाचे आहेत, ते सर्वांना ठाऊक आहे. तेव्हा जनतेने उड्या माराव्या, यासाठी आपल्याला एक करता येईल. मुंबईचा कसोटी सामना सुरू होण्यापूर्वी तरी निदान–टोनी ग्रेग, एमिस, नॉट आणि लिव्हर या चार जणांना मिसाखाली पकडावे. का पकडले, गुन्हा काय, हे सांगण्याची जबाबदारी कुणावर राहणार नाही. मग होऊ द्या सामना म्हणावं ! नाही आपण जिंकलो, तर आम्ही लिहिणं सोडू. *

## ☐ श्रद्धा नेहमी अंध असते

महामंत्री इंदिराजी कुंभमेळ्यात गेल्या व त्यांनी तिथे भाषण केले. या भाषणात त्यांनी कुंभमेळ्यात जमलेल्या सर्व साधूंना उपदेश केला–

' जनतेतील अंधश्रद्धा निर्मूलनासाठी साधूंनी मदत करावी. '

भारतात साधू किती आहेत, कुणास ठाऊक ! आमच्या ओळखीचा एकच आहे. अरुण साधू ! पण हा कादंबरीकार आणि पत्रकार आहे. परंतु नुकतेच वाचले की, कुंभमेळ्यालाच मुळी ४०,००० साधू जमले होते. साधू सदानंद, साधू शांतानंद, साधू भजनानंद, साधू सुधानंद, साधू चेतनानंद– जिकडे पाहावे तिकडे आपले साधू. अगदी आनंदी आनंद गडे–इकडे तिकडे चोहीकडे. म्हणजे भारतात किमान एक लाख साधू नक्कीच आहेत. वयोवृद्ध झालेले साधू कुंभमेळ्याला आले नसतील. काहींना प्रवासखर्च परवडला नसेल. काही अजून सुटले नसतील. पण आहेत ! साधू खूप आहेत, याचा आम्हाला विलक्षण आनंद झाला.

आता हे सर्व साधू कुंभमेळ्याला जमले, ते गंगा-यमुना संगमावर स्नान केले तर सर्व पापे जळून जातात या श्रद्धेमुळे. साधू झाले तरी काही लहानसहान पापे केल्याशिवाय हल्ली कुणाला जगता येते का ? तर यासाठी साधूंनाही पापक्षालनासाठी अधूनमधून श्रद्धापूर्वक संगमाचे स्नान करावे लागते, यात आक्षेपार्ह काही नाही. तर असे हे लाखो साधू अंधश्रद्धा दूर करायला मदत करतील का ? हा मुख्य प्रश्न आहे.

इतके साधू अंधश्रद्धा दूर करायला लागले तर वर्षभरात भारतातील सर्व अंधश्रद्धा दूर होतील. पण मग या साधूंनी करायचे काय ?

श्रद्धेला अंध म्हणण्यात काही अर्थ नाही म्हणा ! श्रद्धा ही अंधच असते. म्हणून तर तिला श्रद्धा म्हणतात ! तेव्हा तमाम साधूंना सतत या नव्या कार्यक्रमात गुंतवण्यासाठी, जशा एका बाजूने जुन्या अंधश्रद्धा दूर होतील, तसतशा नव्या नव्या अंधश्रद्धा निर्माण करण्याचे कामही कुणाला तरी करावे लागेल.

आनंदाची गोष्ट म्हणजे अशा श्रद्धा निर्माण होत आहेत. साधूंना कामच नाही; अशी स्थिती कधीही निर्माण होणार नाही. संजय गांधी यांनी छोटी मोटारगाडी तयार केलीसुद्धा, अशी श्रद्धा निर्माण झालेली आहे. नंदिनी सत्पथींना संजय गांधींनी हाकलले, मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष पटेल यांना संजय गांधींनी राजीनामा द्यायला लावला, संजय गांधी हे युवाशक्तीचे प्रतीक आहेत, अशा अनेक श्रद्धा केवळ एका संजयभोवती उत्पन्न करण्याचे काम सुरू आहे. मुंबईत आता भिकारी नाहीत, अभ्यंकर खून खटल्याचे सर्व गुन्हेगार पोलिसांनी पकडलेले आहेत, अशा कितीतरी श्रद्धा अगदी अंधश्रद्धा म्हणून लोकांनी केव्हाच पत्करल्या आहेत.

मात्र ह्यात साधूंनी एक लक्षात ठेवायचे की, मागील लोकांनी निर्माण केलेल्या अंधश्रद्धा दूर करण्याचीच त्यांनी सहयोग द्यायचा आहे. नव्याने निर्माण होणाऱ्या अंधश्रद्धा दूर करण्याचे काम पुढच्या पिढीतले साधू करतील, कारण समाजात अंधश्रद्धा असल्याशिवाय साधूंचा उपयोग नाही. आणि साधू असायचे तर अंधश्रद्धा हव्यात ! हे दुष्टचक्र आहे. पण चक्र आहे हे महत्त्वाचे. कारण अशा चक्रावरच ' कुंभमेळे ' तयार होतात.

**भलत्या चाकावरती वेसी**
**साधूंना आकार '××रे' तू वेडा कुंभार!**

# मुक्काम पुणे

मुकुंद मणूरकर

## □ धारियांची उमेदवारी

अखेर जनता पक्षातर्फे पुण्यातून मोहन धारियांची उमेदवारी जाहीर केली गेली आणि धारिया जनतापक्षातर्फे उभे राहणार की नाही यासंबंधीच्या शंकाकुशंका दूर झाल्या.

जनता पक्षाच्या उपाध्यक्षांनी ही घोषणा परवा दिल्लीहून केली. या घोषणेआधी दोन तीन दिवस आधी वर्तमानपत्रात बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या की, धारिया कुठल्याही पक्षातर्फे उभे न राहता केवळ 'जनतेचे उमेदवार' म्हणून निवडणूक लढविणार आहेत. 'निकटवर्तीयां'चा हवाला देऊन प्रसिद्ध झालेल्या या बातम्यांनी अनेक लोक अस्वस्थ झाले होते. गेली काही वर्षे राजकीय रंगमंचावर धारियांच्या बरोबरीने वावरणारे धारियांचे खास मित्र चंद्रशेखर हे तर जनता पक्षाच्या केंद्रिय समितीवर गेले होते. या पार्श्वभूमीवर धारियांची अपक्ष म्हणून निवडणूक लढविण्याची घोषणा गोंधळात टाकणारी होती.

तसं म्हणायचं झालं तर जनता पक्षाची अधिकृत उमेदवारी न स्वीकारता निवडणूक लढविणे हा प्रकार धारियांना जरा जडच गेला असता. खासदारपदासाठी लागणारे कमाल गुण धारियांजवळ वादातीतपणे असले तरी अपक्ष म्हणून (कुठल्याही पक्षाच्या सक्रीय पाठिंब्याविना) लोकसभेची निवडणूक लढविणे ही गोष्ट नक्कीच विचार करायला लावणारी होती. पण या सर्व प्रकरणावर आता पडदा पडला आहेच. शिवाय जनता पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश समितीवरही धारियांची नेमणूक झाली आहे.

पुण्याच्या या निवडणुकीत सर्वात पंचाईत जर कुणाची होणार असेल तर ती कॉंग्रेसचीच हे नक्की. धारियांविरुद्ध प्रचार मोहीम आखताना कॉंग्रेसला आपलं सर्वस्व पणाला लावावं लागणार आहे. मागच्या लोकसभेच्या निवडणुकांचे वेळी 'धारिया मित्रमंडळ' म्हणून शहरात अनेक मंडळे स्थापन झाली होती. या सर्वांशी धारियांचे संबंध खोलवर रुजलेले आहेत. शिवाय पी. एस्. पी. मधून कॉंग्रेसमध्ये धारियांबरोबर (केवळ धारियांसाठी म्हणून) गेलेला एक मोठा गट अजून कॉंग्रेसमध्येच आहे. त्या लोकांना धारियांविरुद्ध प्रचार करणे किती अवघड ठरणार आहे याची कल्पनाच केलेली बरी. कॉंग्रेसचा उमेदवार कोण यासंबंधी अजून नक्की काहीच अंदाज लागत नाही. श्रीकांत शिरोळे आणि वसंत थोरात यांच्याखेरीज कुणासाठीही कुणीही विशेषसा आग्रह धरताना दिसत नाही. 'केसरी'चे संपादक जयवंतराव टिळक यांच्या नावाची चर्चा काहीजण करीत आहेत. गेली काही वर्षे कॉंग्रेसच्या निष्ठावान प्रचारकाची भूमिका 'केसरी' प्रामाणिकपणे बजावीत आहे ही गोष्ट आणि जयवंतरावांचे दिल्ली दरबारी असणारे वजन पाहता ही जागा त्यांना मिळण्याची शक्यता अगदीच काही डावलता येत नाही.

महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसने केलेल्या शिफारशीत दिल्लीतून बरेच फेरफार होतील या आशेवरही काही कॉंग्रेसची मंडळी असून त्यांच्या दिल्लीच्या वाऱ्याही सुरू झाल्या आहेत. दरम्यान महाराष्ट्र प्रदेश युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष उल्हास पवार यांनी महाराष्ट्राच्या अस्थायी समितीत युवक कॉंग्रेसला प्रतिनिधित्व न दिल्याबद्दल उघडउघड नाराजी व्यक्त केली आहे. सध्याच्या कॉंग्रेमध्ये युवकांचा असलेला सक्रीय सहभाग लक्षात घेता जेष्ठ नेत्यांनी युवक कॉंग्रेसला अशा तऱ्हेने डावलायला नको होतं असं त्यांचं म्हणणं. युवक कॉंग्रेसला महाराष्ट्रातील अठरा जागा मिळाव्यात असा आग्रह युवक कॉंग्रेसने धरला असून उमेदवारांची यादी करण्यासाठी उल्हास पवारांच्या नेतृत्वाखाली पाच जणांची समितीही नेमली आहे. आणि या त्यांच्या हालचालीला धक्का देणारी बातमी गेल्याच आठवड्यात प्रसिद्ध झालीय. अखिल भारतीय युवक कॉंग्रेसच्या अध्यक्षा श्रीमती अंबिका सोनी यांनी असं सांगितलंय की विद्यमान कॉंग्रेस खासदार असलेल्या मतदारसंघात युवक कॉंग्रेस उभी रहाणार नाही. उलट जिथे विरोधी खासदार आहेत अशाच जागा युवक कॉंग्रेसला हव्यात. हे मान्य केल्यावर मग युवक कॉंग्रेसला महाराष्ट्रात फक्त एकच जागा मिळू शकेल. अर्थात यासंबंधीचे चित्र सहा-सात फेब्रुवारीशिवाय काही स्पष्ट होणार नाही.

या उलट जनता पक्षाने केवळ आठवडाभरात मारलेली मुसंडी आश्चर्यकारक ठरावी. बहुतेक राज्यातील प्रदेश समित्याही स्थापन झाल्या असून येत्या आठवड्यात उमेदवारांची घोषणा होईल. महाराष्ट्रातील उमेदवारांची यादी अजून बाहेर पडली नसली तरी मोहन धारिया व मधु दंडवते यांच्या उमेदवारीची अधिकृत घोषणा एस्. एम्. जोशींनी केलीय. धारियांच्या निवडणूक प्रचाराचा नारळ एक फेब्रुवारीला जगन्नाथराव जोशांच्या हस्ते फुटणार आहे.

एकूण धारियांच्या उमेदवारीखेरीज निवडणूकीच्या दृष्टीने निर्णयाप्रत असं काहीच या आठवड्यात निष्पन्न झालं नाही. शिवसेनेने धारियांना चाचपडत दिलेला पाठिंबा, शे. का. पक्षाची पुण्याची निवडणूक लढविण्याची तयारी, बऱ्याचशा चर्चा, बैठका, चाचपणी आणि अंदाज यातच हा आठवडा संपून गेलाय. □

## □ महापालिकेच्या क्रीडास्पर्धा

पुणे महानगरपालिका येत्या आठवड्यात खोखो व कबड्डीच्या अखिल भारतीय पातळीवरील स्पर्धा भरवत आहे. नुकत्याच नागपूर येथे झालेल्या अ. भा. महापौर परिषदेत, महापालिकांनी क्रीडास्पर्धा आयोजित कराव्यात असा जो ठराव केला त्याच्याशी हे सुसंगत आहेच शिवाय या खेळांच्या विकासासाठी शासकीय पातळीवर उचललेले पाऊल या दृष्टीने हे अभिनंदनीयही ठरावे.

कबड्डीच्या स्पर्धा काही महानगरपालिका पूर्वीपासूनच भरवत आहेत. पण खोखोची स्पर्धा भारतीय स्तरावर भरविण्याचा प्रथम मान पुणे महानगरपालिकेनेच मिळविला आहे. मध्यंतरी नवमहाराष्ट्र खोखो संघाच्या एका समारंभात महापौर शिवाजीराव भोसल्यांनी खोखोच्या स्पर्धा भरविण्याची घोषणा केली होती. आज ती प्रत्यक्षात येत आहे ती केवळ महाराष्ट्र राज्य खोखो संघटनेचे सरचिटणीस सुनील तांबे व इतर अनेक कार्यकर्ते यांच्या उत्साही आग्रहामुळेच! नेहरू स्टेडियमवर होणाऱ्या या स्पर्धेतून भारतातील नामवंत खेळाडूंचा खेळ पहाण्याची संधी पुणेकरांना मिळणार आहे. खोखोमध्ये गेली अनेक वर्षे निर्विवादपणे व कबड्डीत सध्यातरी पुण्याच्याच संघाचे वर्चस्व असल्यामुळे या स्पर्धा पुणेकरांच्या दृष्टीने अभिमानास्पदही ठराव्यात.

एकंदरीत या स्पर्धा व मे महिन्यात होणाऱ्या साहित्य संमेलनासाठी दिलेलं घवघवीत अनुदान या गोष्टीमुळे महापालिकेने पुणे शहराची सांस्कृतिक क्षेत्रातील मान नक्कीच उंचावली आहे! □

'एन्कौंटर' मासिकाच्या नोव्हेंबर १९७६ या महिनाअंकात प्रसिद्ध झालेल्या निराद चौधरी यांच्या 'Why Indira Rules' या मूळ प्रदीर्घ इंग्रजी लेखाचा संक्षिप्त अनुवाद

# इंदिरा गांधींच्या सत्तेचे रहस्य काय ?

श्री. मा. भावे

१९४७ पासून भारतात चालत आलेले राजकारण सर्वांना माहीत आहे. त्याचे सूक्ष्म परीक्षण केले तर असे दिसून येईल की, श्रीमती गांधींची राजवट आणि नेहरूंची राजवट यात मूलतः फरक नाही. श्रीमती गांधींचे राज्य हे नेहरू-राज्याचेच किंचित विकृत आणि परिणत रूप आहे. कसे ते पाहा.

स्वातंत्र्यकालाच्या सुरुवातीपासूनच मी असे म्हणत आहे की, ही नेहरूंची एकमुखी सत्ता आहे. नेहरूंच्या उदार मतांमुळे तिचे खरे रूप अस्पष्ट झाले आहे, इतकेच. मे १९५३ मध्ये 'इलस्ट्रेटेड वीकली'त लिहिलेल्या लेखात मी स्पष्ट लिहिले होते की, नेहरू-सरकार म्हणजे जनतामान्य हुकुमशाहीच आहे. नेहरूंच्या सत्तेचे विश्लेषण करताना मी तीन मुद्द्यांवर भर दिला होता : (१) गांधीजींचे वारस म्हणून नेहरूंच्या भोवती असलेले वलय. एखाद्या धर्मपीठावर गुरुमागून शिष्य बसला की, त्या पीठाची प्रतिष्ठा शिष्याला आपोआपच प्राप्त होते. नेहरूंच्या बाबतीत तोच प्रकार थोडाफार फरकाने झाला. (२) नेहरूंचे पाश्चात्य शिक्षण आणि सामाजिक दर्जा यामुळे उच्च सरकारी अधिकाऱ्यांना ते परके वाटत नसत. (३) परदेशांत त्यांना मिळणारा मान. या तीनही गोष्टी ज्याच्या ठिकाणी एकवटल्या आहेत, असा दुसरा मनुष्य त्या वेळी दृष्टिपथात नव्हता. साहजिकच नेहरू म्हणतील ती पूर्व दिशा अशी परिस्थिती झाली.

असे होणे ही काळाचीच गरज होती; कारण प्रगतिशील शासन-संस्था अस्तित्वात येण्यासाठी जे नैतिक आणि वैचारिक वातावरण लागते त्याचा पूर्ण अभाव १९४७ साली भारतात होता. जी काही आर्थिक आणि राजकीय विचारसरणी अस्तित्वात होती ती अतिशय उथळ आणि उमनी होती. भारतातील आर्थिक आणि राजकीय स्थितीचा वस्तुनिष्ठ विचार भारतीय बुद्धिमंतांनी कधी केलाच नाही. जो काही विचार होत असे तो इंग्रजांवर दोषारोप करण्यासाठी खर्ची पडे. त्यामुळे मूलभूत विचारांवर अधिष्ठित असे राजकीय पक्ष अवतरणे अशक्यच होते. उरता उरला एकच वाद, तो म्हणजे राष्ट्रवाद. राष्ट्रवादावर उभारलेला पक्ष एकमतानुवर्ती असणार हे स्वाभाविकच आहे.

तिसरे असे की, भारतासारख्या देशात शासनाचा आधार मुलकी व लष्करी नोकरवर्ग हाच असतो. ब्रिटिशांनी जोपासलेली ही नोकरशाही कोणत्याही तात्त्विक विचारांपासून पूर्णतः अलिप्त होती. आपल्या ऐषारामापलीकडे ती कशाचीच दखल घेत नसे. ही वैचारिक पोकळी भरून काढील असा एकच पर्याय होता; तो म्हणजे व्यक्तिपूजा.

सारांश, भारतात एकमुखी सत्तेशिवाय दुसऱ्या कोणत्याच प्रकारचे शासन येणे शक्य नव्हते. जो माणूस सत्तेवर येईल त्याच्याभोवती नैतिक वलय असणे अवश्य होते. नेहरूंखेरीज असा दुसरा माणूस दिसत नव्हता. साहजिकच नेहरूंची एककेंद्री राजवट सुरू झाली. त्या राजवटीचे हे स्वरूप नेहरूंखेरीज प्रत्येकाला माहीत होते.

नेहरूंनाही हे कळले नसते असे नाही. परंतु वस्तुस्थिती, विचार आणि वर्तन यांची सांगड घालणे भारतीय विचारवंतांना कधीच जमत नाही. त्यामुळे झाले असे की, नेता तर हवा आहे, नेहरूंशिवाय दुसरा कोणी नेता दिसत नाही आणि तरी लोकशाहीची पोपटपंची चालूच आहे. अशा रीतीने भारतीय राजकारणाचा प्रवाह पोकळीच्या दिशेने नेहरूयुगात वाहत चालला होता. नेहरूंची उदार सत्ता नाहीशी झाल्यावर कन्येने ती पोकळी भरून काढली. ती कशी, तेच आता पाहायचे आहे.

### श्रीमती गांधींचा उदय

फ्रान्सच्या राजकीय क्षितिजावर नेपोलियनचा उदय कसा झाला, याविषयी अजून पुस्तके लिहिली जातात. तसेच एखादे पुस्तक श्रीमती गांधींच्या उदयाविषयीही लिहिले जाईल. नेपोलियनने दुष्कीर्त राजकीय नेत्यांना दूर करून सत्ता मिळविली. श्रीमती गांधींनी तसेच केले. नेपोलियनजवळ पूर्वकर्तृत्व, बुद्धिमत्ता आणि राष्ट्रीय आकांक्षा पूर्ण करण्याचे सामर्थ्य होते. श्रीमती गांधींजवळ यांतील कोणकोणत्या बाबी आहेत ?

नेहरू वारले तेव्हा श्रीमती गांधींना अजिबात राजकीय स्थान नव्हते. त्या सार्वजनिक जीवनातून निवृत्त होणार अशाही बातम्या होत्या. पूर्वी त्यांना काँग्रेसच्या अध्यक्षा केले होते, हे खरे पण ते केवळ

वडिलांच्या खुशामतीखातर. राजकारणाच्या शर्यतीत अचानक पुढे आलेला घोडा, असेसुद्धा त्यांचे वर्णन करता येणार नाही. कारण त्या मुळी पळणाऱ्या घोड्यांपैकी नव्हत्याच. नेहरूंच्या मृत्यूनंतर भारतीय राजकारणाला जी अवकळा आली त्याचे एक गमक म्हणून त्यांच्या कन्येच्या या भरारीकडे पाहता येईल.

हिंदुस्थानात एकाधिकारशाही नसते तेव्हा टोळीचे राज्य असते. नेहरूंच्या मृत्यूनंतर देशात ज्यांना काहीही स्थान नाही अशा पुढाऱ्यांच्या टोळीकडे राजकारणाची सूत्रे गेली आणि त्यांनी शास्त्रीजींना पंतप्रधान केले. पाकिस्तानशी एक युद्ध करण्यापलीकडे असाधारण असे काहीच शास्त्रींच्या कारकीर्दीत झाले नाही. त्यांच्या मृत्यूनंतर त्याच टोळक्याने श्रीमती गांधींना राज्यावर बसविले. त्यावेळी त्यांचा आडाखा असा होता की, श्रीमती गांधी स्वतंत्र वृत्तीने वागणार नाहीत आणि आपली सत्ता पडद्यामागून अबाधित चालू राहील.

पण तसे काहीच झाले नाही आणि सुरुवातीपासूनच श्रीमती गांधींनी स्वतःचो स्वतंत्रवृत्ती दाखविण्यास सुरुवात केली. कॉंग्रेसच्या नेत्यांना ते आवडले नाही आणि 'बाई स्वतःच्या पायावर धोंडा पाडून घेणार आहेत' अशी टवाळी करण्यास त्यांनी सुरुवात केली. तथापी शासनसंस्था पंतप्रधानांच्या हाती होती आणि पक्षाचे नेते असलेले टोळके बोटे मोडण्यापलीकडे काही करू शकत नव्हते. वर्षभर असेच गेले आणि १९६७ साली निवडणुका झाल्या. मोरारजी देसाईंना मंत्रिमंडळात घेणे बाईंना भाग पडले. ही त्यांना जरा पडच खावी लागली अशी तेव्हाची भावना होती.

बाईंचा पुढचा पराभव झाला तो कॉंग्रेसनेत्यांनी संजीव रेड्डींना राष्ट्रपतिपदासाठी उभे केले तेव्हा. त्यावेळी मात्र आपल्या अधिकाराचा वापर करून श्रीमती गांधींनी मोरारजी देसाईंना मंत्रिमंडळातून काढून टाकले आणि लोकानुनयाचा प्रभावी मार्ग म्हणून बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. यावेळी बाईंची पावले अतिशय धूर्त आणि चतुराईची पडली. ऑगस्ट ६९ मध्ये जुन्या कॉंग्रेस नेत्यांचा पूर्ण पराभव झाला आणि बाईंना होणारा पक्षांतर्गत विरोध संपुष्टात आला. त्यानंतर गैरकारभार आणि आर्थिक दुरवस्था यामुळे निर्माण होणाऱ्या असंतोषाखेरीज दुसरा कोणताही धोका श्रीमती गांधींना उरला नाही. या असंतोषाचाही तात्पुरता बंदोबस्त भारतीय जनमनातील सर्वात प्रभावी आकांक्षा पूर्ण करून त्यांनी केला—पाकिस्तानशी युद्ध करून त्याची फाळणी त्यांनी केली.

या सगळ्याचा उपयोग करून घेऊन जर त्यांनी शासन सुधारण्याचे, लाचलुचपतीस आळा घालण्याचे आणि आर्थिक सुबत्ता आणण्याचे प्रयत्न केले असते, तर त्यांचे स्थान पूर्णपणे सुरक्षित झाले असते आणि आपल्या पित्याप्रमाणेच त्या जनमान्य हुकुमशहा झाल्या असत्या. पण तसे व्हायचे नव्हते, कारण शासनसंस्था सुधारणे हा राजकीय प्रश्न आहे असे कधी मानलेच गेले नव्हते. झाले असे की, कारभाराचा सैलपणा वाढतच गेला आणि असंतोष आटोक्याबाहेर जाऊ लागला. भारतीय जनतेचा अहंकार सुखावण्यासाठी सरकारने अॅटमबॉम्बचा स्फोट केला आणि थोडी उसंत मिळविली. पण ही उसंत फार काळ टिकली नाही. विरोधाने अनेक प्रांतांतून गंभीर स्वरूप धारण केले आणि जनआंदोलनांनी केंद्रीय सत्तेसही आव्हान दिले.

तथापी आणीबाणीचा निकराचा पवित्रा घेण्याची वेळ एवढ्यानेच आली असे नाही. अशा परिस्थितीत हाती असलेल्या सत्तेचा कसा वापर करावयाचा आणि विरोधकांना कसे हाताळायचे याचे आडाखे आतापर्यंत पक्के झाले होते. पण श्रीमती गांधींची निवडणूक रद्द ठरविणारा कोर्टाचा निकाल हा फार गंभीर हल्ला होता. त्याचा पूर्ण फायदा घेण्याचा प्रयत्न विरोधकांनी केला. न्यायालयीन कामकाज लांबणीवर टाकून उसंत मिळण्याची शक्यता नव्हती; कारण, सत्ता डळमळते आहे असे पाहताच भारतीय जनतेची प्रतिक्रिया अतिशय तीव्र स्वरूपाची असते आणि जो तो विन्हाडबाजले उचलून पराभूत बाजूला सोडून जातो. त्यामुळे विरोधकांवर चटकन् आणि परिणामकारक प्रहार करण्याची निकड होती. म्हणून कोंबडा आरवून काळोखाचे साम्राज्य संपण्यापूर्वीच राष्ट्रपतींना आणीबाणीच्या हुकुमावर सही करावयास लावण्यात आले आणि दिवस उगवण्यापूर्वीच देशभर आणीबाणी पुकारून बाईंनी आपले स्थान बळकट केले.

## सत्तेचे अधिष्ठान

ज्या प्रकारची दडपशाही आणि मुस्कटदाबी नंतर सुरू झाली. त्याला लोकजीवनात बळकट आधार असलाच पाहिजे. केवळ दहशतीवर अशी सत्ता टिकून राहात नसते. हिटलर अगर मुसोलिनीची सत्ताही अशी टिकली नव्हती. यासाठी जनमनातील कोणत्या इच्छा-आकांक्षांवर आणि समाजातील कोणत्या शक्तींवर या सत्तेचे अधिष्ठान आहे याचा शोध घेतला पाहिजे.

श्रीमती गांधींच्या राजकीय यशाचे रहस्य सर्वप्रथम त्यांच्या स्वभावात आहे. पाश्चात्यविद्याविभूषित हिंदी माणूस पढतमूर्ख आणि भेकड असतो. श्रीमती गांधी यांच्या ठिकाणी हट्टवादीपणात मोडेल इतके धैर्य आहे. बुद्धीच बघितली तर तितपत बुद्धीच्या अनेक स्त्रिया आज भारतात आहेत. पण राजघराण्यातील स्त्रीला शोभेल अशी सत्ताकांक्षा श्रीमती गांधींच्या स्वभावात आहे. लाडावलेल्या मुलाच्या हातचे खेळणे काढून घेतल्यावर ते जो बेभानपणा दाखविते, तसली बेदरकारी आणि आत्मविश्वास श्रीमती गांधींनी दाखविला. अशा तऱ्हेच्या हट्टी माणसाचे सामर्थ्य काय असते ते फक्त भारतीय समाजात राहिलला माणूसच जाणू शकतो. ओर्म या इतिहासकाराने हे हेरले होते. तो लिहितो, 'हिंदुस्थानात प्रत्येक मनुष्याचे भाग्य त्याला स्वतःला घडवावे लागते. विवेकहीन चतुर माणसाला यश मिळाले नाही असे क्वचितच घडते.'

इंदिरा गांधींजवळ सत्ताकांक्षा होतीच. त्यांच्या भोवती असलेल्या उच्चमध्यमवर्गीय, पाश्चात्यविद्याविभूषित गोतावळ्याने आवश्यक ते कपट-चातुर्य त्यांच्यामागे उभे केले. माझी खात्री आहे की, सिंडिकेटशी झालेल्या झटापटीत प्रत्येक पाऊल या गोतावळ्याच्या सांगीवरून टाकले गेले. त्यांचा वारकावा कॉंग्रेस नेत्यांच्या बुद्धीपलीकडला होता. ब्रिटिशांच्या काळात स्वभावसामर्थ्य आणि बुद्धिमत्ता ही एकत्र एका वर्गात सापडत नसत. इथं मात्र तो संगम आढळला.

श्रीमती गांधी आणि उच्चवर्गीय पाश्चात्यीकरण झालेला हा वर्ग, यांचे मेतकूट जमण्याची दोन कारणे आहेत. पहिले म्हणजे बाई स्वतः त्या वर्गातल्या आहेत आणि त्यांचे विरोधक निम्न-मध्यमवर्गीय परंपरानुसारी समाजातील आहेत. उच्चाधिकाऱ्यांचा वर्ग व राजकीय नेत्यांचा वर्ग यांच्यातील फरक शास्त्रींच्या ध्यानी आला

होता. एकदा शास्त्रींनी एका आय्. सी. एस्. सेक्रेटरीला सिगारेट देऊ केली. त्या अधिकाऱ्याने ती नम्रपणे नाकारली. तेव्हा शास्त्री हसून म्हणाले, 'अरे, तुम्ही असल्या सिगारेटस् ओढत नाही, हे मी विसरलोच!' बिचाऱ्याला सिगारेट घ्यावी लागली.

दुसरे असे की, उच्च मुलकी आणि लष्करी अधिकारी आणि श्रीमती गांधी यांचे हितसंबंधही एकच आहेत. हे अधिकारी ब्रिटिश साम्राज्याचे वारसदार आहेत आणि ब्रिटिशांचे सर्व मरातब त्यांना मिळतात. या अधिकाऱ्यांना निम्न-मध्यमवर्गीय राजकारण्यांचा दुस्वास वाटत असे. ते त्यांना तुच्छ लेखीत व त्यांची टवाळी करीत. उच्चाधिकाऱ्यांचे टोळके आणि श्रीमती गांधी यांच्यातील स्नेहबंधनांचा हा मागोवा आहे.

या उच्चाधिकाऱ्यांनाही हल्ली आर्थिक चणचण भासू लागली होती. १९७४ साली मी असे ऐकले, की दरमहा २००० रु. पेक्षा अधिक आवक असलेल्या कुटुंबांनाही महागाईचे चिमटे बसू लागले होते.-श्रीमती गांधींनी केलेल्या कारवाईमुळे हा ताण कमी झाला आहे. अधिकारी, लष्करी अधिकारी, व्यवस्थापक, धंदेवाले, तंत्रज्ञ यांच्या बनलेल्या या वर्गाला कोणताही ध्येयवाद नाही आणि सुखासीनता हे त्यांचे एकमेव साध्य आहे. या वर्गाशी श्रीमती गांधींचे चांगले सूत आहे.

त्यातून या वर्गाच्या अधिकारावरही आक्रमणे होत होती. हाताखालच्या कारकुनांना हे अधिकारी पूर्वीसारखे वेंगवू शकत नव्हते. कारण कारकुनमंडळी लोकशाही अधिकाराच्या नावाखाली कामचुकार आणि उच्छृंखल बनली होती. खेरीज मंत्र्यांचा सासुरवास या अधिकाऱ्यांना भोवत होता. हे मंत्रीही कारकुनांच्याच वर्गातले म्हणजे निम्न मध्यमवर्गीय. आणीबाणीच्या अंमलामुळे हे खालचे वर्ग आपली पायरी ओळखून वागू लागले आहेत. अधिकार वापरता येऊ लागल्याने अधिकारी खूष आणि कार्यक्षमता वाढल्याने बाईही खूष. पोलीसही समाधानी आहेत. कारण, इंग्रजी अंमलात लोकात दहशत निर्माण करण्याचे जे सामर्थ्य त्यांना होते ते आता परत मिळाले आहे.

यावरून हे स्पष्ट होते, की श्रीमती गांधींची विरोधकांशी झालेली झटापट हा वर्गीय लढ्याचाच एक भाग होता. शासन चालविणारे उच्चमध्यमवर्गीय एका बाजूला आणि स्वातंत्र्यलढ्यात अग्रेसर असणारे निम्नमध्यमवर्गीय दुसऱ्या बाजूला. दोन्ही वर्गाचे साध्य एकच होते, पैसा! पण तो मिळविण्याचे मार्ग मात्र भिन्न होते. अधिकारी वर्गाला स्थैर्य हवे होते; तर राजकारण्यांना चटकन श्रीमंत व्हायचे होते. त्यामुळे माजलेल्या भ्रष्टाचारातून आणि अंदाधुंदीतून अराजक निर्माण होईल आणि सोन्याचे अंडे देणारी कोंबडीच मारली जाईल, अशी भीती अधिकाऱ्यांना वाटे. नेहरूंच्या काळात हा संघर्ष उफाळून आला नाही. कारण नेहरू सर्व सावरून धरतील हा विश्वास अधिकाऱ्यांना होता. तोच विश्वास आता बाईंनीही संपादन केला आहे.

वर वर पाहता जनतेलाही श्रीमती गांधींना पाठिंबा असावा असे वाटते. हिंदुस्थानात जनतेवर अधिकार गाजविणे सत्ताधाऱ्यांना कधीच अवघड गेलेले नाही. त्यामुळे बाह्यतः तरी जनतेची सत्ताधाऱ्यांवर खरी निष्ठा आहे, असेही वाटते. पण सत्ता संपली की, ही निष्ठाही संपते आणि कृतज्ञताही दाखविली जात नाही. पौर्वात्य देशांत 'जनतेच्या पाठिंब्याचे' स्तोम माजविणे उथळपणाचे आहे. शेख अब्दुल रेहमान यांचे उदाहरण या संदर्भात विसरून चालणार नाही.

भारतीय जनतेची मान्यता मिळवावयाची असेल तर नेत्यांचे ठिकाणी नैतिक उंची आणि पावित्र्य असावे लागते. त्यामुळे महात्मा गांधींना जी लोकमान्यता होती तशी मान्यता श्रीमती गांधींना नक्कीच मिळणार नाही. तथापि श्रीमती गांधी या स्त्री असल्यामुळे आणि हिंदुसमाजात मायभवानीचे प्रस्थ असल्याने एक धार्मिक वलय मात्र त्या स्वतःभोवती उभे करू शकतात.

हिटलर किंवा मुसोलिनीशी त्यांचे दोन बाबतीत तरी काहीच साम्य नाही: एक, कोणत्याही 'वादा'शी त्यांनी सत्तेची सांगड घातलेली नाही आणि दोन, जनतेच्या आकांक्षांची पूर्ती करणाऱ्या नेत्या म्हणूनही त्यांच्याकडे पाहिले जात नाही. कारण, मुळात भारतीय जनतेला विशिष्ट आकांक्षाच नाहीत.

असे असले तरी श्रीमती गांधींनी भारतीयांचा अहंकार सुखविण्याचे काम मात्र केलेच आहे. हा अहंकार सुखविण्यासाठी काही ठोस कार्य केले पाहिजे, असे मुळीच नाही. भारतीय जनतेला असे भासवावे लागते, की भारतीय लोक हे नैतिक दृष्ट्या इतरांपेक्षा श्रेष्ठ आहेत आणि त्यांच्या हातून वाईट गोष्टी घडत नाहीत. त्याचप्रमाणे त्यांची अशीही समजूत पटवावी लागते, की इतर राष्ट्रे भारताला हिणविण्यासाठी टपून बसली आहेत. या दोन्ही गोष्टी श्रीमती गांधी करीत आहेत.

अंतर्गत राजकारणासंबंधी श्रीमती गांधींजवळ कोणत्याही नव्या कल्पना नाहीत. आजवर राजकारणात आणि आर्थिक प्रश्नात ज्या घोषणांची चलती चालत आली आहे, त्यापलीकडे त्या जाऊ शकत नाहीत. तथापी यामुळे त्यांचे काही बिघडत नाही, कारण भारतीय बुद्धिमंतांजवळही कोणत्याच नव्या कल्पना नाहीत. जिवंत कल्पनांचा अभाव हा आणखी एक धागा श्रीमती गांधी आणि त्यांना पाठिंबा देणारे वर्ग यांना जवळ आणीत आहे.

शिवाय हिंदू जनतेलाही हुकूमशाहीचे आकर्षण आहे. हिंदू समाजात स्वातंत्र्य कधीच नव्हते. त्यामुळे सत्ताशरणता हा हिंदूंचा स्वभावधर्मच आहे. १९४७ पासून अनेकदा ही घोषणा उठली आहे की, 'आम्हाला हुकुमशहा हवा!' फक्त नेहरूंना कुणी हुकुमशहा मानले नाही, कारण ते उदारमतवादी होते.

भारतीय जनतेला रुचेल अशा प्रकारची हुकुमशाही श्रीमती गांधींची नाही. त्यामुळे जनसामान्यांच्या अंगवळणी पडेल असे शासन त्या देऊ शकत नाहीत. दंडुकेशाहीवर अवलंबूनच त्यांना राहावे लागणार. त्याचप्रमाणे बाईंची सत्ता, अधिकारी वर्गाशी त्यांचे संबंध कसे राहातात यावरही अवलंबून आहे. अगदी स्वतःसाठी त्या एखादी गोष्ट करू लागल्या तर हे संबंध बिघडतीलही. आर्थिक परिस्थिती, भारतीय जनतेचा स्वाभाविक आळस आणि हवामानाची लहर यांच्यावरून ठरणार. त्याचप्रमाणे जे वर्ग आज इंदिराबाईंबरोबर नाहीत ते आपला पराभव कायमचा आहे असे मानतील असे वाटत नाही.

सारांश असा, की स्वातंत्र्यावर घातलेली बंधने सैल करणे आणि विरोधकांशी मिळवून घेणे बाईंना फार परवडणार नाही दोन्हीचाही अर्थ त्या हतबल झाल्या आहेत असा लावला जाईल. त्यामुळे एकदा जो मार्ग स्वीकारला त्यावरूनच त्यांना वाटचाल करावी लागणार.

इतिहासात भारतीयांनी आर्थिक अगर राजकीय कर्तृत्व कधी दाखविलेले नाही. सांस्कृतिक क्षेत्रातील त्यांची कामगिरी आध्यात्मिकच राहिलेली आहे. १९४७ साली स्वातंत्र्य मिळाले तेव्हा भारतीय अध्यात्माला परद्वेषाचे फेफरे जडले होते. श्रीमती गांधींच्या कारकिर्दीत त्याला पूर्णविरामच मिळेल. भारतात सध्या रवींद्रनाथ टागोर, महात्मा गांधी किंवा जवाहरलाल नेहरू यांची स्वातंत्र्यविषयक वचने उच्चारण्याची सुद्धा सोय उरलेली नाही! □

# सोलकढी

## □ जॉली गुड फेलो महंमद अली

माणूस जसा दिसतो तसाच तो असेल असे नाही, ही साधी गोष्ट आपल्या लक्षात राहत नाही. पुन्हा पुन्हा तिचा अनुभव येतो; पण आपण करू नये ती चूक नेमकी करतो. आपल्या पंतप्रधान इंदिरा गांधी सत्तेवर आल्या तेव्हा मोठमोठ्या राजकीय निरीक्षकांनी त्यांना 'गुंगी गुडिया' ठरवले होते; आता त्यांच्या कारकीर्दीची अकरा वर्षे पुरी होताना ते वर्णन आठवले की फफाफिफीफुफू हसू येते. आमचे धोंडो केशव कर्वे घ्या. त्यांनी जे केले ते त्यांनीच केले असे त्यांना पाहिल्यावर चुकूनसुद्धा वाटत नसे. माझे स्वतःचे उदाहरण देतो : मी आरशात पाहतो तेव्हा, मराठीत विशेष दर्जेदार विनोदी लेखन करणारे 'अनंतराव' ते आपणच, यावर काही केल्या विश्वासच बसत नाही. (असा विश्वास बसण्यासाठी मला मराठीतले बाकीचे तथाकथित विनोदी लेखन वाचावे लागते.)

असो. झाली एवढी प्रस्तावना ठीक झाली. मला सांगायचे होते ते महंमद अली ऊर्फ कॅशियस क्ले या मुष्टियोद्धयाबद्दल. त्याचे नाव सर्वांना ठाऊक आहे. त्याचे छायाचित्र सगळ्यांनी पाहिले आहे. तो जगज्जेता मुष्टियोद्धा आहे. त्याच्या जगज्जेतेपदाला दिली गेलेली आव्हाने फिजूलफुसकी ठरली. जगज्जेत्या मुष्टियोद्ध्याने जसे बेडकीहळ्ळी दिसायला पाहिजे तसाच तो दिसतो; आणि दिसतो तसाच बोलतो. पण आता तो जे करू पाहतो आहे ते त्याच्या बेडकीहळ्ळी दिसण्याबोलण्याशी बिलकुल जुळणारे नाही.

काही वर्षांपूर्वी ब्रिटनमध्ये जॉन, पॉल, जॉर्ज, रिंगो या चार गायकांनी आपल्या नव्या शैलीतल्या गाण्यांनी नुसती धूमधमाल उडवून दिली. स्वतःला ते बीटल्स म्हणायचे. लोक त्यांच्या गाण्यांवर फिदा झाले होते. बीटल्सना हेवदाबदा पैसे मिळाले. पुढे यथाकाल जे व्हायचे ते झाले; म्हणजे मराठी नाटकमंडळी फुटते तशी बीटल्सची चौकडी फुटली. चौघे चार दिशांना गेले आणि आपण गेलो तीच पूर्व असे मानायला लागले. अशी वर्षे गेली. एकेकट्या बीटलचेसुद्धा गाणे स्वतंत्रपणे बरे चालले आहे. पण त्याला चौकडीची चमाडीगंमत नाही.

त्यांना एकत्र आणायचे प्रयत्न झाले; पण यश नाही आले. आता बेडकीहळ्ळी दिसणारा आमचा स्फूटनायक जगज्जेता कॅशियस क्ले ऊर्फ महंमद अली बीटल्सना एकत्र आणायची गोजिरवाणी गोष्ट करायला निघाला आहे. तोडण्याफोडण्यासाठी खास कमावलेले त्याचे हात जोडण्याजुळवण्यासाठी पुढे झाले आहेत. (ओ ही इज अ जॉली गुड फेलो–) महंमद अलीला एक आंतरराष्ट्रीय मंडळ काढायचे आहे. या मंडळातर्फे भूमंडळीच्या गरीब लेकरांना अन्न, वस्त्र, निवारा पुरवायचा आहे. त्यासाठी लागणारे दोन कोटी डॉलर्स बीटल्सच्या संयुक्त मैफिलीतून उभे करायची कल्पना महंमद अलीने आपल्या गडहिंग्लज डोक्यात घेतली आहे. सर्व जातींच्या, देशाधर्मांच्याच नव्हे, तर सर्व वयांच्या माणसांना बीटल्सबद्दल भरभरून प्रेम आहे. (खुद्द महंमद अलीला त्यांचे गाणे आवडायचे आणि तो त्यांची जमेल तशी नक्कल करायची कोशिश करायचा.) त्यामुळे उपरिनिर्दिष्ट उदात्त हेतूसाठी त्यांनी पुन्हा एकदा (तरी) एकत्र यावे असे महंमद अलीला वाटते.

महंमद अलीला मी सुयश चिंतितो.

असे सुयश चिंतायची खरोखरच गरज आहे. कारण गाणारी मंडळी, दुरून, निळ्या निळ्या आभाळात गंमतगिरक्या घेणारी जणू काही पाखरेच होत, अशी सामान्यपणे समजूत असते. पण दुरून दिसते तसे जवळून नसते. या बीटल्सना समजा एकत्र यायची नि गायची मुळातच आशंका वाटत असेल तर–? किंवा, वसंत सबनीस आणि दादा कोंडके अथवा ग. वा. बेहेरे आणि पु. भा. भावे यांच्याएवढे त्या बीटल्सचे, आपापसात, न ठिगळता येण्याजोगे तात्त्विक असे फाटले असेल तर–?

तर–?

तर काही नाही. जे सुचले त्याबद्दल महंमद अलीला कुर्निसात करायचा आणि पुटपुटायचे की, मुष्टियोद्ध्याला कधी कधी जे कळते ते गाणाऱ्याला कळेलच असे नाही. अफसोस.

※

## □ आणीबाणीतला दिलासा

चला, आणीबाणी-आणीबाणी असे जिला म्हणत होतो ती शिथिल झाली. 'शिथिल झाली' याचेच वर्णन काही शब्दढिली मंडळी 'उठली' असे करतात. त्यांच्याशी अनंतरावांचे भांडण नाही. त्यांचेही त्यांच्यापुरते बरोबर असेल. कसेही असले तरी जरा खुलेमोकळे वाटू लागले हे खरेच आहे. मार्चमध्ये चक्क निवडणूक-निवडणूक असे जिला म्हणत होतो ती होणार आहे. तुरुंगातली पुन्हा बाहेरच्या माणसांत आली आहेत. वृत्तपत्रांवरील निर्बंध बाजूला झाले आहेत. सभांवरची बंदी उठली आहे. वाहनांत, दुकानांत रस्त्यांत, घरांत, मनातल्या मनात, काय वाटेल ते दीड जिभेने बोलायला मुभा मिळाली आहे. नेहमी चप्पल घालणाऱ्या माणसाने एखाद्या दिवशी चढवलेले बूटमोजे उतरवल्यावर त्याला जसे वाटते तसे वाटून राहिले आहे.

या आणीबाणीत मराठी माणसांना एक मोठा दिलासा होता तो मराठी साहित्यिकांचा. ते बेटे डगमगले नाहीत. आणीबाणीच्या कोंदटात त्यांनी स्वातंत्र्याची झुळझुळ सलामत राखली. हृदय आक्रंदत असता नाही कर्मयोगी वृत्तीने त्यांनी आपले लेखन चालू ठेवले. आकाशवाणी आणि दूरचित्रवाणीवरच्या कार्यक्रमांतून त्यांनी अतीव चतुराईने आणीबाणीला खिंडारे पाडली. श्रोत्यांना आणीबाणीची लाजिरवाणी जाणीव दाहकतेने व्हावी म्हणून आपल्या भाषणातून आणीबाणीचा निसटपुसटतासुद्धा संदर्भ येणार नाही याची मुत्सद्दी दक्षता त्यांनी घेतली. दुर्गा भागवतांना पुन्हा पुन्हा स्मरून त्यांनी साहित्यसंमेलनादी साहित्यिक कार्यक्रम साजरे केले. काही साहित्यिकांनी सरकारी आमंत्रणे नाकारली. काहींनी सरकारी अधिकारपदे सोडली. काही साहित्यिक तर आपली सरकारोपार्जित पदवी सोडायला निघाले होते; पण वृत्तपत्रीय निर्बंधामुळे ते 'सोडणे' वाचकांना हलवून सोडणार नाही, असे लक्षात आल्यावर त्यांनी पदवीबदली साखर सोडली, सिगारेट सोडली, उशी सोडली.

मराठी वाचक या साहित्यिकांचे ऋणी आहेत–ऋणी राहतील. स्वतः साहित्यिकांना मात्र, आपण काही विशेष केले, हे मंजूर होणार नाही. कारण ज्ञानेश्वर–तुकारामांचा, टिळक-सावरकरांचा वारसा चालवणारे मराठी साहित्यिक वेगळे वागूच शकणार नाहीत. जे रक्तात ते शब्दात आणि वर्तनात प्रकटणारच.

आणीबाणीमुळे, आपले कुल कोणते आहे, हे सिद्ध करायची संधी मराठी साहित्यिकांना लाभली, हा आणीबाणीचा एकमेएकावा लाभ होय.

--अनंतराव



# अशी चौकशी, अशी फाशी !

**लेखांक बारा । र. धों. घाणेकर**

३० एप्रिल १९७० ला अमेरिकेने कंबोडियावर आक्रमण केले व ते का केले व करावे लागले ह्याचे स्पष्टीकरण टेलिव्हिजनवरील आपल्या ८ मेच्या भाषणात निक्सननी केले. त्या भाषणाला आता पुरे वर्ष लोटले नाही तोच ८ मे १९७१ ला निक्सनने पुन्हा टी. व्ही. वर सांगितले :

'I have ordered the bombing of Hanoi and Haipong and the ruining of North Vietnamese Parts.'

निक्सन मनातून जरा घाबरलाच होता, कारण १९७० मध्ये केलेल्या भाषणानंतर सर्व अमेरिकाभर विद्यार्थ्यांनी धुमाकूळ घालण्यास सुरुवात केली होती.

'ही शांतता कसली ? युद्ध वाढतच चालले आहे. युद्धस्थगिती ही जननेची निव्वळ फसवणूक आहे,' असे लोकमत प्रसृत होऊ लागले.

व्हिएटनाममधून अमेरिकन सैन्य हळूहळू आपण कसे परत मायभूमीला आणू लागलो आहोत; ह्याचे स्पष्टीकरण व्हाईट–हाऊसमधून बाहेर पडले. १९६८ च्या अखेरी ५,४९,५०० सैन्य होते. ते १९६९ सालच्या अखेरी ४,८४,००० राहिले. १९७० अखेर ते ४,३४,०००, १९७१ अखेर ते २,८४,००० व १९७२ अखेर १,३९,००० राहील, असा अंदाज निक्सनने दाखविला व १९७४ अखेरी सर्व सैन्य परत आणले जाईल असे सांगण्यात आले.

जनतेला विश्वासात घेतल्यावाचून आता गत्यंतरच नव्हते, कारण १९७२ च्या अखेरी राष्ट्रपतिपदाची निवडणूक होती व ती निक्सनला जिंकावयाची होती. त्या दृष्टीने युद्ध वाढत नसून ते बंद करण्याकडे आपण पावले टाकीत आहोत हा भास तरी निर्माण करावयाला पाहिजेच होता.

२२ डिसेंबर १७७१ ला The International Brotherhood of Teamstars ह्या कामगारांच्या संघटनेचा अध्यक्ष जेम्स होफा ह्याला, सजा पुरी होण्याच्या अगोदरच, बाहेर सोडून देण्यात आले व त्यामुळे २५ लाख मजूर व त्यांच्या लहान लहान संघटना खूष झाल्या. कामकरी वर्गाचे मत मिळविण्यासाठी निक्सनचा हा एक डाव होता व त्याचा फायदा त्याने मिळविला.

ज्यू लोकांचे निरनिराळे पेरून ठेवलेले गट हे निक्सनच्या राजकारणावर खूष नव्हते व किसिंजर हा ज्यू असून इस्रायलच्या मदतीला नेहमीच धावून जात असे, हे ध्यानात घेऊन त्याने व निक्सनने ज्यू पुढारी ह्यांना व्हाईट हाऊसमध्ये बोलावून घेऊन त्यांचे पाठबळ मिळविले. ज्यू लोक हे रिपब्लिकन पक्षाशी चिकटून कधीच नव्हते. त्यांचा ओढा नेहमीच डेमॉक्रेटिक पक्षाकडे. परंतु किसिंजरच्यामुळे निक्सनशी सोयरीक बांधणे हे त्यांच्या हिताचे असल्याचे दाखविण्यात किसिंजर यशस्वी ठरला.

अमेरिकेतील कॅथॉलिक धर्माचे ख्रिश्चन ह्यांचे मत मिळावे ह्या दृष्टीने देखील निक्सनने प्रयत्न केला. कॅथॉलिकांच्या मुख्य तक्रारी दोन होत्या. त्यांची जी नॉन–पब्लिक स्कूल्स होती त्यांना सरकारी मदत व ग्रॅन्ट्स मिळत नव्हती; ती मिळावी व Abortion Contraversy (गर्भपातासंबंधीचे कायदे). एप्रिल १९७२ मध्ये फिलॅडेल्फिया येथे नॅशनल कॅथॉलिक एज्युकेशनल असोसिएशनचे वार्षिक अधिवेशन झाले, त्याला निक्सन मुद्दाम हजर राहिला होता. त्याने ५० संस्थाने–सरकारी ग्रॅन्टस देतील असे जाहीर करून एक मजल मारली. न्यूयॉर्क स्टेटमध्ये असलेला गर्भपाताचा कायदा हा जरासा कडक होता. तो सैल करण्यासंबंधी कॅथॉलिक्सतर्फे कार्डिनल कुक ह्याने

निक्सनला पत्र लिहिले. त्याचे ६ मे १९७२ ला निक्सनने उत्तर दिले. त्यात निक्सन म्हणाला, 'This is a matter for State decision outside Federal jurisdiction but I would personally like to Associate myself with the convictions you deeply feel and elequentily express.'

७ मे १९७१ ला अमेरिकेतील मोठमोठ्या दैनिकांमधून बातमी आली. 'Disaster and debacle in Vietnam.' निक्सनने किसिंजर व सेक्रेटरी ऑफ स्टेट विल्यम रोजर्स ह्यांना कॅम्प डेव्हिड येथे बोलावून घेतले. रोजर्स नॅशनल सिक्युरिटी कौन्सिलच्या बैठकीसाठी जर्मनीला गेला होता, तो ताबडतोब परत आला. १९६९ पासून अमेरिकन सैन्य व्हिएटनाममधून काढून परत आणण्यात येत होते व जे सैन्य त्या ठिकाणी होते, ते स्थानिक दक्षिण व्हिएटनाम तरुणांना लष्करी शिक्षण देत राहिले होते. अमेरिकन सैन्य जसजसे परत माघारी येत होते, तसतसे उत्तर व्हिएटनाम पुढे पुढे सरकत राहून दक्षिण-व्हिएटनाम काबीज करीत राहिले. अशी परिस्थिती असल्यामुळे कधी तरी असा एक दिवस उगवणारच होता की, उत्तर व्हिएटनामची कम्युनिस्ट राजवट सबंध दक्षिण व्हिएटनाम सर करून टाकणार आणि आपल्या घशात घालणार. त्याच्यात नवलाचे असे काहीच नव्हते.

१९७६ च्या जूनमध्ये दोन्ही व्हिएटनाम एक झाल्याची घोषणा झाली. थोडक्यात म्हणजे उत्तर व्हिएटनामच्या कम्युनिस्ट राजवटीने दक्षिण व्हिएटनाम पूर्ण जिंकला. इंग्लंडने हिंदुस्थानवर १५० वर्षे राज्य केले. सन १८०० ते १९४७. पण तो काळ वेगळा होता. म्हणूनच ६००० मैल दूर असलेल्या हिंदुस्थानवर इंग्लंडला राज्य करता आले. अमेरिकेपासून व्हिएटनाम १०,००० मैल दूर. इतक्या दूरवर केवळ फ्रान्सला खूष ठेवण्यासाठी जो उपद्‌व्याप १९४५ पासून अमेरिकेने केला तो व्यर्थ होता. चीन व रशिया हे दोन्हीही देश मजबूत झाले होते. अमेरिकेचे पुरते हाडवैरी होते. तेव्हा उत्तर व्हिएटनाम हा ताबडतोब साम्यवाद्यांनी व्यापला व दक्षिण व्हिएटनामला १०,००० मैलांवरून अमेरिका मदत करीत राहिली. व्हिएटनामला चीन तर लागून. दोघांची सरहद्द एक. १९५२ ते ५४ च्या काळात तह करून अमेरिका मोकळी झाली असती तर अब्जावधी डॉलर्स खर्च झाले नसते व लाखो अमेरिकन सैन्य बळी द्यावे लागले नसते.

गेले बत्तीस महिने किसिंजर Hanoi Politburo चा Le Duc Tho (ली डक् थो) ह्याला युद्धबंदी जाहीर करण्याविषयी सांगतच होता. आतापर्यंत अमेरिकेचे ४,५०,००० च्या वर सैनिक ठार झाले होते. कित्येक हजार बंदीत अडकून पडले होते. युद्ध तर थांबवावयास पाहिजे होते. दक्षिण व्हिएटनामचे सरकार स्वतःच्या जोखमीवर व ताकदीवर आणि अमेरिकेच्या मदतीशिवाय युद्ध पुढे चालविण्यास समर्थ नव्हते. उत्तर व्हिएटनामला सर्व व्हिएटनामला कम्युनिस्ट करून टाकावयाचा होता व चीन आणि रशिया ह्या दोघांनाही अमेरिकेला हाकलून, पिटाळून बाहेर फेकून द्यावयाचे होते. अशा परिस्थितीत समेट होणार तरी कसा?

No cease-fire, no military agreement, no arhistice, no return of American Prisioners of War!

अमेरिकन जनता कंटाळून गेलेली होती. प्रत्येक घरोटी एकेक तरुण व्हिएटनाम युद्धात खर्ची पडला होता.

८ मे १९७१ ला कम्युनिस्टांनी अमेरिकन सैन्याला वेढा टाकला व ते धोक्यात आणले. रात्री टी. व्ही. वर निक्सनचे भाषण झाले. त्यात तो म्हणाला :

'An American defeat in Vietnam would encourage aggression all over the world. Aggression in which small nations, armed by their allies, could be tempered to attack neighbouring nations at will in the mid-east, in Europe and in other areas. World peace would be in great danger and grave jeopardy.

'I have therefore concluded that Hanoi must be denied the weapons and supplies it needs to continue the aggression. All entrances to North Vietnam Ports and North Vietnam operations from these ports.'

आताची ही अशी वेळ येऊन ठेपली की, युद्ध अधिक भडकणार किंवा तहनामा तरी होणार.

मॅकगव्हर्न, केनेडी, हंफे, मस्की, हॅरॉल्ड ह्युजेस, एडवर्ड कोच, सगळे निक्सनवर तुटून पडले. जिवाची शर्थ करून निक्सन डाव खेळत होता. फार मोठे धाडस होते आणि ते धाडस केल्यावाचून त्याला गत्यंतर नव्हते.

मॅकगव्हर्नने सांगितले, 'The new escalation is reckless, unnecessary and unworkable- a flirtation with world war III.' केनेडीने वक्तव्य बाहेर काढले– 'निक्सन फार मोठी घोडचूक करीत आहे.'

ह्यूबर्ट हंफे म्हणाला, 'नव्या युद्धाची ही ठिणगीच आहे.'

मस्कीने तर काय कमालच केली. तो रेडिओवरील मुलाखतीत उद्‌गारला, 'Nixon is risking major confrontation with the Soviet Union & China and is jeopardising the major security interest of the United States.'

सगळ्या ठिकाणांहून एकच सूर निघत होता. तो म्हणजे निक्सनची ही चाल अत्यंत घातक, तिरस्करणीय व बेजबाबदारपणाची होती.

ह्याला फक्त एकच अपवाद होता तो म्हणजे CREEP (The Committee to re-elect President) ह्या नुकत्याच स्थापन झालेल्या संस्थेचा. मिचेल व हल्डमन ह्यांनी हे 'निक्सन-निवडणूक मंडळ' एप्रिलमध्ये स्थापन केले होते, त्या संघटनेचा. त्यांनी अमेरिकेतील निरनिराळ्या ठिकाणांहून ८ आणि ९ मे ह्या दिवशी निक्सनला अभिनंदनाच्या तारा पाठविण्याची व्यवस्था केली. एक लाखांच्यावर पत्रे धाडली गेली. टेलिफोनवरूनदेखील अभिनंदनाचा वर्षाव.

वर्तमानपत्रे मात्र निक्सन-निंदेनी भरून गेली. विद्यार्थिवर्ग चवताळून उठला. ११ तारखेला अमेरिकेतील सोव्हिएट वकील डोब्रिनिन निक्सनला भेटला. युद्ध स्थगित करून बोलणी-चालणी करावयाचे ठरले.

पुन्हा सर्वत्र सामसूम झाले. पण ते काही काळच. हे पुढील घटनां-

वरून लक्षात यईल.

१५ मे ह्या दिवशी मेरिलँडमधील लॉरेल ह्या शहरी भाषण करीत असता राष्ट्रपती–निवडणुकीला उभा असलेल्या जॉर्ज वॉलेस ह्यावर कोणीतरी माथेफिरूने गोळी झाडली व वॉलेस मृत्युमुखी पडला. अमेरिकेच्या उत्तर भागात वॉलेसचा चांगलाच जोर होता व जनतेचा त्याला पाठिंबा होता.

मॅक गव्हर्नचे सारखे टुमणे चालू होते, की जरी आता शांतता दिसत असली तरी दोन्ही रशिया व चीन ही धोकेबाज राष्ट्रे आहेत. तेव्हा निक्सननी हार कबूल करून पटावरच श्राद्ध उरकून घ्यावे, त्यात सर्व शहाणपणा आहे. नसल्या फंदात पडणे धोक्याचे आहे.

पॅरिस येथे बोलणी करण्याचे ठरले. किसिंजरच्या पॅरिसला वाऱ्या सुरू झाल्या. ला डक थो हा किसिंजरला झुलवीत होता. ह्यावेळी व्हिएटनामधील हवा ठीक नसल्यामुळे उत्तर व्हिएटनाम थंड होते. पॅरिस भेटीच्या तारखांवर तारखा पडत होत्या. १७ सप्टेंबर १९७१, २० नोव्हेंबर, २० मार्च १९७२, १४ एप्रिल, २४ एप्रिल, २ मे दोघांची भेट झालीच नाही. नुसत्या तारखांवर तारखा.

१९७१ च्या जून महिन्यापासून CREEP (Committee for Reelection of President) ह्या संघटनेत हल्डमन लक्ष घालू लागला. निक्सनच्या राजवटीत जसा हल्डमन, तसाच केनेडीच्या वेळी केनेथ ओडोनेल, व आयसेन हॉवरच्या वेळी शेरमन ॲडॅम्स, व व रुझव्हेल्टच्या वेळी हॅरी हॉपकिन्स.

एका दृष्टीने राजांचे कंचुकीच हे. आपल्याला एक वेळ खाली पाहावे लागले तरी चालेल, पण राजाची उंची वाढली गेली पाहिजे, असे म्हणणाऱ्यांचा– कर्तबगार व्यक्तींचा हा वर्ग काही वेगळाच असतो.

हल्डमन CREEP मध्ये आला आणि त्याने निक्सन–निवडणूक–अंदाजपत्रक तयार केले; ते खालीलप्रमाणे होते.

| खाते | खर्चाचा अंदाज (डॉलर्समध्ये) |
|---|---|
| प्रसिद्धी खाते | १,२७,५०,००० |
| व्यवस्थापन | २,८२,००० |
| अधिवेशन व राजकीय संमेलन खर्च | ४,७५,००० |
| उमेदवार मदत खाते | १४,००,००० |
| नागरिक संघटना | २५,००,००० |
| प्रचार खाते | १५,००,००० |
| कार्यालय व्यवस्था | ५,००,००० |
| सार्वजनिक संबंध | ७,५०,००० |
| उमेदवाराला पाठिंबा देणाऱ्या ५० संस्थानांमध्ये होणारा खर्च | ४०,००,००० |
| मतदान केंद्र व्यवस्था | ७,५०,००० |
| टपाल, तारा व इतर खर्च | ७०,००,००० |
| निरनिराळ्या ठिकाणी इतरांचे दौरे वाढविण्यासाठी | ७,९०,००० |
| एकंदर | ३,२६,९७,००० |

हे एकंदर अंदाजपत्रक खर्चाचे आकडे ३ कोटी २६ लाख ९७ हजार.

निरनिराळ्या व्यक्तींच्यावर जबाबदारी सोपवून निवडणूक–मंडळाचे काम सुरू झाले.

अमेरिकेतील कारखान्यांनी भरलेली संस्थाने (Industrial States & Mountain States) व शेतकीप्रधान असलेली संस्थाने ह्यांची विभागणी बरोबर केली गेली व शिस्तवार प्रचाराची कामे सुरू झाली.

वास्तविक मॅकगव्हर्न हा पूर्वीपासून रिपब्लिकन पक्षाचा परंतु तो ह्यावेळी डेमोक्रेटिक पक्षातर्फे निवडणुकीला निक्सनविरुद्ध उभा राहणार होता. आणि ह्यातच त्याचे मरण होते. लोकशाहीमध्ये काहीही कारण नसताना पक्ष बदलणे व निवणुका लढविणे हे अत्यंत घातक असते. उमेदवार निवडून येत नाहीच, पण पक्ष कमकुवत होतो.

नेल्सन रॉकफेलरनी एका सभेत निक्सनविषयी खालील उद्‌गार काढले : We need this man of action, this man of accomplishment, this man of experience, this man of courage– we need this man of faith in America– who has brought us to the threshhold of PEACE.'

रिपब्लिकन पक्षाने अखेर निक्सनची राष्ट्रपतिपद लढविणाऱ्या झुंजीसाठी निवड केली. जॉर्ज मॅकगव्हर्न व त्याचा डेमोक्रेटिक पक्ष काहीच बोलत नव्हता. ज्यू, निग्रो, कॅथॉलिक्स, तरुण अमेरिकन वर्ग सर्व चुपचाप होते.

मारा सतत चालला होता तो Press चा निक्सनवर त्यांनी नुसती झोंड उठविली होती. मुख्य प्रश्न होता तो अमेरिकेत अधिक सामर्थ्यसंपन्न कोण? अमेरिकेचा राष्ट्रपती की मुद्रणसंस्था (Press)?

अमेरिकेतील राजकीय सत्ता कोणाच्या हातात कशी खेळत राहिली हा इतिहास थोडासा गंमतीचा आहे. १९०० साली वुईल्यम मॅकिन्ले दुसऱ्यांदा राष्ट्रपतिपदासाठी उभा राहिला त्यावेळी पैसा व धनवान लोक राजकारण चालवीत होते. कोठे नवीन रेल्वे बांधावयाची, कोठे नवीन गोद्या उभारावयाच्या, परदेशातून कोणते मजूर आणावयाचे हे सर्व विचार त्यावेळेपासून पुढील १५ वर्षे श्रीमंत वर्ग राष्ट्रपतीपुढे ठेवत असे. पुढे १५ वर्षे राष्ट्रवाद बळावला. 'अमेरिका ही अमेरिकनांच्यासाठीच' ह्याचा जयघोष सुरू होता. संरक्षणाची दिशा बदलली. शस्त्रबळ व शास्त्रबळ ह्यांच्यात बेसुमार व झपाट्याने प्रगती होऊ लागली. १९१९ ला युद्ध संपल्यावर लोकशाही, फॅसिस्टवाद, चीन व रशियाप्रणीत साम्यवाद वगैरे नवीन तत्त्वे, वाद आणि शाह्या पुढे आल्या. संघर्ष निर्माण होत चालले. सन १९४५ मध्ये दुसरे महायुद्ध संपले. हिटलर, मुसोलिनी ह्यांचा झोटिंगवाद गाडला गेला. कम्युनिझम वाढत चालला. लोकशाहीवाद टक्कर देत राहिला.

शिक्षणाचा भरमसाठ प्रसार झाल्यामुळे नवनवीन विचारप्रवाह वाढू लागले. साम्राज्यवाद व वसाहतवाद संपुष्टात येऊन नवीन नवीन राष्ट्रे उदयाला आली. काळे, गोरे वाद, मागासलेले समाज, पायदळी तुडविली गेलेली व वसाहतवादाने पोखरलेली राष्ट्रे उंच

व ताठ माना करून निराळ्याच भूमिकेत जगाकडे पाहू लागली. सगळे चित्रच पालटले आणि ह्यामुळेच–press–वर्तमानपत्रांची पक्कड अधिक घट्ट होऊ लागली.

आणि तोच प्रश्न आता अमेरिकेत होता.

'कोण श्रेष्ठ व ताकदवान ? राष्ट्राध्यक्ष का स्वतंत्र प्रेस ?'

१९६० सालापासून वर्तमानपत्रकार हे नुसतेच जगातील चुरचुरीत बातम्या छापणारे माध्यम राहिले नव्हते तर त्यांचा दृष्टिकोन संपूर्ण बदलला होता. महत्त्वाच्या राजकीय बातम्या, राजकारणी पुरुषांच्या व राज्यकर्त्यांच्या गुण-दुर्गुणांचे बारीक निरीक्षण करून, त्यांची छाननी करून राज्यकारभार स्वच्छ व नीटनेटका कसा राहील ह्याचे मार्गदर्शन करणाऱ्या जबाबदार संस्था बनत चालल्या होत्या.

आणि निक्सनला नेमके त्याचेच वावडे होते.

आपल्या विरुद्ध वर्तमानपत्रकारांनी उठविलेली झोड त्याला मुळीच सहन होत नव्हती. त्याच्यातच टेलिव्हिजनच्या शोधाची भर पडली. थोडा फायदा आणि अधिक तोटा त्यामुळे झाला असे त्याचे म्हणणे. पण हेही तितकेच सत्य आहे की, निवडणुका जिंकण्याच्या कामी टेलिव्हिजनचा जास्तीत जास्त उपयोग निक्सननीच करून घेतला.

१९७२ सालात अमेरिकेमध्ये घरोघरी टी. व्ही. सेटस लावून बसले होते. २४ तास १४ चॅनेल्सवरून सतत कार्यक्रम चालूच होते. जगभर फिरत असले सॅटेलाईटद्वारा विवक्षित देशात घडणारी घटना त्या देशातील जनतेला कळावयाच्या अगोदर अमेरिकन जनतेला टी. व्ही. सादर करून देणार, अशी परिस्थिती होती. चालू राजकारण, समाजकारण वक्त्यांच्या भाषणातून प्रत्यक्ष ऐकण्यापेक्षा टी. व्ही. वापर करणारे ५ कोटी अमेरिकन घरात आरामशीर बसून वक्त्याला प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहत व कानांनी ऐकत मजा लुटताहेत, अशी ही वेळ होती.

१९०९ साली अमेरिकेत १८७८ दैनिके होती. ती १९७२ मध्ये घटत घटत १७३५ झाली. मुख्य म्हणजे लॉस एन्जेल्स, शिकॅगो, सॅनफॅन्सिको, न्यू जर्सी, बोस्टन, वॉशिंग्टन व न्यूयॉर्क येथील वर्तमानपत्रे बंद पडली व एकाच मालकीची अधिक वर्तमानपत्रे झाली. ह्या कारणामुळे बातम्या एकाच साच्याच्या जनतेसमोर येऊ लागल्या.

१९७२ सालात निक्सन राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीसाठी दुसऱ्यांदा उभा राहिला. त्याला दोन लाखांच्यावर खप असलेल्या ७५३ वर्तमानपत्रांनी पाठिंबा दिला व ५६ वर्तमानपत्रांनी डेमॉक्रेट मॅकगव्हर्नला पाठिंबा दिला.

१९७२ च्या निवडणुकीत निक्सनला मनापासून पाठिंबा न देणारी अशी वॉशिंग्टन पोस्ट, न्यूयॉर्क टाईम्स, सी. बी. एस. कोलंबिया ब्रॉडकास्टिंग स्टेशन–नंतर अमेरिकेतील युनिव्हर्सिटचा–हे सर्व आपले शत्रू आहेत असे निक्सन मानत होता. वैयक्तिक हेवेदावे व दुष्टपणा त्यात काहीच नव्हता. पण 'भूत भूत' म्हणून भुई झोडपण्याचा निक्सनचा तो एक प्रकार होता.

वॉशिंग्टनमध्ये व्हाइट हाऊससमोरच्या एक्झिक्युटिव्ह कार्यालय–इमारतीमध्ये १२२ ते १२७ खोल्यांमधून डॉ. लिंडन ॲलन Press Surviallance चे काम करत असे. त्या ठिकाणी कार्यालयातील स्त्री-पुरुषांचे मुख्य काम वर्तमानपत्रांची छाननी करून त्यातील व्हाइट हाऊसच्या विरुद्ध छापलेला मजकूर काढून त्याचे बरोबर फोटो–नकला काढून त्या निरनिराळ्या खात्यांतून त्याच दिवशी पाठविल्या जात. टेलिव्हिजनमधून निक्सन राजवटीविरुद्ध चाललेला प्रचार, स्तंभलेखक व टीकाकार ह्यांचे लेख देखील त्याच्या त्या दिवशी पॅट बुचावनमार्फत सरकारदरबारी दाखल होत. अमेरिकेतील १७०० दैनिकांचे अंक कार्यालयात येत, त्यांपैकी २९ वर्तमानपत्रांचे अंक फारच काटेकोरपणे तपासले जात.

हल्डमनच्या हाताखालचे हे खाते सकाळी ७ वाजता कामाला लागे ते रात्री २ वाजेपर्यंत.

सरकारच्या अत्यंत गुप्त फायलीमधून चोरून आणलेले pentagon papers जून १९७१ पासून वॉशिंग्टन पोस्टनी छापण्यास सुरुवात केली व निक्सन सुप्रीम कोर्टापर्यंत लढून शेवटी केस हरला, त्यामुळे वर्तमानपत्रांच्यावर करडी नजर ठेवण्याचे हुकूम सुटले. त्यांच्याबरोबरचे हाडवैर दिवसानुदिवस वाढतच चालले. बातमीदाराचे व्हाइट हाऊसमधील मेळावे व निक्सनशी प्रश्नोत्तरे हे कार्यक्रम रद्द होऊ लागले. कारण बातमीदारांच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे देणे निक्सनला कठीण होऊन बसले.

निक्सनने ह्या वेळी टी. व्ही. व रेडिओ ह्यांचा उपयोग फार मोठ्या प्रमाणावर करून घेतला. १९७२ मध्ये तर 'Nixon from peking', 'Nixon from Shanghai', 'Nixon from Moscow', 'Nixon from Kiev', 'Nixon from Hawai', अशा बातम्या टी. व्ही. व रेडिओवर सारख्याच येत होत्या व ह्याशिवाय त्या त्या देशांना भेटी देऊन आल्यावर पुन्हा टी. व्ही. वर भाषणे होणार ती वेगळीच. १९७२ सालांत त्याची एकंदर १४ भाषणे झाली. १९५२ मध्ये निक्सनने टी. व्ही. वर पहिले भाषण केले व त्यात त्यांनी उल्लेखिलेल्या 'I am not a crook I am an honest man.' ह्या वाक्याचा डंका त्याला थेट १९७४ पर्यंत ऐकावा लागला.

Creep चा कार्यक्रम अमेरिकेच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचत होता. रेडिओ व टेलिव्हिजनद्वारा उठावदारपणे प्रसृत होत होता व निक्सन नक्कीच निवडून येणार ही चिन्हे स्पष्ट दिसत होती.

व्हिएटनाममधील युद्ध अमेरिका हरत होती, हे प्रत्येकाला कळत होते. पण लढाईवर गेलेले अमेरिकन परत आणले जात होते. निक्सनच्या परदेशांत सारख्या वाऱ्या चालू होत्या व आजचे मरण उद्यावर जात होते; हे देखील अमेरिकन जनता जाणत होती.

१९७१ च्या डिसेंबरमध्ये हिंदुस्थान-पाकिस्तान युद्ध सुरू झाले. Balance of power हे तत्त्व पुढे करून निक्सनने त्यात तोंड घातलेच. U. S. S. enterprise–nuclear–powered aircraft carrier की, ज्यावर पाच हजार खलाशी होते. ७५ विमाने व ५ हेलिकॉप्टर्स होती–अशी युद्धनौका king, Decatur आणि parsons ह्या तीन guided Missile Destroyers, Bausall, Orleck, Mekeen आणि Anderson ह्या चार Gun-Destroyers आणि Tripoli हे हेलिकॉप्टर्स वाहून नेणारे जहाज, विचिलियासारखी अगडबंब तीन मालवाहू जहाजे ही बंगालच्या सामुद्रीधुनीपासून १०० ते १५० मैल अंतरावर उभी केलेली होती. ह्याला Task Force 74 हे नाव होते. Enterprise आणि इतर विनाशिका

व्हिएटनामकडून बंगालच्या सामुद्रधुनीकडे येत होत्या.

रशियन युद्धनौका देखील बंगालच्या सामुद्रधुनीकडे येत होत्या व त्यांचा शह अमेरिकेच्या आरमाराला मोठ्या प्रमाणावर होता.

१५ डिसेंबर १९७१ ला चीनच्या परराष्ट्र खात्याने तिडीक उठली व त्यांनी Indian Embassy कडे खलिता पाठविला की, चायना-सिक्कीम सीमा काही हिंदी सैनिकांनी ओलांडून गोळीबार केलेला आहे. १९६१ पासून असे खलिते अनेकवेळा चीनने धाडले होते आणि ते सर्व बिनबुडाचे होते. तसाच हाही खलिता होता. रशियाने सिंकियांगच्या सीमेवर लष्कर ठेवलेच होते व जर चीनने हिंदुस्थानच्या सरहद्दीवर आक्रमण केले असते तर रशिया तिकडून उठला असता हे चीन पक्के जाणून होता. म्हणून तो स्वस्थ बसला. रशियन वकील पेगॉव्ह यांनी ही बातमी अगोदरच हिंदुस्थानच्या पंतप्रधानांच्या कानावर घातलेली होती.

डिसेंबर १४ ला संध्याकाळी ६॥ वाजता पाकिस्तानी कमांडर, पूर्व पाकिस्तान भाग, जनरल नियाझी ह्यांनी युद्धबंदी जाहीर केली. सर्व संकट टळले. बंगला देश स्वतंत्र झाला.

'शांतता शांतता' तोंडाने म्हणत निक्सनचे हिंदुस्तानविरुद्ध अशा प्रकारचे चाळे चालूच होते. पेंटॅगॉनच्या गुप्त अहवालावरून जॉन अँन्डरसन ह्या स्तंभलेखकाने लिहून ठेवले आहे की :

: Nixon had placed America on the losing side of Bangla War between India and Pakistan. Nixon could not say so aloud but he considered Pakistan an absolutely essential piece on the worlds'–Chase–board, needed to reach a way into Red-China. If he wanted to go to Peking, Pakistan was a necessary spring-board. He was furious at the disruption of his logical but secret planning.'

१९७२ च्या सुरुवातीला निक्सनला ही थप्पड बसली. परंतु त्याचे पुन्हा निवडून येण्याचे प्रयत्न चालूच होते. CREEP आपले काम उत्तम बजावीत होता.

अमेरिकेतील शिरगणतीप्रमाणे ८६ टक्के मतदार ६० वर्षे वयाचे होते. तेव्हा त्यांना जातीने भेटण्याचे काम टॉड ह्यांनी अंगावर घेतले होते. ते १। वर्षात पुरे केले.

तरुण वर्गामध्ये ३० वर्षे वयाचा केनेथ रिटझ हा हुषार व कर्तबगार तरुण CREEP मध्ये होता. त्याने २५००० तरुण विद्यार्थ्यांचे तांडे उभे करून निक्सनच्या नावाचा झेंडा उंच फडकत ठेवला.

CREEP चे जाहिरात वितरण खाते न्यूयॉर्कला तिसऱ्या अॅव्हेन्यूमध्ये होते व ते संपूर्ण हल्डमनच्या देखरेखीखाली. स्वतः हल्डमन जे. वॉल्टर थॉम्पसन ह्या जाहिरात वितरण संस्थेत पूर्वी काम केलेला माहीतगार. त्या कामात तो मुरब्बी व हातखंडा. त्याने निरनिराळी तरुण कर्तबगार माणसे धुंडून काढून त्यांना त्यांच्या मालकाकडून वर्षाची पगारी रजा द्यावयाला लावून, निवडणूक-प्रचार कामाला लावली होती. त्यांना November Group असे म्हणत असत, आणि ते काम ४१ वर्षांचा पीटर डॅले ह्याच्यावर सोपविलेले होते.

डेमोक्रेटिक पक्ष १० सप्टेंबर १९७२ पासून व रिपब्लिकन पक्ष २५ सप्टेंबरपासून टी. व्ही. वर निवडणूक कार्यक्रम करू लागले.

Public Polls हे अमेरिकेत एक मोठे प्रस्थ. नाही म्हटले तरी मतदानावर त्याचा निश्चितच परिणाम होतो, हे जाणून Harris Poll, Gallop Poll, Sindlinger Poll ह्याच्यावर आपली पक्कड बसविण्यासाठी रॉबर्ट टीटर ह्याची नेमणूक केली होती.

एक वर्षामध्ये निक्सनचे लोक अमेरिकेतील ३१४० परगण्यांमधून १ कोटी ५९ लाख ३२००० घरांतून जातीने भेटून आले.

शहरा-शहरांतून मोठमोठाले फलक लागले.

Winning in politics is not everything.

It's the only thing

'Farewell to Arms! Peace with Honour!'

व्हिएटनाममधून चांगल्या-वाईट बातम्या येतच होत्या. काहीही न करता पॅरिसहून किसिंजर हात हालवीत वॉशिंग्टनला परत आला. १६ ऑक्टोबरला व्हाईट हाऊसमधून त्याने सांगितले : 'Peace is at hand.' युद्ध–शेवट अगदी नजीक आहे!

निवडणुकीसाठी देशभर संचार करीत करीत निक्सनने शेवटचा टप्पा घेऊन तो २७ ऑक्टोबर १९७२ ला क्लिव्हलँडच्या जवळील हॉपकिन्स विमानतळावर भर दुपारी १२ वाजता विमानातून उतरला आणि तेथेच त्याने जाहीर केले : 'Peace is at hand!'

मुळात खरोखरच काही नव्हते. हा निव्वळ election stunt होता.

१९६० ची निवडणूक निक्सनने लढविली. तो त्यावेळी दुःखी, आजारी दिसत होता. १९६२ ची लढविली. तो संतापी व क्रुद्ध दिसत होता. १९६८ ची लढविली. तो दैवावरती भार देऊन होता. आणि आता १९७२ मध्ये तो दमला-भागलेला होता, पण उत्साही अन् आनंदी दिसत होता.

२७ ऑक्टोबरला हॉपकिन्स विमानतळावर उतरल्यावर त्याची मोटार व बरोबरचा सरंजाम मोठमोठाल्या कारखान्यांच्यामधून चालला होता. मध्येच फोर्ड मोटार कारखाना लागला. मोठमोठाले फलक कारखान्यावरून लावलेले कितीतरी लांबवरून दिसत होते.

'Youth for Nixon!'

'Lithuanians for Nixon!'

'Ukranions for Nixon!'

'Italians for Nixon!'

'We love you, Mr. President!'

'We need Nixon!'

मोटारकेड २० मैल प्रवास करून नंतर परमा-ओहिओ ह्या भागातून चालली. एका ठिकाणी वाटेत स्काऊटस् आणि इतर मुली निक्सनचे स्वागत करण्यासाठी हजारोंच्या संख्येनी छोटी छोटी कवने म्हणत उभ्या होत्या. बगळ्यासारखे स्वच्छ पांढरे पोषाख त्यांनी घातले होते. हालतीडुलती-हसणारी मनोहर हिरव्यागार सरोवरातून

**बहात्तरच्या निवडणुकीतला निक्सन दमला-भागला होता पण तरीही उत्साही दाखवत होता....**

पसरलेली पांढरीधोप कमळे दिसावीत, तशा त्या सुंदर-देखण्या, नटल्या-थटलेल्या मुली-मोठे लोभनीय दृश्य होते. निक्सनच्याने पुढे जाववेना. तो तेथे थांबलाच.

चेव आल्यासारख्या बेभान झालेल्या त्या मुली गाणे म्हणत होत्या.

'Nixon gave peace, a chance to walk,
Tricky Dick took the trick
My daddy will be home for Christmas
Nixon is my hero !
Do yourself a favour–vote Nixon
Try him-you will like him
Nixon–the man for no more 'NAH'
Nixon is our President
Peace time is Nixon Time.
Trick or treat, Nixon can't be beat.'

ते गाणे नव्हते, ते कोणा कवीने रचलेले कवन नव्हते, तर CREEP ने जमून आणलेल्या एका प्रसंगातील निक्सन-स्तुतीचे गोडवे होते.

तालासुरावर मुली म्हणत होत्या, म्हणून वाद्यवृंदाच्या आवाजात ते सुरेल गाणे वाटले इतकेच.

निक्सनचा ताफा पुढे सरकला. गाड्या अगदी सावकाश चालल्या होत्या. कारण लहान लहान खेडेगावांत निक्सन-आगमनाची अगोदर वर्दी दिली गेल्यामुळे ठिकठिकाणी रस्त्यावर देखील जमाव उभे होते.

एके ठिकाणी लहानशा टुमदार घरावर फलक लावला होता :

'Mr. president, May I please shake your hand ? :
We lost our son in Vietnam.'

लांबूनच निक्सनला तो फलक दिसला. एकदा वाचून त्याचे समाधान झाले नाही. म्हणून त्याने तो फलक दुसऱ्यांदा वाचला.

त्याच्याने पुढे जाववेना. तो थांबला. मोटारीतून खाली उतरला. रस्त्याच्या कडेला उभे राहून त्याने त्या छोट्या घराकडे नजर टाकली.

घरातून ५५ वर्षांचा फ्रँक लॉरेन आपल्या पत्नीसह पुढे आला. त्यांचा लाडका मुलगा जॉन लॉरेन केवळ २० वर्षांचा, देखणा, रुबाबदार, ठसठशीत बांध्याचा, १८ व्या वर्षी सैन्यात भरती झाला व व्हिएटनाममध्ये प्राण पणाला लावून लढत असता ६ डिसेंबर १९७१ ह्या दिवशी धारातीर्थी मरण पावला. कर्तासवरता मुलगा गेला म्हणून त्या फ्रँक लॉरेन शेतकऱ्याला अत्यंत दुःख झालेले होते. निक्सनला पाहिल्यावर त्या मातापितरांच्या डोळ्यांतून दुःखाश्रू व आनंदाश्रू एकदमच बाहेर पडावयाला लागले. कारण, एकतर राष्ट्रपती निक्सन आपल्याला धीर देण्यासाठी आपल्या झोपडीपाशी येऊन उभा राहिलेला व दुसऱ्या बाजूने हिऱ्यासारखा गुणी मुलगा नुकताच धारातीर्थी पडलेला.

लॉरेनच्या पाठीवरून निक्सनने प्रेमाने हात फिरविला व त्याच्या बायकोशी हस्तांदोलन केले.'

निक्सनचा गळा दाटून आला. सहजोद्गार त्याच्या मुखाद्वारे पडले :

'They give up their lives, but they do it to serve their country. They are Martyrs.'

मॉन्टा कारनर्सला एका शेतकऱ्याच्या दरवाज्याशी घडलेला हा प्रसंग निक्सनच्या मनात घर करून राहिला. ह्या प्रसंगाविषयी सांगताना निक्सनने व्हाईट हाऊसमध्ये पुढील उद्गार काढले.

आपला देश हा महान देश का आहे हे मला मी जेव्हा फ्रँक लॉरेन व त्याची पत्नी ह्यांच्याबरोबर बोलायला लागलो तेव्हा कळले.

धारातीर्थी पडलेल्या शूर वीराच्या मातेचे एकच म्हणणे मला दिसले की, अशा तरुण अमेरिकेच्या सुपुत्रांची यज्ञातील आहुती निरर्थक जाऊ नये. आपल्या झोपडीवर मोठा थोरला फलक लावून त्या स्त्रीला मला हे सांगावयाचे होते.

मला हे युद्ध १९६९ लाच बंद करावयाचे होते. पण तसे मी ताबडतोब केले असते तर अडकलेले सैन्य परत आणणे कठीण गेले असते. म्हणून युद्धबंदी सावकाशीने करावयाची हा मी निर्णय घेतला. आणि मग असे दिसले असते की, जे तरुण योद्धे व्हिएटनाम भूमीवर लढले आणि मेले त्यांचा स्वार्थत्याग फुकट गेला असता.

माझी एकच इच्छा आहे की, जगात पुढे युद्धे होऊ नयेत. व्हिएटनाममधील युद्ध शेवटचेच ठरावे.

यज्ञात आहुती दिलेल्या सैनिकांच्या मुलाबाळांना व नातेवाइकांना जगभर सर्वत्र शांतता प्रस्थापित झाली आहे, हे चित्र दिसले म्हणजे माझे सर्व कार्य संपले असे मी समजेन !

७ नोव्हेंबर १९७२ ला राष्ट्रपतिपदाच्या निवडणुका झाल्या. निक्सनला ६०.८ टक्के जनमत मिळाले व ९७ टक्के निवडून आलेल्या उमेदवारांचे मत मिळाले. दक्षिण अमेरिकेमधून पूर्वी रिपब्लिकन पक्षाला इतका पाठिंबा नव्हता. १९७२ मध्ये सर्वच्या सर्व दक्षिण भाग निक्सनने काबीज करून टाकला.

ह्या निवडणुकीचा विशेष म्हणजे कॅथॉलिक समाज जो पूर्वी डेमॉक्रेटिक पक्षाचा होता तो ह्यावेळी रिपब्लिकन निक्सनचा पाठीशी उभा राहिला. हडसन कौंटी, न्यू जर्सी, बिटसबर्ग, पेनसिल्व्हानिया, अल्बनी, बफेलो, न्यूयॉर्क, हार्टफोर्ड कौंटी आणि कनेया बटकर्ट– येथील सर्व कॅथॉलिक मतदान निक्सनच्या खिशात पडले.

१९६० व १९६८ मध्ये न्यूयॉर्क स्टेटनी निक्सनला धूळ चारली होती, ते स्टेट देखील ह्यावेळी निक्सनच्या पाठीमागेच धावले.

C. B. S. नी निवडणुकीची छाननी करून घोषित केले की, डेमॉक्रेटसपैकी ३७ टक्के मतदारांनी निक्सनलाच मते दिली.

निक्सनला Italian Americans नी ५१ टक्के, Polish Americans नी ३० टक्के, Spanish Americans नी ३१ टक्के, कारखानदार मजूर ५५ टक्के, कॅथॉलिक्स ५३ टक्के आणि शिकलेला नोकरवर्ग ६२ टक्के असे मतदान पडले.

असे मतदान पडण्याला ३ कारणे प्रमुखपणे होती–पहिले कारण CREEP ने निवडणुकीवर केलेला प्रचंड खर्च. दुसरे कारण मॅकगव्हर्न आपला पूर्वीचा पक्ष सोडून निक्सनच्या विरुद्ध उभे राहावयाचे म्हणूनच केवळ डेमॉक्रेटिक पक्षात घुसला आणि निवडणुकीला उभा राहिला व तिसरे कारण म्हणजे राजकारणात इतकी बजबजपुरी वाढली होती की, कोणी सज्जन व्यक्ती डेमॉक्रेटिक पक्षाच्या तिकिटावर उभे राहण्यास तयार झाली नाही.

१९५२ मध्ये निक्सन उपराष्ट्रपतिपदावर निवडून आल्यावर प्रसिद्ध स्तंभलेखक ड्यू अँडरसन म्हणाला होता : I don't know why, but I do not trust Nixon.' आणि १९७४ मध्ये Theodore white सारखा स्तंभलेखक तसेच उद्‌गार काढतो, 'Richard Nixon was to be sure not a very trusting person. Life has made him that way.'

निक्सन नेहमीच म्हणत असे की, स्वदेशीय राजकारणात काही चुका झाल्या तर त्या एवढ्या घातकी नसतात, पण परराष्ट्रीय राजकारणात चुका झाल्या तर त्या जीवघेण्या ठरतात.

निक्सनच्या स्वतःच्या आयुष्यात मात्र उलटेच झाले. परराष्ट्रीय राजकारणात तो फसला नाही, परंतु घरचेच राजकारण त्याला मारक ठरले. आणि ते प्रकरण म्हणजेच 'वॉटरगेट.'

निक्सनची ओळख जगाला कशी होईल, ह्याचे मूल्यमापन करण्याची वेळ येईल, त्यावेळी 'Would he godown in history as a President of Peace or President of Watergate ?' ह्याचा अवश्य विचार करावा लागेल. आपल्यालाही हे वॉटरगेट प्रकरण काय आहे, ते थोडक्यात समजून घ्यावेच लागणार आहे. तेव्हा आपण तिकडेच वळू या. □

# प्रकरण तेरा । वॉटरगेट धरण फुटले !

वॉशिंग्टनमधील एक्झिक्युटिव्ह ऑफिस बिल्डिंगच्या पाचव्या मजल्यावरील भव्य दिवाणखान्यातील कार्यालयात अमेरिकेचा अॅटर्नी जनरल जॉन मिचेल आपल्या कामात व्यग्र होता. आत जाण्याचा मोठा दरवाजा लावलेला होता. दरवाज्याच्या उजव्या बाजूला John Mitchell A. G. अशी सोनेरी रंगातील पाटी झळकत होती. आणि दरवाज्याच्या वरच्या बाजूला दगडी भिंतीवर जाड ठळक अक्षरात कोरून ठेवलेले बोधवाक्य होते : 'No free Government can survive that is not based on the Supremacy of law'

२७ जानेवारी १९७२. दुपारचे ३॥ वाजलेले होते. बाहेरच्या दिवाणखान्यात मिचेलला भेटण्यासाठी निक्सनचा खास सल्लागार जॉन एफ. डीन, Deputy Director in White House for Communications, जेब मॅगरूडर व जॉन एहरलिचमन ह्याच्या कार्यालयात काम करणारा गॉर्डन लिडी, असे तिघेजण एका लांब प्रशस्त कोचावर अगदी बारीक आवाजात एकमेकांशी विचारविनिमय करण्यात दंग झाले होते. लिडीच्या हातात गुंडाळी केलेल्या कागदांचे बंडल होते व डीन आणि मगरूडर यांच्या मांडीवर आणि हातात बांधलेली पुस्तके आणि फायली होत्या. लिडी बोलत होता ते डीन ध्यान देऊन ऐकत होता व त्याच्या चेहऱ्यावरील हावभावावरून त्याला हे नक्की वाटले होते की, लिडी हा किती बुद्धिमान मनुष्य असावा !

मॅगरूडरने आपल्या मनगटावरील घड्याळ पाहिले. चार वाजण्याला दोन मिनिटे कमी होती. हातातल्या पुस्तकांची व फायलींची त्याने जुळवाजुळव करावयास सुरुवात केली. चारचे ठोके पडले.

दरवाज्यावरील पाटीकडे पाहत लिडी म्हणाला :

'Correct ! Simply Correct ! There must be supremacy of law.'

तिघेही जण हसत हसत हलकेच दरवाजा उघडून मिचेलच्या चेंबरमध्ये गेले. डीन व मॅगरूडर मिचेलला नेहमीच भेटत असत. पण लिडी आज मिचेलच्या चेंबरमध्ये प्रथमच आलेला, ४ वाजताची येण्याची वेळ अगोदरच ठरवून ठेवलेली असल्यामुळे आत गेल्याबरोबर चौघांचे इकडचे तिकडचे बोलणे सुरू झाले. मिचेल उठला व खुणेने त्याने त्या तिघांना आतल्या दुसऱ्या चेंबरमध्ये येण्याविषयी सुचविले.

लिडीने आपले गुंडाळून आणलेले कागदपत्र सोडले. निरनिराळ्या बाजूंनी विचारविनिमय सुरू झाला. लिडी जवळजवळ अर्धा तास बोलतच होता.

'Mugging Squads, Sabotage,–Kidnapping,–use of Prostitutes for political black mail, Break–ins, Electronic Surviallance, Wire Tapping...'

एकेकापेक्षा एकेक वरचढ परंतु भयानक गोष्टींचे चित्रण लिडी आपल्या वाक्चातुर्याने तिघांच्या पुढे व्यवस्थित मांडणी करून ठेवीत होता. त्याचे बोलणे चालूच होते.

'नायकिणी ज्या आणावयाच्या त्या अगदी बऱ्या घराण्यातील मुली–देखण्या–तरतरीत–उमद्या, डेमोक्रेटिक पक्षाच्या मियामी येथे होणाऱ्या अधिवेशनात येणाऱ्या सभासदांवर पूर्ण छाप टाकणाऱ्या...'

त्याची पंजाब मेल चालूच होती.

'आणि ह्या सर्व कामाकरिता कमीत कमी १० लाख डॉलर्स तरी आपल्याला Creep फंडातून बाजूला काढून ठेवावे लागतील. पण काम असे फत्ते होईल की, विचारायची सोय नाही. आपल्याला निवडणूक हमखास जिंकता येईल.'

मिचेलनी हटकले,

'I do not reject the entire plan but I feel there is need for intelligence–gathering and I am interested in the wire–tapping aspect of the plan.'

डीन व मॅगरूडर तर थाटच पडले ! स्तंभित झाले. त्यांच्याच्याने काहीच बोलवेना. मिचेल म्हणाला, आराखडा पुन्हा दुरुस्त करून आणला म्हणजे आपण खर्चाचा अंदाज बांधू.

ह्या २७ जानेवारी १९७२ ला नको ते सैतानी व राक्षसी विचार मिचेलसारख्या उच्चपदस्थ राजकारणी पुरुषाच्या डोक्यात शिरले ! बस–येथूनच खरे 'वॉटरगेट–नाटच' सुरू झाले.

दुसरी मुलाखत ४ फेब्रुवारी सकाळी ११ वाजता घेण्याची ठरली.

तीन फेब्रुवारीला लिडीने जेब मॅगरूडरकडे जाऊन ' Amendea and revised espionage proposal ' आणून दाखविले आणि सान्या कामाला अगदी काट-छाट करून पाच लाख डॉलर्स तरी खर्च येईल असे सांगितले. मॅगरूडरने मिचेलच्या कानावर हकीकत घातली.

ठरल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी ११ वाजता मॅगरूडर लिडीला घेऊन मिचेलच्या चेंबरमध्ये गेला. काही मिनिटांत जॉन डीन पण तेथे आला. अंदाजे दहा मिनिटे बोलणे झाले. बऱ्याचशा फालतू बाबींना फाटा देऊन सध्या फक्त Break–ins, Wire–tapping and Electronic Surviallance ह्या गोष्टींवर भर दिला जावा असे ठरले. सर्वांनी एका गोष्टीला मान्यता दिली.

' The priority should go to Larry O ' Brian 's office at the Democratic National Committee in the Watergate–Complex. '

ह्या बैठकीत बहुतेक सर्व ठरले. फक्त पैशाचे नक्की झाले नव्हते, म्हणून पुन्हा एकदा भेटण्याचे ठरवून तिघेजण मिचेलच्या चेंबरमधून बाहेर पडले आणि आतमध्ये मिचेल स्वतःशीच काहीतरी पुटपुटत हसत होता.

ह्याच फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात आय. टी. टी. कडून खाल्लेल्या चार लाख डॉलर्सचे प्रकरण सिनेट कमिटीपुढे चालू झालेले होते. आणि ह्यामुळे मिचेलला लिडीबरोबर अधिक वाटाघाटी करण्यास वेळ मिळाला नाही. १ मार्च १९७२ ला मिचेलनी अॅटर्नी जनरलपदाचा राजीनामा दिला व Creep च्या डायरेक्टरपदाची सूत्रे हातात घेतली. त्यामुळे लिडीशी पुढील भेट वॉशिंग्टनला न घेता ती ३० मार्चला की-बिस्कायने येथे घ्यावी लागली. मॅगरूडर व बॉन हे पण हजर होते. लिडीला ह्या सर्व कामाबद्दल २ लाख ८० हजार डॉलर्स देण्याचे ठरले.

अमेरिकेचा ३७ वा राष्ट्रपती रिचर्ड मिल्हूस निक्सन ह्याच्या मंत्रिमंडळातील प्रथम श्रेणीचा ज्येष्ठ व श्रेष्ठ सभासद अॅटर्नी जनरल मिचेल, लिडीसारख्या अत्यंत निंद्य, दुष्ट, बाहेरख्याली आणि लफडेबाज अशा व्यक्तीला हाताशी धरतो आणि त्याला Creep कडे जमा होणाऱ्या पैशांतून २ लाख ८० हजार डॉलर्सची खैरात करतो. किती निंद्य आणि भयानक कृत्य हे !

' हे असं का करावं लागलं '–याच्या पाठीमागील भूमिका नीटपणे ध्यानात घेतल्यावाचून पुढे जाणेच कठीण आहे.

**PLUMBER'S UNIT :**

१३ जून १९७१ पासून न्यूयॉर्क टाइम्सने Pentagon Papers क्रमशः रोज प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली. जनतेला विश्वासात न घेता, सिनेट वा काँग्रेसची परवानगी न घेता, कायदेशीर युद्ध न पुकारता, अमेरिकेच्या पाच राष्ट्रपतींनी हाताळलेले १९४५ ते १९६८ पर्यंतचे व्हिएटनाम युद्ध की, ज्याच्यात अब्जावधी डॉलर्स खर्च झाले आणि लाखो अमेरिकन तरुण युद्धभूमीवर पडले, त्याची सत्यकथा म्हणजे हे ' Pentagon Papers. ' खरी माहिती बाहेर आलीच नव्हती. सर्व गुपित. निक्सनच्या अंगाचा तिळपापड उडाला. त्याने पेंटॅगॉन छापण्यावर बंदी घातली. न्यूयॉर्क टाइम्सने न्यायालयाकडे धाव घेतली. युनायटेड स्टेटस सुप्रीम कोर्टाने ३० जून १९७१ ला निर्णय दिला की, अशी बंदी सरकारला घालता येणार नाही. National Security (राष्ट्र–सुरक्षितता) ह्या नावाखाली अशा गोष्टी जनतेपासून लपवून ठेवण्याचा अधिकार राष्ट्रपतीला दिलेला नाही. निक्सनला फार मोठा धक्का बसला. हे अत्यंत गुपित असे कागदपत्र बाहेर कसे पडले, न्यूयॉर्क टाइम्सच्या हातात कोणी आणून दिले, ते सर्व हुडकून काढण्याचा निक्सनने हुकूम दिला. FBI व CIA कडून चौकशी बरोबर होणार नाही, असा मिचेलनी सल्ला दिला आणि त्यातूनच २० जुलै १९७१ ला वॉशिंग्टनमध्ये ' PLUMBERS UNIT ' जन्माला आले.

To plumb the leakages–गुप्त बातम्या फुटतात, गुप्त कागदपत्रे पसार होतात ह्याचा बंदोबस्त करण्याचे काम Assistant to the President in Domestic Affairs जॉन एहरलिचमन ह्या व्यक्तीवर निक्सनने सोपविले आणि त्याच्याच आशीर्वादाने निघालेले हे ' Plumber's Unit. ' ह्या युनिटमध्ये एहरलिचमनचे चार हस्तक होते. एजिल क्रोग, डेव्हिड यंग, गॉर्डन लिडी व हॉवर्ड हंट.

२३ जुलै १९७१ ला विल्यम बेचर ह्या न्यूयॉर्क टाईम्सच्या बातमीदाराने ' Salt– Strategic Arms Limitation ' ह्या विषयावरील रशियाबरोबर चाललेली निक्सनची बोलणी फिसकटली, ही सनसनाटी बातमी दिली. निक्सन अधिकच भडकला. वर्तमानपत्रांचा काटा काढण्याचा त्याने चंग बांधला.

२४ जुलैला एहरलिचमन व क्रोग यांना निक्सनने बोलावून घेतले. ह्या भेटीत काय झाले हे पुढे वर्षानंतर निक्सनने एका मुलाखतीत सांगितले, ते असे :

' क्रोगला मी हे स्पष्ट सांगितले होते की, तुमच्या प्लंबर्स युनिटचे आताचे महत्त्वाचे काम फक्त एकच की, एल्ल्सबर्गच्या विषयी संपूर्ण माहिती काढून आणणे. ' पेंटॅगॉन पेपर्स ' त्याने पसार केले, तेव्हा आणखी असेच काय काय उद्योग केले असतील त्याची तपासणी ताबडतोब केली गेली पाहिजे. ' राष्ट्रीय सुरक्षितता ' ह्या सदराखाली मला ते करावेच लागेल. परंतु बेकायदा गोष्टींचा अवलंब त्यासाठी करावा ह्याला मी कधीच संमती दिली नव्हती. '

निक्सनच्या हाताशी FBI व CIA सारख्या मजबूत व अत्यंत व्यवस्थेशीर चाललेल्या संस्था असताना ह्या निराळ्या Plumber's Unit ची काय आवश्यकता होती, हेच ध्यानात येत नाही.

माकडाच्या हातात कोलीत देण्याचाच हा एक प्रकार. ते जे आग लावीत सुटले त्यात सर्व व्हाईट हाऊस भस्मसात होऊन गेले.

एक्झिक्युटिव्ह बिल्डिंगच्या तळघरातील प्रशस्त १६ क्रमांकाची खोली Plumber's Unit ला दिलेली होती. एहरलिचमन हा त्या युनिटचा मुख्य. FBI वरील त्याचाही विश्वास उडालेला होता. त्यालाही काहीतरी Sensational–प्रक्षोभजनक पाहिजेच होते.

खोलीच्या दरवाज्यावर पाटी होती, ' PLUMBERS. '

१९६८ मध्ये निक्सनच्या ' Foreign Affair ' परराष्ट्रीय राजकारणावरील सल्लागार, हुषार, कर्तबगार, निर्लेप वृत्तीचा मुत्सद्दी–किसिंजरच्या तोडीचा– डॉ. रिचर्ड अॅलेन हा ३० जुलैला दुपारी तळघरातील एका कार्यालयातून वरच्या मजल्यावर जात असताना त्याच्या नजरेला १६ क्रमांकाच्या खोलीच्या दरवाजावर ' Plumbers ' ही पाटी दिसली. हळूच दरवाजा उघडून तो आत गेला. समोर खुर्चीवर डेव्हिड यंग असलेला त्याला दिसला. यंगच्या

हातात निक्सनचे Six Crisis हे पुस्तक होते व तो त्यातील अल्जर हिसचे प्रकरण वाचीत होता.

डॉ. ॲलनमी विचारले, 'What did this signboard mean?'

यंग उत्तरला, 'I am a Plumber. I fix LEAKS'.

त्याच्या बोलण्यात खोच होती, खुनशीपणा होता. दात काढून निर्लज्जपणाने तो फिदीफिदी हसला. डॉ. ॲलननी खोलीत सभोवार नजर टाकली. Foreign Affairs मासिकाचे बरेचसे जुने अंक, वर्तमानपत्रांतील कात्रणे, एक कपाटभर पुस्तके, शेजारी एक तिजोरी, टेबलावर तीन फोन्स ॲलनला दिसले.

गंभीर आणि भीतिदायक चेहऱ्याचा डॉ. ॲलन खोलीबाहेर आला. नकळत त्याच्या तोंडातून शब्द बाहेर पडले, 'Oh my God, what are they doing?' ...आणि दरवाजातच त्याला बाहेरून आत येणारी हंट व लिडी ही बदमाषांची जोडगोळी भेटली डॉ. ॲलनचा चेहेरा संतापाने लाल झाला. खाली मान घालून तो वरच्या मजल्यावरील १०६ नंबरच्या खोलीमध्ये आपल्या कामासाठी निघून गेला.

तळघरातील १६ नंबरच्या खोलीच्यावर पहिल्या मजल्यावर १०६ नंबरची विस्तीर्ण खोली. त्या खोलीत Kings Row चे कार्यालय होते. त्यात बुचानन, प्राइस, सफायर कॉलसन, हर्बर्ट क्लीन व कॉर्डन हल ह्यांची कार्यालये. ह्यां पहिल्या मजल्यावरील वातावरण किती शांत, गंभीर व पवित्र आणि तेच बरोबर खाली तळघरातील १६ नंबरच्या खोलीमध्ये घाण, दुर्गंधी, बदमाषांचा अड्डा.

ह्या युनिटमधील एजिल क्रोग ही व्यक्ती अत्यंत बुद्धिमान, सरळमार्गी आणि स्वच्छ अंतकरणाचा एक माणूस. सिटल येथील सॉलिसीटर्सकडे एहरलिचमनच्या बरोबर तो कामाला होता. चांगले आयुष्य चालले होते, परंतु एहरलिचमनने त्याला व्हाईट हाऊसमध्ये आणले. त्यावेळी बाहेरच्या बुद्धिमंतांना व्हाईट हाऊसमध्ये जाण्याचा भयंकर षोक होता. ती एक अभिमानाची व मानाची गोष्ट वाटत होती. पहिल्यांदा तो गृहखात्यात काम करू लागला. त्या खात्याचे Drug Traffickeering जोड खाते होते. त्या खात्यामार्फत जंगामध्ये अफू, गांजा, भांग, चरस व इतर अंमली पदार्थांचा जो चोरटा व्यापार चालत असे, त्याची तपासणी व गुन्ह्यांना आळा घालण्याचे काम होत असे. ह्या खात्याचा मुख्य म्हणून एजिल क्रोगची नेमणूक झाली. त्या ठिकाणीच त्याची हंट व लिडी ह्या जोडगोळीशी प्रथम भेट. वास्तविक अशा कर्तबगार निर्व्यसनी माणसाची अशा खात्यात नेमणूक करावयास नको होती. पण त्याचेच दुर्दैव ओढवले, दुसरे काय ?

ह्याच खात्यातून एकसारखे व्यसनी, लाचखाऊ, बदमाश, निर्लज्ज आणि थापेबाज असे लोक फिरत असतात. आणि एक वर्षभर ह्या वर्गात मिसळल्यामुळे एजिल क्रोग पार पालटून गेला. तो पूर्वीसारखा शुचिर्भूत राहिला नाही. Plumbers Unit मध्ये दाखल झाला!

दुसरी व्यक्ती— डेव्हिड यंग. डॉ. किसिंजरच्या कार्यालयातील हा Appointments Secretary कामाची बदली करून घेऊन एहरलिचमनच्या कार्यालयात कामाला गेला. व नंतर Plumbers Unit मध्ये टाकला गेला.

तिसरी व्यक्ती इ. हॉवर्ड हंट : सी. आय. ए. एजंट. तेव्हा तो काय किंमतीचा मनुष्य होता हे सहज समजण्यासारखे आहे. निक्सनचा खास सल्लागार चार्लस कॉलसन ह्याच्या कार्यालयात रोज १०० डॉलर्स पगारावर कामाला राहून त्याने थोडक्याच अवधीत व्हाईट हाऊसला लाचखाऊ बनविले. १९७० व १९७१ मध्ये ह्याचे Wire Tapping व Surviallance चे उद्योग चालूच होते. ४० वर्षांचा हा हंट एक नंबरचा भांडकुदळ, उथळ विचाराचा, विचित्र स्वभावाचा, काहीतरी उलटसुलट व चमत्कारिक करण्याकडे मनोवृत्ती असलेला— पहिल्यांदा पोलीस कोर्टात वकिली करीत होता. नंतर सरकारी वकील झाला. त्यानंतर व्हाईट हाऊसमध्ये कोषाध्यक्षाच्या खात्यात युजिन न्होडाइडस ह्या अंमलदाराच्या हाताखाली नोकरी. तेथेही तंटे-बखेडे. आणि शेवटी कॉलसनच्या हाताखाली. वेडीवाकडी व चाकोरीबाहेरची कामे करण्याची भयंकर हौस आणि आवड.

चवथी व्यक्ती गॉर्डन लिडी. पूर्वी FBI मध्ये गुपित खात्यात काम केलेला. न्यूयॉर्क शेजारील डचेस कौंटी येथील कोर्टातून कामे केलेला किरकोळ वकील. राजकारणात लुडबुड करण्याची आवड. वर्तनाने मत्सरी, कृतघ्न, बंडखोर व लहरी. अशी ही व्यक्ती व्हाईट हाऊसमध्ये घुसली आणि व्हाईट हाऊस बदनाम करून बाहेर पडली. कोठे काय नासधूस करावयाची, कोठे धांगडधिंगा घालावयाचा, कोणाला उगीचच बदनाम करून समाजातून उठवायचे ह्या गोष्टीतच त्यांचा मेंदू तीक्ष्ण. केव्हाही आणि कोठेही तो भेटला तरी बोलणे त्याच प्रकारचे, त्याच थाटाचे. कसलेही आराखडे बॅगेत नेहमी तयार. हजरजबाबी. बोलणे अव्वाचेसव्वा, आणि पाहिजे तेवढे. तुम्हाला ऐकून कंटाळा येईल एवढे.

निक्सनचा कायदेकानू सल्लागार जॉन डीन—एक हुशार व तरुण वकील. तडफदार व ऐटबाज, परंतु गतआयुष्य थोडेसे डागाळलेले. मिचेलचा त्याच्यावर पूर्ण लोभ. १९७० च्या आसपास कॉलफील्ड म्हणून डिटेक्टिव्हचे काम केलेली, १९६८ च्या निक्सन निवडणुकीत नियडणूक-मंडळातर्फे डिटेक्टिव्ह असलेली, अशी व्यक्ती लिडीच्या संपर्कात आली. त्यांनी Private Detective Firm काढून तिला नाव दिले होते, 'SAND WEDGE.' जवळ जवळ Plumbersच्या थाटाचीच, पण लवकरच बुडाली, कारण मिचेल-एहरलिचमन ह्यांचा आशीर्वाद नव्हता. तो प्रयत्न फसला म्हणून जॉन डीनने बाजूला राहून दुसरा प्रयत्न केला व तो म्हणजे लिडीला मॅगरूडरमार्फत मिचेलला भेटवून Plumbers स्थापन करणे. प्लंबर्स स्थापन झाले ते अशा भूमिकेवरून.

ह्या प्लंबर्सकडे एहरलिचमनच्या मार्फत निक्सनने खालील तीन कामे सध्या तरी सोपविली होती :

१. पेंटॅगॉन पेपर्स चोरून आणून वॉशिंग्टन पोस्टकडे ज्यांनी दिले त्या एल्सबर्गच्या व त्याच्या डॉक्टरच्या—फिल्डिंगच्या—घरांवर व कार्यालयांवर धाड घालून कागदपत्र असतील तर ते गायब करणे.

**'Oh! my God; what they are doing?....'**

२. एडमंड मस्की व जॉर्ज मॅकगव्हर्न हे १९७२ च्या निवडणुकीला उभे राहणार असल्यामुळे त्यांच्या गोटात हेर सोडून गुलदस्तातील बातम्या व कागदपत्र मिळविणे.

३. एडवर्ड केनेडीच्या CHAPPAGUIDDICK प्रकरणाचा पूर्ण छडा लावणे.

आणि ५ मार्च १९७२ ला पुढील कामे करण्याची जबाबदारी मिचेलनी प्लंबरवर सोपविली.

१. आय. टी. टी. प्रकरणातील डिटा बिअर्ड ही डेनेव्हर येथील हॉस्पिटलमध्ये लपून राहिलेली होती, तिच्याकडून २७ जूनला तिने लिहिलेल्या मेमोबद्दल, तो निखालस खोटा व बनावट असल्याचे वक्तव्य तयार करून घेऊन ते प्रसिद्धीसाठी वर्तमानपत्रांकडे परस्पर देण्याची व्यवस्था करणे.

२. ३ डिसेंबर १९७१ ला हिंदुस्थान–पाकिस्तान ह्यांच्यामध्ये सुरू झालेल्या युद्धात निक्सन–किसिंजर ह्या जोडगोळीने युद्ध अधिक पेटविण्यासंबंधी जे डावपेच केले अन् त्यांना अखेर आपटी खावी लागली त्याचे गुप्त अहवाल सरकारदरबारातून पळवून नेऊन त्याला प्रसिद्धी देण्याचे जे उपद्व्याप जॅक अॅन्डरसन ह्या स्तंभलेखकाने केले ते अहवाल त्याला कोणी दिले त्याचा छडा लावणे.

इकडे एहरलिचमन–मिचेल–निक्सनच्या ह्या कारवाया चालू होत्या व तिकडे हल्डमन, त्याचा हस्तक ड्वाईट चॅपीन व सेग्रेटी वकील हे त्रिकूट तशाच प्रकारचे गलिच्छ काम करण्यात गुंतलेले होते.

दोन्हीही 'teams'कडून काहीही काम झाले नाही, कारण नुसतेच पैसे उधळणे व चैन करणे, हे त्यांचे काम होते. पण नको ते लफडे मात्र उभे राहिले व ते म्हणजे 'वॉटरगेट!'

ह्या सर्व कामांसाठी पैसा पुरविण्याचे काम मॉरिस स्टान्स ह्याने आपल्या शिरावर घेतले होते. मॉरिस स्टान्स हा अगदी सुरुवातीला एका बँकेत नोकर–पुढे बँकर–नंतर १९६८ मधील निक्सन–निवडणूक मंडळाचा खजिनदार. श्रीमंत वर्ग, कारखानदार ह्यांच्यावर फार मोठे वजन. ह्याने १९६८ च्या निवडणुकीसाठी तीन कोटी चाळीस लाख डॉलर्स जमा केले होते व आता १९७२ च्या CREEP फंडासाठी एकूण पाच कोटी वीस लाख डॉलर्स जमा करण्याचा त्याने संकल्प सोडला होता: एका लेखकाने त्याचा उल्लेख Greatest Fund–Raiser in America असा केलेला आहे. इतक्या हिंमतीचा हा मनुष्य होता. त्याची इच्छा रशिया किंवा अन्य मोठ्या देशांत अमेरिकेचा वकील म्हणून जाण्याची होती. पण निक्सनच्या गलिच्छ राजकारणात त्याने आपले हात बरबटून घेतले. त्याच्या कर्तबगारीवर बोळा फिरविला गेला.

१९७१ च्या मध्यापासून चेक्स, ड्राफ्टस आणि रोकड ह्या रूपात CREEP फंडाकडे पैशांचा ओघ लागून राहिला होता.

बरेच महिने लोंबकळत राहिलेला Federal Election Compaign Act काँग्रेसमध्ये ७ एप्रिलला पसार झाला. ह्या तारखेनंतर राजकीय निवडणुकांसाठी जो कोणी १०० डॉलर्सच्या वर रक्कम देईल त्याचे नाव व्हाईट हाऊसमध्ये विशिष्ट खात्यात व वर्तमानपत्रांतून जाहीर केले गेलेच पाहिजे, असे बंधन आले. CREEP मध्ये फंड देणारांची व घेणारांची ह्या ७ एप्रिलच्या अगोदर २–३ दिवस एवढी विलक्षण धावपळ झाली व तारांबळ उडाली की, काही विचारायची सोय नाही. मोठमोठ्या रकमा ज्याच्याकडे जमा झाल्या, त्या नोंदी दिल्यावाचूनच तिजोरीत जाऊन पडल्या. त्या सुमारास आलेले चेक्स व ड्राफ्टस वाटेल त्या नावावर दिले गेले. ते बिन-हिशेबी खात्यात जमा होऊन, भलत्याच माणसाच्या हातात त्याच्या रोकड रकमा खेळू लागल्या. ह्या प्रकरणात पुढे न्यायालयात झालेल्या जबान्यांवरून, मॉरिस स्टान्स, कामबाच वकील, ह्यू स्लोन्स, जेब मॅगरूडर, लिडी, हंट, डीन, लारू, एहरलिचमन, क्रोग व स्टॅचम ह्यांच्याजवळ बिनहिशेबी लाखो डॉलर्स खेळत होते.

ऑगस्ट १९७१ मध्ये अशाच पैशापैकी लिडी व हंट ह्यांच्याकडे पैसा गेला व त्या पैशाच्या जोरावर एडमंड मस्की व जॉर्न मॅकगव्हर्न ह्यांच्या गोटात हेर पेरण्यात आले.

पेंटॅगॉन येथील व्हिएटनाम युद्धावरील संकलन केलेले गुप्त कागदपत्र चोरण्याचे काम केलेल्या डॅनियल एल्सबर्ग ह्या व्यक्तीवर कसा मारा करावयाचा, हे ठरविण्यासाठी व पाहणी करण्यासाठी लिडी–हंट ही जोडगोळी ५ ऑगस्टला मोठ्या ऐटीत आणि रुबाबात वॉशिंग्टनहून लॉस एंजेलसला विमानाने निघून गेली. ८ दिवसांनी परत आल्यावर त्यांनी एहरलिचमनला अहवाल सादर करताना सांगून टाकले की, FBI चा मुख्य एडवर्ड हूव्हर हा डॅनियल एल्सबर्ग आणि त्याचा सासरा ह्यांचा घनिष्ठ संबंधी असल्यामुळे हे काम Plumbers कडेच सोपविणे श्रेयस्कर ठरेल. वास्तविक निक्सन–हल्डमन–मिचेल–एहरलिचमन हे एडवर्ड हूव्हरचा द्वेष करीत होते, कारण तो त्यांच्या आधीन गेलेला नव्हता. स्वतंत्र बाण्याचा व अत्यंत सचोटीचा असा हा हूव्हर FBI चा मुख्य असून तो ह्या चौघांशी फटकून वागायचा. १९७० सालच्या मे महिन्यातील विद्यार्थी व निग्रो ह्यांचे दंगेधोपे आणि चळवळी ह्याविषयी अगोदरपासूनच निक्सनला हूव्हरने कळविले होते. निक्सन त्याच्या सल्ल्यानुसार वागला नाही. ऑगस्ट १९७० मध्ये तर FBI, CIA, NSA, (National Security Agency) आणि DIA (Defence Intelegence Agency) ह्यांच्या मुख्यांना बोलावून घेऊन विक्षिप्तपणाची योजना आखली गेली. त्याला हूव्हरनी एकदम आक्षेप घेतला. म्हणूनच ती योजना बारगळली. पण पुन्हा त्या योजनेने निराळ्या रूपात आपले काम सुरू केलेच. त्या योजनेविषयी लिहिताना व्हाईट लिहितो,

'What emerged from their discussions a few weeks later was a series of recommendations that apparently envisioned an American Domestic–espionage apparatus of a nature and Scope unpreced-ented in the American process of Domocracy. Burglary, Breaking–in, Wire tapping, all such practices, legal and illegal, started to be used against American Private Citizens.'

काही आठवड्यांनंतर हे स्पष्टपणे दिसून आले की, आतापर्यंत अमेरिकेसारख्या शंभर टक्के लोकशाही राष्ट्रात जे कधीच घडले नव्हते ते करण्याला व्हाईट हाऊस सिद्ध झाले. आणि ते म्हणजे दरोडे, घरफोड्या व खाजगी व्यक्तींच्या टेलिफोनद्वारा चाललेल्या संभाषणाचे टेप्स काढून ठेवून निक्सन सरकारकडे पोहोचते करणे.

निक्सन हूव्हरविषयी खार खात होताच.

एहरलिचमनने लिडी–हंटला काम चालू ठेवण्याचा आदेश दिला.

२५ ऑगस्ट १९७१ पासून हंट व लिडी ह्यांनी डॅनियल एल्सबर्ग व त्याचा डॉक्टर यांच्यावर पाळत ठेवण्यास सुरुवात केली. DE DIEGO MARTINEZ व बार्कर ह्यांना बरोबर घेऊन ३ सप्टेंबरला त्यांनी डॉ. फिलिंगचे राहायचे ठिकाण व चेंबर्सवर दरोडा घातला. फोटो काढून घेतले, कागदपत्रे पळविली आणि एहरलिचमनच्या ताब्यात आणून दिले. दोघांनीही आपल्या बहादुरीचे तिखटमीठ लावून वर्णन केले. दुसऱ्याच दिवशी वर्तमानपत्रांतून बातम्या झळकल्या. हातात काहीही महत्त्वाची बातमी मिळाली नाही म्हणून एहरलिचमन खजिल झाला. त्यांची पाठ थोपटण्याऐवजी व्हाईट हाऊसमधून लिडी-हंटची त्याचवेळी हकालपट्टी केली असती, ' Plumbers ' युनिट बरखास्त करून टाकले असते तर पुढचे वॉटरगेट प्रकरणही झाले नसते. आणि व्हाईट हाऊस वाचले असते.

१ ऑक्टोबर १९७१ पासून Wire Tapping & Electronics surviallance expert जेम्स मॅकॉर्ड हा निक्सन-निवडणूक मंडळाकडे कामाला जाऊ लागला. त्याचे मिचेलच्या घरी नेहमीच जाणे-येणे, त्यामुळे तो सर्वांच्या परिचयाचा झाला. मॅगरूडर, एहरलिचमन, हंट, लिडी ह्यांच्यात तो मिसळू लागला.

९ डिसेंबर १९७१ ला वॉशिंग्टन पोस्टने आय. टी. टी.—लाच प्रकरणाला पहिल्या प्रथम तोंड फोडले आणि चार लाख डॉलर्सची लाच निक्सनला दिल्याचे जाहीर केले. १३ डिसेंबर १९७१ ला जॅक अॅन्डरसनने हिन्दुस्थान-पाकिस्तान युद्धातील निक्सनच्या कुटिल राजनीतीचे वाभाडे काढण्यास सुरुवात केली. ते प्रकरण गुप्त कागदपत्रांवरून घेतल्यामुळे त्या बातम्यांना निराळीच धार आलेली होती.

निक्सन, एहरलिचमन, मिचेल, हल्डमन सगळयांच्या तळपायाची आग मस्तकाला जाऊन भिडली.

आणि अशा परिस्थितीत सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे मिचेलच्या चेंबर्समध्ये २७ जानेवारी १९७२ ला मॅगरूडर, लिडी, डीन जमले आणि त्यांनी Burgalary, Wire-tapping, Break-in Electronic Surviallance ह्याला आपला पूर्ण पाठिंबा दिला. ह्या क्षेत्रांतील जाणकार व दर्दी मॅकॉर्ड हा देखील सामील झाला.

ही २७ जानेवारीची बैठक संपली नाही तोच ३ फेब्रुवारीच्या अंकात न्यूयॉर्क टाइम्सने बातमी छापली की हॉवर्ड ह्यूजेसनी रिचर्ड वॅनरमार्फत निक्सनच्या साक्लेमंटी येथे ५०००० डॉलर्स व कीविस्कायने येथे दुसरे ५० हजार डॉलर्स लाच म्हणून धाडले. वॉशिंग्टन येथील ह्यूजेसच्या कार्यालयात हंट हा १९६९ पासून नोकर व गुप्त माहिती पुरविणारा खबऱ्या म्हणून कामाला होताच व तिकडून त्याला पगार मिळतच असे.

१२ फेब्रुवारी १९७२ ला मिचेलनी आपल्या अॅटर्नी जनरल ह्या पदाचा राजीनामा दिला आणि तो निक्सन-निवडणूक मंडळाचा मुख्य झाला.

९ डिसेंबर १९७१ पासून आय. टी. टी. वरील लेख देता देता २९ फेब्रुवारी १९७२ ला वॉशिंग्टन-पोस्टने डिसा डेव्हिस बिअर्ड हिने आय. टी. टी. चा व्हाईस प्रेसिडेंट मेरियम ह्याला २५ जून १९७१ ला लिहिलेला मेमो छापला आणि ४ लाख देणगी प्रकरण पूर्ण उघड करून टाकले. त्याच दिवशी डिटाने वॉशिंग्टन सोडले आणि डेनेव्हर येथे हॉस्पिटल गाठले. काही दिवस तिचा पत्ताच नव्हता.

कॉल्सनने ह्या कामावर हंटला धाडले. त्याने पत्ता शोधून काढला. डेनेव्हरमध्ये हंट हा ED WARREN ह्या बनावट नावाने फिरत होता. त्याने कॉल्सनच्या सांगण्यावरून रॉकी-माऊंटन हॉस्पिटलमध्ये चार वेळा डिटाची गाठ घेतली. तिच्याकडून एक वक्तव्य तयार करून घेतले की, २५ जून १९७१ चा मेमो, जो न्यूयॉर्क टाइम्सने छापला तो, सपशेल खोटा व बनावट आहे. हे तिचे वक्तव्य वर्तमानपत्रांतून छापण्याची व्यवस्थाही झाली.

निक्सन निवडणूक मंडळाची जागा First National Bank Building मध्ये होती. मूळ कार्यालय वेगळे व खजिनदार ह्याचे कार्यालय वेगळे. ७ एप्रिल १९७२ ला फेडरल इलेक्शन कॅम्पेन अॅक्ट अंमलात आला, त्यावेळी स्टान्सच्या कार्यालयात अक्षरशः लाखो डॉलर्स लॉटरीच्या कूपन्सप्रमाणे फिरत होते. ज्याच्या हातात रोख पैसे येत तो स्वतःच्याच तिजोरीत दाबून टाकीत असे. निरनिराळ्या ठिकाणांहून आलेले चेक्स कॅनडा व मेक्सिको येथील बँकांतून जमा होऊन परत ड्राफ्ट किंवा हुंडयांच्या रूपाने अमेरिकेत येत. मॉरिस टान्सजवळ रोख २॥ लाख, स्लोन्सजवळ १० लाख, हल्डमनजवळ ३॥ लाख, हरबर्ट कामबाचं वकिलाजवळ ३॥ लाख असे बिनहिशेबी रोख डॉलर्स पडून होते. ४ एप्रिल १९७२ ला रॉबर्ट व्हिस्को ह्या बदमाश व दगलबाज व्यक्तीने एक विश्वस्त फंड लुटला व लुटलेल्या पैशांपैकी २ लाख डॉलर्स रोख मिचेलकडे धाडून दिले. तारीख होती १० एप्रिल १९७२. सरकारी अधिकाऱ्यांनी लूटमारीचा अट्टाहासाने शोध लावण्याचा प्रयत्न केला; पण वरतीच दाबादाबी झाल्यामुळे कोण कोणाला पकडणार ?

१२-४-७२ ला स्लोन्सकडून लिडीला ८३,००० डॉलर्स रोख दिले गेले. त्यापैकी लिडीने ६५०००' डॉलर्स जेम्स मॅकॉर्डला टेपरेकॉर्डस, ट्रॉन्झिस्टर्स, वॉकी-टॉकीज खरेदी करून टाकण्यासाठी दिले.

१९६० सालापर्यंत डेमोक्रेटिक पक्षाचे वॉशिंग्टनमधील कार्यालय ' के ' रस्त्यावरील किरकोळ जागेत होते ते जॉन्सनच्या कारकीर्दीत व्हर्जिनिया अॅव्हेन्यूमधील वॉटरगेट बिल्डिंगमध्ये ६ व्या मजल्यावर दहा हजार चौरस फूट जागेत थाटले गेले. त्याचे वार्षिक भाडे ९७,७५० डॉलर्स. खरे म्हणजे निक्सनची पहिली कारकीर्द सुरू झाल्यापासून डेमोक्रेटिक पक्षात काहीच अर्थ राहिला नव्हता. निक्सनलाही उगीचच भीती वाटत होती की, १९७२ सालच्या निवडणुकीत डेमोक्रेटिक पक्ष आपल्याला उत्कृष्ट प्रतिस्पर्धी उभा करील. पक्षाचा अध्यक्ष लॅरी ओब्रायन व खजिनदार रॉबर्ट स्ट्रॉस केवळ वरवरचे काम करण्यासाठी पक्ष-कार्यालयात येऊन बसत असत.

५ मे १९७२ च्या दिवशी मॅकॉर्डने वॉटरगेटसमोरच्या बिल्डिंग-

## इकडे जॅक अॅन्डरसनने निक्सनची झोप उडवली

मध्ये हॉवर्ड जॉन्सन मोटार गॅरेजच्या एका भागात एक खोली भाड्याने घेतली व दरवाज्यावर पाटी लावून टाकली : ' Macord Associates. '

१५ मे १९७२ ला मॅकॉर्ड व लिडी डेमोक्रॅटिक पक्षाच्या कार्यालयाची पाहणी करून आले.

२२ मे रोजी बार्कर, मार्टिनेझ, गोंझालेझ, डी. डिगो, पीको आणि स्टर्गिस मिआमीहून वॉशिंग्टनला येऊन हॅमिल्टन हॉटेलमध्ये उतरले.

येथे त्यांना लिडी, हंट, ग्रेगरी व मॅकॉर्ड भेटले व पुढे ८–१० दिवस त्याच हॉटेलमध्ये बसून दरोडा टाकण्याची तयारी केली गेली.

डेमोक्रॅटिक पक्षाच्या कार्यालयावर दरोडा घालण्याचा पहिला प्रयत्न २६ मे १९७२ ला झाला. त्या दिवशी बार्कर व त्याच्या बरोबरचे पाचजण संबंध कार्यालयाची नीट न्याहाळणी करून परततात व जेम्स मॅकॉर्ड हा आतमध्ये अध्यक्षांच्या खोलीत Electronic devises बसवून telephone tap करून ठेवतो.

२७ मे १९७२ ला कार्यालय फोडण्याचा दुसरा प्रयत्न होतो. पण कुलूप तोडले जाईना म्हणून सर्वजण हॉटेलमध्ये परततात.

२८ मे १९७२ ला गोंझालेझ (कुलुपे तोडण्यात व जोडण्यात एक्सपर्ट) वॉशिंग्टनहून सकाळच्या विमानाने मिआमीस जाऊन कुलुपे तोडण्याची हत्यारे घेऊन संध्याकाळी परत येतो. त्याच रात्री तिसरा हल्ला. मॅकॉर्ड, बार्कर, मार्टिनेझ, गोंझालेझ, स्टर्गिस कुलुपे तोडून आत जातात. कागदपत्रे जमा केले जातात, बरेचसे फोटो काढले जातात. हंट व लिडी कामावर देखरेख करतात व डिअँगो आणि पीको पहारा करतात. ते काम आटोपून ही मंडळी मॅकगव्हर्नचे कार्यालय तोडण्यासाठी तिकडे जातात, परंतु आत ग्रेगरी काम करीत असल्याचे दिसल्यावर हात हलवीत परत निघून जातात.

२९ मे ह्या दिवशी सकाळी बार्कर, मार्टिनेझ, गोंझालेझ, डिअँगो, पीको सर्वजण सकाळच्या विमानाने मिआमीला निघून जातात.

८ जूनला लिडी लॅरी ओब्रायनच्या कार्यालयाचे फोटो, कागदपत्र, काही फोटोस्टॅट नकला जेब मॅगरूडरला देतो. मॅगरूडर मिचेलच्या स्वाधीन करतो. ते कागद व फोटो अगदीच निरुपयोगी असल्याचे दोघेही लिडीला सांगतात. हंट अधिक कागदपत्र आणण्याचे आश्वासन देतो.

१६ जून १९७२ ह्या दिवशी सकाळी मिआमीहून बार्कर, गोंझालेझ, मार्टिनेझ, डिअँगो, पीको, स्टर्गिस वॉशिंग्टनला येऊन वॉटरगेट हॉटेलमध्येच उतरतात. तेथेच त्यांना हंट, लिडी, मॅकॉर्ड भेटतात. रात्री २॥ वाजता म्हणजे १७ तारखेस पहाटे वॉटरगेट बिल्डिंगमधील डेमोक्रॅटिक पक्षाचे कार्यालय फोडले जाते, आत फोटो काढत असतात, कागदपत्रे जमा केली जात असतात आणि हे सर्व काम मॅकॉर्ड, स्टर्गिस, गोंझालेझ, मार्टिनेझ, बार्कर करण्यात गुंतलेले असतात. एवढ्यात पोलीस येऊन त्यांना पकडतात.

रस्त्यावर पाळत करीत राहिलेले हंट व लिडी पसार. जे पाच जण पकडले गेले त्यांनी निरनिराळ्या रंगाचे भारी लोकरीचे सूट घातलेले होते. त्यांच्या हातांवर रबर सर्जिकल ग्लोव्हज होते. वॉकीटॉकी, ४० फिल्म रोल्स, दोन ३५ एम. एम. चे कॅमेरे, कुलुपे तोडण्याची विशिष्ट हत्यारे, टिअर-गॅस आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणे पोलिसांनी जमा केली. पाचही जणांच्या जवळ पैसे होते. कोणाजवळ ७१४ डॉलर्स, ८०० डॉलर्स, २१५ डॉलर्स, २३४ डॉलर्स व २३० डॉलर्स.

पाचही जणांना सकाळी ११ वाजता जज्ज वेल्सनच्या कोर्टात नेण्यात आले. त्यावेळी जामीन कोणालाच दिला गेला नाही. मॅकॉर्डला जज्जने विचारले की, तो काय धंदा करतो. मॅकॉर्ड म्हणाला, Security Consultant. जज्जने विचारले ' Where ' मॅकॉर्डनी उत्तर दिले : ' सी. आय. ए. '

१६ तारखेला संध्याकाळी वॉशिंग्टनहून एका ऑइल कंपनीच्या खाजगी विमानाने मिचेल, मार्डिन लारू व जेब मॅगरूडर आपल्या कौटुंबिक मंडळींना घेऊन मजा मारण्यासाठी लॉस एंजल्सला गेले होते. त्या ठिकाणी निक्सन निवडणूक मंडळाच्या वतीने दोन महत्त्वाच्या बैठकींची व्यवस्था केली गेली होती. तेथे ते सर्वजण बीव्हेर्ले हिल हॉटेलमध्ये उतरले होते. शनिवारी १७ तारखेला सकाळी ९ वाजता मिचेल खेरीज सर्वजण पोलो लॉजमध्ये चहापाण्यासाठी मजेत बसले होते. वेटरनी जेब मॅगरूडरला हळूच येऊन वर्दी दिली की, त्याला फोन आलेला आहे व तो फोन लिडीचा आहे.

लिडीने टेलिफोनवरून बातमी दिली की, जिम मॅकॉर्डला रात्री ११ वाजता वॉटरगेटवरील डेमोक्रॅटिक पक्षाच्या कार्यालयात पोलिसांनी पकडले.

मॅगरूडर काळा ठिक्कर पडला. त्याच्या डोळ्यापुढे अंधेरी आली. सकाळीच आपण वॉशिंग्टनहून लॉस एंजेल्सला हे कळवण्यासाठीच मुद्दाम आलो असून मॅगरूडरला विवक्षित ठिकाणी भेटण्यासाठी त्याने सांगितले. तो गेला लिडीने सर्व हकीकत त्याच्या कानावर घातली. तो परत आला व लॉसला घेऊन मिचेलकडे गेला. मिचेल आता A. G. नव्हता. क्लॅन्डेन्स्ट हा होता. त्याला ताबडतोब मिचेलनी फोन करावा आणि पकडलेल्या आरोपींना ताबडतोब जामिनावर सोडवून घेण्याची विनंती करावी असे मॅगरूडरने सुचविले. त्याला ते पटले नाही. तो आपल्यावरची जबाबदारी टाळतो असे मिचेलच्या बोलण्यावरून स्पष्ट दिसत होते. त्याने मार्डिनला फोन करण्यास सांगितले. क्लॅन्डेन्स्ट घरी नव्हता. लिडीला परत भेटून त्याने त्याला वॉशिंग्टनला जाऊन क्लॅन्डेन्स्टला भेटून विदान मॅकॉर्डला ताबडतोब जामिनावर सोडवून घेण्याची व्यवस्था करण्यास सांगितले. लिडी निघून गेला.

लॉस एंजल्समधील रात्रीपर्यंतचे कार्यक्रम ठाकठीक चालले होते. मिचेलनी वर्तमानपत्र बातमीदारांना मुलाखत दिली. दुपारी मॅगरूडरने आपल्या कार्यालयात बॉब रेझनेर व रॉब ओडले ह्यांना टेलिफोनवरून ' Gemstone ' ही गुप्त कागदपत्रांची फाईल बाहेर कोठेतरी नेऊन ठेवण्यास सांगितले. दुपारी लिडीचा टेलिफोन आला. क्लॅन्डेन्स्ट ह्या बाबतीत काहीही करावयास तयार नसल्याचे त्याने मॅगरूडरला सांगितले. रात्री मिचेलच्या खोलीत तिघेजण विचारविनिमय करण्यासाठी जमले. तिघेहीजण चिंताग्रस्त व भयभीत झालेले दिसत होते.

त्या १७ जून १९७२ ला त्यांना प्रथम जाणीव झाली की, आपले हात या कामात बरबटलेले आहेत, हे जगाला कळणार आणि सर्व सत्य हकीकत न्यायालयात आली तर आपल्याला तुरुंगवास घडणार !

तेव्हा हे प्रकरण दडपून कसे टाकावयाचे याचा विचार सुरू झाला. हल्डमनचा वॉशिंग्टनहून फोन आला. त्याने मॅगरूडरला परतण्याविषयी सांगितले. मॅगरूडर ताबडतोब निघालाच.

ह्या दिवसापासून पुढे सतत १८ महिने प्रत्येकजण दुसऱ्यापासून तोंड लपवीत होता. हातचे राखून बोलत होता. आपली चामडी कशी बचावता येईल ह्याच्या फिकिरीत होता.

इकडे पाचही आरोपींच्याकरता हंटने जोसेफ रेफर्टी व डग्लस कॅडी हे दोन वकील न्यायालयात उभे केले.

दुसऱ्या दिवशी वॉशिंग्टन पोस्टमध्ये खालील बातमी आली :

' Five men, one of whom is a former employee of CIA, were arristed at 2-30 A. M. yesterday in what authorities have described as an elaborate plot to bug the offices of the democratic National committee here. "

' काल रात्री २॥ वाजता डेमोक्रेटिक पक्षाचे वॉटरगेट बिल्डिंग-मध्ये असलेले कार्यालय पाच दरोडेखोरांनी लुटण्याचा प्रयत्न केला, त्यात एकजण सी. आय. ए. मधील नोकर आहे. '

रविवारी १८ तारखेलाच तपास लागला की, मॅकॉर्ड हा Creep च्या संरक्षण खात्यात काम करीत होता.

वास्तविक काहीही जरूरी नसताना, जॉन मिचेलनी त्याच दिवशी लॉस एंजेल्समधून एक वक्तव्य बाहेर पाडले :

' The person involved is the proprietor of a private Security Agency, who was employed by our committee month ago to assist with the installation of our security system. We want to emphasise that this man and the other people involved are not operating either on our behalf or with our consent. '

रविवारी रात्री आरोपींच्या जवळून जप्त केलेल्या मालाची पोलीस नोंद करून घेऊ लागले. त्यात दोन डायऱ्या होत्या. एकीत हॉवर्ड हंटचा घरचा पत्ता आणि टेलिफोन नंबर आणि दुसऱ्यात व्हाइट-हाऊस आणि W. H. अशी नोंद असून पुढे टेलिफोन नंबर होता. पोलीस अधिक तपास करीत होते.

१९ तारखेला व्हाइट हाऊसमधील न्यायखात्याकडून जाहीर करण्यात आले की, त्यांचे खाते वॉटरगेट प्रकरणाची पूर्ण चौकशी करून काँग्रेसकडे अहवाल लवकरच धाडून देईल. त्याच दिवशी EBI नी वॉटरगेट प्रकरण चौकशीसाठी आपल्याकडे घेतले.

ह्याच दिवशी सुप्रीम कोर्टाचा निकाल लागला की, कोर्टाच्या परवानगीवाचून सरकारला विवक्षित लोकांचे टेलिफोन वायर-टॅप करण्याचा अधिकार नाही. हा निकाल लागायला तीन वर्षे लागली. १३ जून १९६९ ला मिचेलने जाहीरपणे सांगितले होते की, ' Presidental powers permit wire-tapping without court supervision or order. '

त्यानंतर तावडतोब हे प्रकरण न्यायप्रविष्ट झाले होते; पण निकाल लागायला एवढी वर्षे लागली.

२० जूनला लॅरी ओब्रायन, (अध्यक्ष, डेमोक्रेटिक पक्ष) याने निक्सन निवडणूकमंडळावर १ लाख डॉलर्स नुकसान भरपाईचा दावा लावला.

ह्याच दिवशी संध्याकाळी निक्सनने एहरलिचमन व मिचेल ह्यांना टेलिफोन करून सर्व माहिती मिळविली आणि नंतर त्याने FBI नी वॉटरगेट प्रकरणाची चौकशी करू नये, असा हुकूम सी. आय. ए. मार्फत दिला.

हीच निक्सनची सर्वांत मोठी चूक झाली. दरोडा प्रकरण दडपून टाकण्याचे निक्सनच्या मनात आले व तो तशी प्यादी सरकवायला लागला ती ह्या दिवसापासून. वॉटरगेट प्रकरण घडवून आणण्यामध्ये त्याचे हात नसतील कदाचित, पण गुन्हेगारांना पाठीशी घालणे, हे गुन्हा करण्याएवढेच दोषार्ह आहे. समजत असून देखील सत्तेचा मद त्याला स्वस्थ बसून देत नव्हता. तो गुन्हे करण्यास अधिकाधिक प्रवृत्त झाला.

२२ जूनला दिलेल्या मुलाखतीत निक्सन म्हणाला,

' I deny any White House involvement in the break-in and I say that attempted surviallence has no place whatsoever in our electoral process or in our Government Process. '

१ जुलैला मिचेलनी CREEP मधील आपल्या पदाचा राजीनामा दिला. ह्या दिवसापासून वॉशिंग्टन सोडून हंट जो पसार झाला तो त्याचा पत्ताच लागेना. कोर्टाचे त्याला पकडण्याविषयी वॉरंट सुटलेच होते. हंटचा वकील बिटमन ह्यांच्याकडे तपास करता असे कळले की, हंटच्या मित्राने त्याच्याकडे २५,००० डॉलर्स हंटवरची केस लढण्यासाठी धाडून दिलेले होते. बिटमन तसा नावाजलेला वकील होता. मॉर्गन व हार्टसन ह्या वकिलांच्या कंपनीत तो भागीदार होता. चार वर्षांपूर्वी व्हाइट हाऊसचा तो वकील होता व त्याने टीम-स्टार युनियनचा अध्यक्ष जिमी होफा ह्याच्यावर सरकारने लावलेली केस जिंकलेली होती.

१४ जुलैला ह्यू स्लोन निक्सन-निवडणूक-मंडळाचा खजिनदार ह्याने राजीनामा सादर केला आणि तो बाहेर पडला.

७ एप्रिलचा कायदा होण्याच्या सुमारास गल्फ रिसोर्सेस आणि केमिकल कंपनीकडून ८९,००० डॉलर्सचे चार चेक्स (मेक्सिकन बँकेवरील), मिचेलकडे धाडून दिले गेले होते, ते त्याने स्टान्सकडे देऊन टाकले. त्याच दिवशी मिन्नेसोटाला एक व्यापारी DWAYENE ANDREAS याने २५,००० डॉलर्सचा चेक तसाच CREEP ला देणगी म्हणून मध्य अमेरिकेतील रिपब्लिकन पक्षाचा अध्यक्ष डेहेलबर्ग यास दिला होता, तो ह्यू स्लोनकडे येऊन पडला. हे पाचही चेक्स स्लोनने लिडीजवळ दिले व ते सर्व १ लाख १४ हजार डॉलर्सचे चेक्स मिआमीचा बडा धंदेवाईक आणि वॉटरगेट प्रकरणातील दरोडेखोर बर्नार्ड बार्कर ह्याला वटविण्यासाठी लिडीने दिले. बार्करने ते चेक्स आपल्या खात्यात रिपब्लिकन नॅशनल बँकेत टाकले. ते

## वॉटरगेट प्रकरण घडवून आणण्यात त्याचे हात नसतीलही पण....

चेक्स वटल्यावर बार्करने लिडीला १०० डॉलर्सच्या नोटांमध्ये परत दिले. त्याच्यातील २५०० डॉलर्स खर्चाला काढून घेऊन बाकीचे रोख पैसे लिडीने स्लोनला दिले. अमेरिकेत बँका १०० डॉलर्सच्या नोटा ज्या वेळी जमा होतात किंवा दिल्या जातात त्या वेळी त्यांचे नंबर टिपून ठेवतात. पैसे हातात आल्यावर स्लोनने ते आपल्या तिजोरीत ठेवून दिले.

बार्कर १७ जूनला वॉटरगेट प्रकरणात पकडला गेल्यानंतर ह्या चेक्सची निराळीच माहिती बाहेर पडली ती अशी : ज्या व्यक्तीने १५,०००, १८,०००, २४,००० व ३२,००० डॉलर्सचे चेक्स दिले होते ते मॅन्युअल ओगॅरिओ डग्रे–मेक्सिकोचा एक वकील याच्या नावाचे होते. ते चेक्स ह्या वकिलाने पाहिले पण नव्हते. त्या चेक्सच्या मागे त्याच्या सह्या पण नव्हत्या. बार्करनेच त्या भानगडी करून आपल्या खात्यात ते टाकून पैसे काढले आणि निक्सन-निवडणूक-मंडळाचा खजांची ह्यू स्लोन्स ह्याला दिले.

दुसरा २५,००० डॉलर्सचा चेक First Bank & Trust Co. बोकास्टन शाखा, फ्लोरिडा यांनी केनेथ डेहेलबर्ग याच्या नावे लिहिला होता. त्याची खोटी सही करून बार्करने तो वटविला.

१९७२ सालातील जून–जुलै महिना असा धामधुमीचा गेला. वॉटरगेट-प्रकरणाचे निनाद सगळीकडे दुमदुमत होते. अशात २२ ऑगस्टला रिपब्लिकन पक्षाने राष्ट्रपतीच्या निवडणुकीसाठी निक्सनचे नाव सुचविले.

२५ ऑगस्टला मिचेलवर ७ लाख ५० हजार डॉलर्स, त्याने ४ एप्रिलच्या कायद्याचा भंग करून मेक्सिकोमधून ह्या निरनिराळ्या वेळी अमेरिकेत रकमा आणवून SLUSH FUND मध्ये जमा केल्या, त्याबद्दल त्याच्यावर अकरा नोटिसा बजावल्या गेल्या.

अत्यंत सरळ व निर्मळ वर्तनाचा रिपब्लिकन सिनेटर जॉन ओसबोर्न ह्यावेळी लिहितो,

'वॉटरगेट प्रकरणानंतर दिलेल्या पहिल्या मुलाखतीत निक्सनने निरनिराळ्या जमा झालेल्या पैशांविषयी व कार्यालये लुटण्यासंबंधी जे निवेदन केले आहे, त्यावरून दुसऱ्या वेळेला पुन्हा रिपब्लिकन पक्षाने निक्सनचे नाव राष्ट्रपतिपदासाठी सुचविणे हे धोक्याचे ठरणार आहे. त्या पदाचा दुरुपयोग होत असल्याचा स्पष्ट पुरावा दिसत आहे खास.'

ओसबोर्नच्या चेतावणीची कोणीच दखल घेतली नाही, कारण ह्यावेळी निक्सनचीच सगळीकडे चलती होती. उदोउदो चालला होता.

मे १९७२ मध्ये लिडीने स्लोनजवळ जेव्हा पैशाची मागणी केली; त्या वेळी स्लोनने ह्या १ लाख ११ हजार ५०० डॉलर्स नोटांपैकीच नोटा दिल्या व त्याच नोटांपैकी लिडीने बार्कर व इतर चार आरोपींना पैसे दिले. स्लोनने हे काही मुद्दाम केले होते असे नाही, पण तसे घडले. ह्या ठिकाणी गुन्हेगारांच्या गुन्ह्याचे वर्तुळ पूर्ण झाले. कोणालाच निसटणे ह्यातून शक्य नव्हते आणि शेवटी व्हावयाचे तेच झाले.

१० सप्टेंबर १९७२ ला स्टान्सनी लॅरी ओब्रायनवर ५ लाखांचा अब्रुनुकसानीचा दावा लावला.

वॉटरगेट प्रकरण आपल्या अंगावर शेकू नये म्हणून प्रत्येकजण जीवा चा आटापिटा करीत होता. हल्डमन, डीन व एहरलिच ह्यांचा सल्ला घेऊन मिचेलनी २८ जूनला कामबाच वकिलाला लॉस एन्जेल्सहून बोलावून घेऊन त्याच्यामार्फत वॉटरगेटमध्ये अडकलेल्या व्यक्तींच्या नातेवाइकांना पैसे वाटावयाचे ठरविले. कामबाच वकिलाबरोबर त्याचा एक बदमाश दोस्त, टोनी उलासेविट्झ हिल्टन हॉटेलमध्ये स्टान्स व डीनला भेटले. काही पैसे देण्यात आले, पण स्टान्स आणि कामबाच ह्या दोघांनी तेवढ्या त्या महिन्या–दीड महिन्यात २॥ लाख डॉलर्स जमा केले. मिचेलच्या ३॥ लाखांच्या SLUSH फंडावर नजर ठेवून सप्टेंबर महिन्यापर्यंत कामबाच आणि त्याचा जिगरदोस्त, ह्या दोघा बदमाशांनी दीड लाख डॉलर्स स्वतःसाठी मारलेच.

१५ सप्टेंबरला न्यायालयाने हंट, लिडी व इतर पाचजणांवर ८ गुन्ह्यांचे आरोपपत्र ठेवले. निक्सनच्या व्हाइट हाऊसला वा जस्टिस खात्याला तो खटला लढवावयाचा नव्हताच. सर्व आरोपींनी पहिल्याच दिवशी गुन्हा कबूल करावा, असे अगोदरच ठरले होते.

आरोपपत्रे पाहून वर्तमानपत्रांनी नाराजी व्यक्त केली. कारण त्यात मेक्सिकोहून आणलेले पाच चेक्स–१ लाख १४ हजार डॉलर्स आणि स्टान्स-हल्डमनचा 'स्लश फंड' ह्याचा काहीच उल्लेख नव्हता.

रोज वर्तमानपत्रांकडून मारा होत होताच.

एकदाचा ८ नोव्हेंबरला निक्सन राष्ट्रपती म्हणून निवडून आला.

८ डिसेंबरला हंटची पत्नी डोरोथी हंट ही विमान–अपघातात सापडून मरण पावली. तिच्या बॅगेत ३०,००० डॉलर्स होते व ते १०० डॉलर्सच्या नोटांत होते आणि ह्यू स्लोनने हंटला दिलेल्या नोटांपैकी ते होते. ही बातमी वर्तमानपत्रांनी छापली.

८ जानेवारी १९७३ ला जॉन सिरिकाच्या कोर्टात वॉटरगेट खटला उभा राहिला. ज्यूरीची माणसे निवडली गेली. सरकारतर्फे ३ वकील होते. अर्ल सिलबर्ट, सिमूर ग्लॅन्झेर व डोनाल्ड कॅम्पबेल.

बरोबर ११ वाजता अर्ल सिलबर्ट वकिलांनी मूळ खटला काय आहे, हे कोर्टाला समजावून सांगण्यासाठी २ तास घेतले. त्याचे थोडक्यात म्हणणे असे होते की, 'अगदी क्षुद्र लोकांनी केलेला हा अगदी किरकोळ कट असून व्हाइट हाऊसचा किंवा निक्सन–निवडणूक मंडळाचा दूरान्वयाने देखील ह्या कटाशी काहीही संबंध नाही. गॉर्डन लिडी हा ह्या कटाचा सूत्रधार. ह्या व्यक्तीला मियामी येथे भरणाऱ्या अधिवेशनामध्ये काही महत्त्वाची कामगिरी सोपविली होती व त्यासाठी मंडळाकडून पन्नास हजार डॉलर्स त्याला दिले गेले. परंतु त्या पैशाचा वाईट गोष्टी करण्याकडे त्याने उपयोग केला. सरकारतर्फे एकंदर ६० साक्षीदारांच्या जबान्या गुन्हा सिद्ध करण्यासाठी घेतल्या जातील व तेवढा पुरावा गुन्हा सिद्ध करण्यासाठी पुरेसा ठरेल असे मला वाटते.'

दुसऱ्या दिवसापासून रितसर कामकाज सुरू होणार होते.

मियामीहून आलेले आरोपी, त्यांचे नातेवाईक ह्यांची आर्लिंगटन, व्हर्जिनिया येथे स्वतंत्र राहण्याची व्यवस्था करून देण्यात आली होती. हंटचे आरोपींना पुनःपुनः सांगणे होते की, त्यांनी सुरुवातीलाच गुन्हा कबूल करावा. त्यांच्या घरच्या मंडळींना दर महिन्याला एक हजार डॉलर्स धाडण्याची व्यवस्था होईल व शिक्षा लागल्यावर सरकार त्यांना माफी देईल व ते सुटतील.

हंटची आणि आरोपींची गेल्या १२ वर्षांपासूनची ओळख. त्या सर्वांनी मिळून आतापर्यंत असेच गुन्हे केले होते व सर्व पचवून टाकले होते.

तिसऱ्या दिवशी चौघा आरोपींनी गुन्हा कबूल केला. जज्ज सिरिकाने प्रत्येकाला आपल्या समोर बोलावून आणून एकेक तास प्रश्न विचारले.

काही प्रश्नोत्तरें खालीलप्रमाणे होती :

Jubdge : What do you want to explain about one hundred dollar-notes that were floating like coupens ?

Barker : I got the money in the mail in blank envelop.

प्रश्न : तुमच्यापैकी सी. आय. ए. मधे कोणी काम केले आहे का ?

उत्तर : छे ! मुळीच नाही.

प्रश्न : वॉटरगेट बिल्डिंगमधील डेमोक्रेटिक पक्षाच्या कार्यालयावर तुम्ही दरोडा का टाकलात ?

उत्तर : क्यूबा देशातील चालू परिस्थितीमुळे आम्हाला तसे करावे लागले. साम्यवादी झोटिंगशाहीशी आम्हाला सतत असेच झगडावे लागते; कारण त्या विचारसरणीपासून राष्ट्राला धोका आहे.

प्रश्न : डेमोक्रेटिक पक्षाचे कार्यालय आणि साम्यवादी विचारसरणी ह्यांचा काय संबंध ?

उत्तर : ते आम्हाला काही कळत नाही. हंट व बार्कर हे ते सर्व जाणतात. ते सांगतील तसे आम्ही वागतो.

त्या दिवसाचे कामकाज संपले. पुढील तारीख २३ जानेवारी दिली गेली. त्या दिवशी जेब मॅगरूडर, पोर्टर, स्लोन्स व ओडले ह्यांच्या साक्षी होणार होत्या. सरकारतर्फेच्या वकिलांना थातुरमातुर करून काहीतरी प्रश्न विचारण्याचा फार्स करावयाचा होता तो त्यांनी केला. मॅगरूडरची जबानी १० मिनिटांत खलास.

जज्ज सिरिकाने ज्यूरीला दुसऱ्या खोलीत जाऊन बसावयास सांगितले आणि स्लोन्सला ४१ प्रश्न विचारले :

लिडी व मॅकॉर्ड हे दोषी असल्याचे ज्यूरीने सांगितले. त्यांची तुरुंगात रवानगी करण्यात आली. निकाल मात्र राखून ठेवण्यात आला. परंतु १ लाख डॉलर्स जातमुचलक्यावर त्यांना सोडण्याचा हुकूम झाला.

१९ दिवस सिरिकाच्या कोर्टात खटला चालविण्याचा फार्स केला गेला. खरे बाहेर काहीच आले नाही.

'मला असं वाटतं की, सरकारतर्फे किंवा बचाव पक्षातर्फे साक्षीदार स्लोन ह्याला कोणतेच प्रश्न विचारले गेले नाहीत. मी काही प्रश्न स्वतः विचारले, पण त्यातून सत्य बाहेर पडलेच नाही.

'कांग्रेसने चौकशी-समिती नेमलीच आहे आणि न्यायाधीश म्हणून नव्हे तर एक अमेरिकन नागरिक म्हणून त्या समितीपुढे सर्व सत्य गोष्टी बाहेर पडल्या तर चांगले, असे मला वाटते. सिनेटची चौकशी समितीला सर्व साधकबाधक बाबींचा विचार करून, तळापर्यंत जाऊन सत्यशोधन करण्याची आज्ञा झाली आहे, तेव्हा त्या ठिकाणी सत्य बाहेर पडेलच !'

११ जानेवारी १९७३ ला सिनेटमधील बहुसंख्याकांचा प्रतिनिधी माईक मॅन्सफील्ड याने सिनेटमध्ये झालेल्या ठरावान्वये ७६ वर्षांचा सिनेटर सॅम आर्विन ह्यास वॉटरगेट प्रकरणाची व १९७२ सालात झालेली राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीची छाननी करणाऱ्या कमिटीचा अध्यक्ष होण्याची विनंती केली आणि सिनेटर आर्विनने आपली मान्यता कळविली.

सिनेटनी ठराव केला त्यावेळी ७४ सभासद हजर होते व सर्वांनी एकमताने निर्णय दिला. कमिटीचे काम २८ फेब्रुवारी १९७४-पर्यंत संपवलेच पाहिजे, असे बंधन घालण्यात आले व १५ लाख डॉलर्स खर्चाचे अंदाजपत्रक मंजूर झाले.

कमिटीचे सात सभासद असे होते :—

रिपब्लिकन सिनेटर सॅम आर्विन — अध्यक्ष<br>
रिपब्लिकन सिनेटर हॉवर्ड बेकर<br>
रिपब्लिकन सिनेटर एडवर्ड गुर्नी<br>
रिपब्लिकन सिनेटर लोवेल बीकर<br>
डेमोक्रेट सिनेटर हार्मन टालमाज<br>
डेमोक्रेट सिनेटर डॅनियल इनोनी<br>
डेमोक्रेट सिनेटर जोसेफ मोंटोया

न्यू सिनेट ऑफिस बिल्डिंगच्या बेसमेंटमधील मोठ्या व प्रशस्त दिवाणखान्यातून मजबूत पार्टिशन्स टाकून तेथे कामाला सुरुवात झाली. कडक पोलीस बंदोबस्त २४ तास ठेवलेला होता.

अध्यक्ष आर्विनने कमिटीचा चीफ-कौन्सिल म्हणून सॅम्युअल डॅश ह्या प्रख्यात वकिलाची नेमणूक केली. त्याच्या जोडीला फ्रेड थॉपसन, रुफस एडमिनस्टन आणि टेरी लेझनेर हे वकील होते.

कमिटीचे काम शेवटी एवढे वाढले की, कमिटीच्या कार्यालयात ९७ कारकून, २५ वकील, २० अन्वेषक, ८ सल्लागार, ६ वरच्या दर्जाचे अधिकारी, ५१ सेक्रेटरी, २२ संशोधन करून कमिटीपुढे ठेवणारे लेखनिक आणि २२ माणसे कॉम्प्यूटरवर काम करणारी; इतका संच झाला.

कमिटीने अखेरचा अहवाल १२ जुलै १९७४ ला दिला.

जज्ज सिरिकाच्या पुढील वॉटरगेट केस खलास झाली नव्हती. तारखाच पडत होत्या. २३ मार्च १९७३ ला सिरिका हंट, लिडी व मॅकॉर्ड ह्यांना शिक्षा सुनावणार होता. चारच दिवस अगोदर एक महत्त्वाची घटना घडली.

१९ मार्चला हंटने डीनजवळ १ लाख डॉलर्सची मागणी केली. त्याला हे माहीत होते की आपल्याला नक्की शिक्षा होणार, तेव्हा २३ तारखेच्या अगोदरच जास्तीत जास्त पैसे काढून घेतलेले चांगले. त्याने सरळ दम भरला की पैसे जर २३ तारखेच्या आत मिळाले नाहीत तर जज्ज सिरिकापुढे तो सर्व खरी हकीकत सांगून टाकील. केवळ त्या भीतीने डीन निक्सनला भेटला व निक्सनने कामबाच

## निकालाच्या आधी चारच दिवस एक महत्त्वाची घटना घडली....

वकिलामार्फत ७५००० डॉलर्स हंटला दिले. चूप बसण्यासाठी ती लाच होती. ते पैसे देताना कोणालाच कल्पना नव्हती की दैवाची चक्रे उलटी चाललेली आहेत ! हंटला आपण दाबला पण बाकीचे उठणार आहेत त्याचे काय ?

ह्याच १९ तारखेला मॅकॉर्डनी जज्ज सिरिकाला पत्र लिहिले की, 'आपल्यावर व्हाइट हाऊसचे भयंकर दडपण आल्यामुळे आपण गुन्हा केल्याची कबुली दिली. सर्वांनी तेच केले. वास्तविक ह्या गुन्ह्याच्या पाठीमागे बऱ्याच जणांचे हात गुंतलेले आहेत. मी असे कळवितो की मला गुन्हा कबूल नाही. मला खटला चालवावयाचा आहे.'

हे पत्र जज्ज सिरिकांनी २३ मार्चच्या दिवशी भर कोर्टात सरकारी वकिलाला वाचून दाखवले. व्हाइट हाऊसमधील बदमाषांची एकच धावपळ सुरू झाली.

एवढ्यावरच थांबले नाही तर २६ तारखेच्या लॉस एन्जेलस टाइम्स, न्यूयॉर्क-टाइम्स व वॉशिंग्टन पोस्ट ह्या वर्तमानपत्रांत खास खबर मोठाल्या टाईपात पहिल्याच पानावर आली :

'मॅकॉर्डने एरव्हिन समितीपुढे आज सांगून टाकले की, मॅगरूडर व जॉन डीन ह्यांना वॉटरगेट प्रकरणाची सुरुवातीपासूनची माहिती असून त्यांचे हात त्या प्रकरणात गुंतलेले होते ?'

ह्या बातमीने तर व्हाइट-हाऊसला आग लावल्यासारखी झाली. थेट निक्सनपासून ते हल्डमन, एहरलिचमन, मिचेल, मॅगरूडर, डीन, कामबाच, वॉटरफिल्ड, सेग्रेटी, स्टान्स, स्लोन, सर्वजण जागच्या जागी ताबुतासारखे थंड पडले !

२३ तारखेला हंट आणि चार आरोपींना कोर्टात हजर राहायास सांगितले होते, त्याप्रमाणे ते हजर झाले. त्यांच्या देखतच मॅकॉर्डच्या पत्रावर चर्चा झाली.

जज्ज सिरिकाने हंटला ३५ वर्षे व इतर चौघांना ४० वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा दिली. पण निकालपत्रात त्याने लिहून ठेवले

'I don't think that Government wants a pound of flesh out of you. That is of very little benefit to the Society. So, I have told your attorneys that the sentence I will impose on you will depend primerily on whether or not you co-operate absolutely, completely and enterely with the Senate Committee and testify honestly and openly.'

ह्यावेळी निक्सन की-बिस्कायने येथे हवा खायला व भिरभिरलेले डोके थंड करायला गेला होता, तो २७ मार्चला सकाळी गरम डोके घेऊन वॉशिंग्टनला परतला.

२८ मार्चला मॅकॉर्डनी व ३० मार्चला लिडीने आपले म्हणणे जज्ज सिरिकापुढे नोंदवले. ३ एप्रिलला हंट व लिडी यांनी सिनेट कमिटीपुढे सत्य परिस्थिती सांगण्याची कबुली दिली व त्यांना जामिनावर सोडण्याचा हुकूम झाला. परंतु कोर्टाची बेअदबी केल्याचा दुसराच खटला चालू होता. त्यात लिडीला १८ महिन्यांची सजा झाली.

१४ एप्रिल १९७३ ह्या दिवशी डीन आणि मॅगरूडर ह्या दोघांनीही आपापले वकील घेऊन सरकारी वकिलाची गाठभेट घेतली आणि सर्व सत्य परिस्थिती त्यांना निवेदन केली. दोघांनीही निक्सन, हल्डमन, मिचेल व एहरलिचमन १९७१ व १९७२ मध्ये कसकसे वागले ह्याचे संपूर्ण विवेचन केले.

१९ एप्रिलला न्यूयॉर्क टाईम्सने ५-कॉलमी हेडिंग देऊन अर्धा पानभर खालील बातमी छापली.

'Former Attorney General Mitchell and White House Counsel John Dean approved and helped plan of the Watergate-bugging operations, according to President Nixons' former special assistant Jeb Stuart Macgruder.

Mitchell and Dean later arranged to buy the silance of the seven convicted Watergate conspirators.'

५ मे १९७३ ला व ११ मे १९७३ ला जज्ज सिरिकाने हंट, बार्कर, गोंझालेझ, मार्टिनेझ व स्टर्गिस ह्यांना, सिनेट कमिटीपुढे खरी हकीकत सांगण्याचे अभिवचन दिल्यामुळे, जामिनावर मुक्त करण्याचा हुकूम दिला.

१७ मे १९७३ ला आर्विन कमिटीपुढे साक्षी घेण्याचे काम सुरू झाले. १ ऑगस्ट १९७३ ला कॅलिफोर्निया बार असोसिएशनने निक्सन, एहरलिचमन, कामबाच, मार्डिमन, स्ट्रामेन व सेग्रेटी ह्यांना त्यांच्या वकिलीच्या सनदा काढून का घेऊ नयेत म्हणून नोटिसा दिल्या.

१-१०-१९७३ ला एहरलिचमनने ग्रॅन्ड ज्यूरीपुढे सांगून टाकले की, 'President has actively supervised the 'Plumbers' and authorised overt tacties.'

२२ ऑक्टोबर १९७३ ला काँग्रेसपुढे वॉटरगेट प्रकरणावरील ४४ बिले ठेवली गेली व पसार झाली.

खरं म्हणजे वॉटरगेट प्रकरण येथेच संपले, पण ह्या प्रकरणाचा पूर्ण छडा लावण्याला कारणीभूत झाले ते निक्सनच्या टेलिफोन संभाषणाचे काढून ठेवले गेलेले 'टेप्स.'

अमेरिकेच्या राजकारणात ह्या टेप्स प्रकरणामुळे इतक्या गलिच्छ गोष्टी उघडकीस आल्या की, त्याची किळसच वाटावी. निक्सनसारख्या कर्तबगार परंतु शंकेखोर व कपटी व्यक्तीच्या मनाचे हुबेहूब प्रतिबिंब ह्या टेप्समुळेच जगापुढे आले.

हे टेप्सचे प्रकरण होते तरी काय ?

[क्रमशः]

पुस्तके

# रघुनाथाची बखर

## एका वादळी व्यक्तिमत्त्वाचे वेधक चित्रण

अशोक प्रभाकर डांगे

शतकात एखादाच असा माणूस असतो. एखाद्या महान व्यक्तिमत्त्वाच्या सावलीतच तो जन्माला येतो. वाढतो. त्या व्यक्तिमत्त्वाच्या बऱ्याचशा गुणदोषांचा वारसा तो वागवतो आणि स्वतः त्या प्रचंड सावलीखाली खुरडून न जाता, तो प्रकाशाच्या नवनव्या पातळ्या शोधत राहतो. क्वचित आपल्या पित्याहून उंच व्यक्तिमत्त्वाचा होऊन जातो. हा रूपानं बेताचाच असतो. रंगानं काळा, फताडचा नाकाचा असतो. तो बटबटीत चष्म्यात वावरतो. त्याचा चेहरा करडा, भावनाशून्य असतो. ह्या कुरूपपणाची खंत त्याला सदैव जाळत असते. तो शांत असतो. अबोल असतो. काही असलं तरी याचा वारसा बुद्धिवादाचा असतो. ज्ञानाचा तो लोभी असतो. विज्ञाननिष्ठता हाच त्याच्या विचारांचा स्थायीभाव होतो. अंधश्रद्धांचं त्याला वावडं असतं. प्रत्येक बरा–वाईट विचार, व्यक्तिमत्त्व, घटना तो बुद्धीच्या निकषावर पारखून घेतो. तो ज्या समाजात वावरतो तो समाज परंपरावादी असतो. ह्याच समाजाने पोसलेल्या नीतिमत्ता तो लाथाडतो. आंधळ्या श्रद्धा झिडकारून टाकतो आणि प्रगतीचे दरवाजे खडखडावतो. त्याची श्रद्धा असलीच तर विज्ञानावर असते. त्याच्याबरोबर येणाऱ्या ज्ञानावर असते. त्याच्या नीतिमत्ता बेगडी नसतात. आपला जीवनमार्ग तो सहजपणे शोधून काढतो आणि त्यावरच्या कठोर मार्गक्रमणाला सुरुवात देखील करतो. स्त्री–पुरुषसंबंधातले विकृत दुरखे तो बघता बघता टरकावून काढतो. परंपरा नागव्या करून सोडतो. सामाजिक चौकटीत कोंडल्या गेलेल्या नैसर्गिक प्रक्रियांची तो मुक्तता करतो आणि त्याचाच ध्यास घेतो. परिणाम उघडच असतो. संततिनियमनाच्या प्रसाराला बाहेर पडलेल्या ह्या माणसाची तो पुराणमतवादी समाज नाकेबंदी करतो. हे रोकडं सत्य तत्कालीन समाजाला पचण्यासारखं नसतं. स्वाभाविकच अशा समाजातल्या अति कर्मठ घटकांकडून तो घायाळ केला जातो. तरीही तो रोजच्या रोज एकेका खुळचा विचाराला धक्के मारून मारून बहिष्कृत करू पाहतो. त्याची करडी नजर नेहमीच क्षितिजापार लागलेली असते. कालचे संदर्भ तो झटकून टाकतो आणि उद्याच्या अर्थांनी तो झपाटून जातो. भविष्याची चाहूल लागल्यावर तो उद्याच्या नीतिमत्तांचा आजच पुरस्कार करतो. काळाशी एकाकी झुंज घेणारा असा माणूस आपल्या भौतिक जीवनात नेहमी अपयशी ठरला तरी त्यानं पेरलेल्या जाणीवा क्वचित त्याच्याच उतरत्या आयुष्यात किंवा बऱ्याचदा त्याच्या नंतरच्या कालखंडात भरघोस उगवून येतात आणि मग मागच्या पिढ्यांनी उपहासिलेला असा माणूस पुढच्या पिढ्यांच्या संदर्भात द्रष्टा म्हणून संबोधला जातो.अशाच एका प्रगत माणसाचं आयुष्य रंगवणारी 'रघुनाथाची बखर' ही श्री. ज. जोशी यांची दुसरी चरित्रात्मक कादंबरी. सत्यासत्याची गल्लत टाळण्यासाठी ते तिला 'बखर' म्हणत असावेत. गेल्या शतकातल्या ह्या एका द्रष्ट्या पुरुषाच्या जीवनाचा विचार करताना कदाचित ते त्याच्या जीवन-चित्रणावर अन्यायकारक ठरू शकेल. स्त्रीशिक्षणाच्या वेडानं झपाटलेला गोपाळराव जोशी ते 'आनंदी गोपाळ 'मध्ये, तर संततिनियमनाच्या प्रचारात ध्येयवादीपणे हयात घालवणाऱ्या रघुनाथ धोंडो कर्वे 'रघुनाथाची बखर'मध्ये चित्रित करतात. हे दोघेही पुरुष एका अर्थी ज्ञानाचाच प्रसार करू पाहतात. पण गोपाळरावांची उद्दिष्टं मर्यादित तर रघुनाथाची विस्तृत असतात. गोपाळराव विचारांनी नवे तर रघुनाथ धोंडो द्रष्टे असतात. आणि गोपाळरावांच्या बोलण्या-वागण्यात जेवढ्या विसंगती आढळतात तेवढ्याच सुसंगती रघुनाथांच्या बोलण्या-वागण्यातून सापडतात. गोपाळराव हा जितका विक्षिप्त, तापट, कर्मठ, दुराग्रही तितकेच रघुनाथ धोंडो कठोर, शिस्तबद्ध, आग्रही भासतात. दोघांच्याशी स्त्रियांची त्यांच्यामुळे परवड होते. तरी देखील कर्मठ हिंदू स्त्रीप्रमाणे त्या आपल्या पतीचाच मार्ग अनुसरतात. आनंदी गोपाळ ही कादंबरी काहीशी विक्षिप्त तर काहीशी विचारी माणसाची जीवनकथा सांगते तर रघुनाथांची बखर एका प्रखर बुद्धिवादी, विज्ञाननिष्ठ, प्रगतिशील, द्रष्ट्या विचारवंताची शोकांतिका आजच्या समाजापुढे प्रभावीपणे मांडताना दिसते.,

कालचे सुधारक धोंडो केशव कर्वे (अण्णा) त्यांची पुनर्विवाहाची पत्नी, (गोदूबाई) त्यांचा त्याहून सुधारक मुलगा (रघुनाथ), त्याचे ज्ञानाच्या मार्गदर्शक (आप्पा) आणि त्यांनी संभाळलेली त्याची लांबची बहीण (नमू) ह्या चरित्रातल्या महत्त्वाच्या व्यक्ती. ह्या साऱ्याच व्यक्तिरेखा वास्तव जीवनातून उचलल्या आहेत. त्यांच्या प्रत्यक्ष व्यक्तिमत्त्वातले गुणदोष जरी उघड असले तरी ह्या चरित्रात्मक कादंबरीला एकदा 'बखर' म्हटल्यावर त्यांच्या चित्रणातील खरेखोटेपण तपासण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. ही सारीच माणसं वाचकांना लेखकानं रंगवलेल्या स्वरूपातच स्विकारणं भाग पडतं

अबोल पण अंतर्मुख व्यक्तिमत्त्वाचा रघुनाथ, श्री. ज. जोशी अत्यंत समर्थपणे साकारतात. तो विधवा विवाह, स्त्री-शिक्षणाचा पुरस्कार करणाऱ्या अण्णांचा मुलगा आहे. तो विलक्षण विचारी आहे. तरुण वयातच त्याला भेटतात ते खोल व्यक्तिमत्त्वाचे ज्ञानाचे उपासक आप्पा त्याला तेच वाचनाची गोडी लावतात. 'जगातील दारिद्र्य आणि दुःख यांचे मूळ लोकसंख्या वाढीत' शोधणारा माल्थस आणि 'संतती प्रतिबंध केला तर स्त्रीयांच्या जीवनातले अपार कष्ट कमी होतील, आयुर्मान वाढेल, बाल मृत्यू कमी होतील आणि. लोकांच्या सुखसोयीत भर पडेल.' असं प्रतिपादन करणारा डॉ. नॉल्टन त्याला इथेच भेटले. याशिवाय माणसाच्या प्रत्येक विकृतीचं मूळ लैंगीकतेत शोधणाऱ्या फ्रॉइडनं त्याला झपाटून टाकलं. मग त्याचं सारं जीवनच पालटून गेलं.

श्री. ज. नी. 'बखरी'मध्ये रंगवलेलं रघुनाथाचं जीवन अनेक टप्प्यांनी घडत जातं. अण्णांच्या सावलीतलं पूर्वायुष्य. आप्पांच्या

सहवासात निर्माण झालेली ज्ञानाची ओढ, आश्रमातल्याच गंगूबरोबर झालेलं लग्न, मग लैंगीक विषयावरचे लेख, व्याख्यानं, पुस्तकं. समाजस्वास्थ्य मासिकाची स्थापना. गंगूच्या सहकार्यानं काढलेलं संतती नियमन क्लिनीक आणि गंगूची केवीलवाणी अकाली अखेर. ह्या साऱ्यांच्या दरम्यान एलफीस्टनमध्ये गणिताची प्राध्यापकी. उच्च शिक्षणासाठी फ्रान्सची वारी आणि पाद्र्यांच्या कर्मठ विल्सन कॉलेजात नोकरीही रघुनाथ करताना दिसतो. ही सारीच स्थित्यंतरं रघुनाथाच्या अनेक अंगभूत गुणांचं दर्शन नेमक्या शब्दात घडवतात अण्णा इतकीच प्रखर ध्येयनिष्ठा घेऊन निघालेला हा माणूस ह्या साऱ्या जीवनप्रवासात कोठेच वाकत नाही. विल्सन कॉलेजातले अन्यायी पाद्री असोत. पुण्याच्या कर्मठ लोकांनी भरलेला खटला असो, घाणेरडी पत्रं असोत, असभ्य प्रचार असो, दारुण सामाजिक उपेक्षा असो किंवा गंगूचं एकाकीपणे दहन करण्याचा प्रसंग असो. रघुनाथ एका सच्च्या ध्येयवादी व्यक्तीसारखा समस्येला सरळ निर्भयपणे सामोरा जातो. आणि त्यातून आपल्या यशा-अपयशासह पार पडतो. ज्ञानावर त्याची अपरंपार श्रद्धा असते. ही ज्योत आप्पांच पेटवून देतात. नव्या जगाशी नव्या ज्ञानाशी जवळीक साधण्यासाठी तो पॅरीसला जातो. ग्रंथांच्या सान्निध्यातच वावरतो. प्रत्येक विचारांची चिरफाड करतो. आणि म्हणूनच त्याची पत्नी गंगू त्याला 'बुद्धिवादी' म्हणून नेहमी हिणवते. स्वतः उपभोगल्यानंतर दुसऱ्यांना नैतिकता शिकवणारे टॉलस्टॉय, गांधी तो ह्याच प्रखर विचारसरणीमुळे नाकारतो. बकऱ्यांचं मांस चांगलं, तर माणसाचं काय वाईट असले भेदक प्रश्न विचारताना दिसतो. विवाहसंस्थेची चेष्टा करतो. वेश्येला विवाहीतेपेक्षा अधिक श्रेय देतो. रघुनाथाचं बुद्धीवादी मन एकीकडे दुसऱ्यांच्या जीवनातल्या विसंगतीवर अचूक बोट ठेवलं तर दुसरीकडे स्वतः-च्याच आयुष्यात सुसंगतीही प्रस्थापीत करतं आणि म्हणूनच तो टिळक रानडे यांच्यासारख्या प्रस्थापितांच्या वर्तनातल्या विसंगतीवर तुटून पडतो. तसाच स्वतःचं संतती नियमन करून दुसऱ्यांना उदाहरणं घालून देऊ इच्छितो. अर्थात ह्या बाबतीत त्याचं बुद्धिवादी मन एका टोकाला जाऊन विपरीत विचार करताना दिसतं. गंगूला मल होऊ देण्याचा हक्क नाकारताना तो तिच्या लाथाडल्या गेलेल्या भावनांचा किंवा स्त्री म्हणून मिळणाऱ्या नैसर्गिक वरदानाचा विचार करताना दिसत नाही. त्याचं बुद्धिवादी मन तिच्या मृदु भावनांवर कुरघोडी करतं आणि त्याच्यावर कळस म्हणून दुसऱ्यांसाठी म्हणून तो स्वतःला एकही मूल नसताना स्वतःवर शस्त्रक्रीया करून घेऊन तिच्या आशा पुरत्या जमीनदोस्त करून टाकतो. ह्या साऱ्याच प्रकारात त्या सरळ मनाच्या त्या स्त्रीची विलक्षण कोंडी आणि फरफट होताना दिसते. आणि श्री. ज. जोशी तीं समर्थपणे साकारताना दिसतात. रघुनाथ स्त्रियांच्या मुक्त विचारांचा नेहमीच पुरस्कार करतो. ह्या बाबतीत नमू त्याची आदर्श असते. स्त्री-पुरुष संबंधातली बंधनं त्याच्यासारखीच तिलाही मंजूर नसतात. स्वतंत्र जीवन जगण्यासाठी,उपभोगण्यासाठी वरचेवर युरोपचा आसरा घेणाऱ्या नमूचं प्रभावी व्यक्तिचित्र श्री. ज. जोशी आपल्या कादंबरीत रेखाटतात. त्यात रंग भरतात. रघुनाथाला लग्न बंधन मंजूर नसतात. कोणाही स्त्रीला आवडत्या पुरुषाबरोबर उपभोग घेण्याचा स्त्रीचा हक्क तो मान्य करतो आणि त्यातून निर्माण होणारे परीणाम टाळण्यासाठी ती संतती नियमनाचा प्रसार करू पाहातो. रघुनाथाच्या पूर्वायुष्यात त्याला भेटते ती विधवा मथू. नंतर त्याच्या आयुष्यात त्याला एकनिष्ठेनं साथ देणारी गंगू आणि दूर राहूनही त्याच्या विचारांचं प्रतिनिधीत्व करणारी नमू. मनानं काहीशी कर्मठ असणारी त्याची पत्नी, तिला एखाद्या शिक्षकाच्या आवेशानं तो नेहमीच शिकवत राहातो आणि ती शिकतही जाते.

आणि शिकते इतकी की, तिचे नंतरचे प्रखर विचार त्याला देखील क्षणभर चमकवून सोडतात. अर्थात हे सारं नवऱ्यालावरील श्रद्धेपायी घडत जातं. नमू मात्र उपभोगाकडे धावत सुटते आणि अखेर त्याचाही शेवट न सापडल्यानं चाचपडताना दिसते. गंगूचं व्यक्तीमत्व श्रीज अत्यंत समर्थपणे उभारतात. इतकं की, कित्येकदा ते रघुनाथाच्या चित्रणालाही फिक्कट करून सोडतं. गंगूच्या व्यक्तीमत्वातला प्रवाहीपण श्रीज अखेरपर्यंत सांभाळत असले तरी नमूचं व्यक्तिमत्त्व (सुरुवातीला जरी प्रभावी ठरलं तरी) अखेरपर्यंत ते तसंच परिणामकारक राहू शकत नाही. गंगूच्या बाबतीत देखील एका सरळ, साध्या, स्त्रीतला अचानक घडून आलेला बौद्धीक बदल, रघुनाथाबरोबर तिनं त्याच पातळीवर घातलेले वाद खटकतात, न पटणारे वाटतात. रघुनाथाच्या बरोबरच अण्णांचंही व्यक्तिमत्त्व श्रीज विस्तारानं मांडत नाहीत. तरीही रघुनाथाच्या बाबतीत अण्णा पायाभूत ठरतातच हे सत्य नाकारता येत नाही.

रघुनाथ धोंडो हा साऱ्याच हयातभर स्वातंत्र्य चळवळीच्या विरोधी उभा राहतो. नव्या ज्ञानाच्या वाटा इंग्रजांनी मोकळ्या केल्या हेच कारण पुढे करून तो त्यांचं दास्यत्व मान्य करतो. राष्ट्रीय पुढाऱ्यांचा उपहास करतो. अर्थात ही सारीच भूमिका काळाच्या संदर्भात चूक ठरते. ज्ञानाच्या वाटा कधीच बंद होत नसतात. ब्रिटीश नसले तरी थोड्या फार फरकानं ते भारतीय समाजाला उपलब्ध झालंच असतं. श्रीजंची ही कादंबरी केवळ व्यक्तिगत जीवनाच्या चित्रणापुरतीच मर्यादीत राहते. हा साराच काळ प्रखर राजकीय आणि सामाजिक चळवळींनी व्यापून टाकला होता. त्या साऱ्या सामाजिक घटनांचं चित्रण ह्या विलक्षण व्यक्तिमत्त्वाच्या पार्श्वभूमीवर आवश्यक होतं. तसंच खोल चिंतनात्मक जाणिवा व्यक्त करण्यात श्रीजंचे शब्द अपुरे ठरतात आणि त्यामुळेच कित्येकदा रघुनाथाच्या आणि नमूच्या चित्रणांतही तोच तोच सूर जाणवू लागतो.

रघुनाथाची बखर ही एक अतिशय वाचनीय कादंबरी ठरेल. मुख्यतः सेक्स हा गाभा असलेला हा विषय कोठेच किळसवाणा होताना दिसत नाही. उलट त्यासंबंधीचे रोखठोक उल्लेख रघुनाथाच्या प्रखर व्यक्तिमत्त्वाला साजेसेच ठरतात. रघुनाथाची बखर हे चरित्रात्मक कादंबरीच्या क्षेत्रातलं श्रीजंचं पुढचं पाऊल ठरेल. एका वादळी व्यक्तिमत्त्वाचं असं वेधक चित्रण आजच्या आणि उद्याच्याही सामाजिक संदर्भात अत्यंत आवश्यक ठरतं. □

**रघुनाथाची बखर**
श्री. ज. जोशी
मॅजेस्टिक बुकस्टॉल
चाळीस रुपये.

# वाजे पाऊल आपुले

## स्वागतार्ह पुनरुज्जीवन

शिरीष सहस्रबुद्धे

सुख मिळण्यासारखं असलं तरी अंगी लावून न घेणारी माणसं असतात, त्या जातीचे प्राध्यापक भगवंत भुस्कुटे. आपल्याला हृदयविकारानं पक्कं पछाडलं आहे आणि 'आपण थोड्याच दिवसांचे सोबती; तेव्हा आपल्यामागे आपल्या तरुण आणि सुंदर पत्नीचं काय होणार', ही चिंता प्राध्यापकांना अखंड लागलेली. अशा वेळी अच्युत कर्वे हा सौ. सुशीलाबाई भुस्कुटयांचा लहानपणीचा मित्र येऊन टपकतो आणि निराश झालेले प्राध्यापक आपल्यानंतर पत्नीनं त्याच्याशी लग्न करावं असं ठरवूनही मोकळे होतात. त्यांना नेहमी साथ देणारा त्यांचा वकीलमित्र इथं मात्र बिथरतो. शिवाय भुस्कुटयांची हृदयविकाराची शंका चुकीची आहे, हे उघड झाल्यानंतर सुशीलाबाईंना त्यांचीच काहीतरी भानगड असली पाहिजे असा संशय येतो आणि त्या घर सोडून जायला निघतात, वगैरे वगैरे. घुराच्या वेटोळचातनं वेटोळी निघावीत तशा एका गैरसमजानं नाना भानगडी, शंकाकुशंका निघतात आणि शेवटी सर्व सुरळीत.

'वाजे पाऊल आपुले' या श्री. विश्राम बेडेकरलिखित विनोदी नाटकाचं हे कथासूत्र. दहा-बारा वर्षांपूर्वी शेपाऊणशे व्यावसायिक प्रयोग गाजवलेलं हे नाटक त्यानंतर 'करायला सोपं-सुटसुटीत' अशा समजुतीमुळे हौशी रंगभूमीवर बऱ्यापैकी लोकप्रिय होतं. आता मात्र 'नवनीत' या मुंबईच्या नाटचसंस्थेनं या नाटकाचं व्यावसायिकदृष्टचा पुनरुज्जीवन केलं आहे आणि विशेष म्हणजे त्याचं दिग्दर्शन स्वतः श्री. विश्राम बेडेकर यांनीच केलेलं आहे. नाटक सुपरिचित असल्यानं त्याच्या लेखनमूल्याची विशेष चर्चा करण्यात वस्तुतः फारसा अर्थ नाही, ती चर्चा यापूर्वी वेळोवेळी झालेली असेलच. तथापि नाटकाचं नाव मात्र अत्यंत नेटकं, सार्थ व लक्षणीय आहे हे नमूद केलंच पाहिजे. नाटक आणि त्याचं नाव हा मुद्दा हिंदी चित्रपट आणि त्यांची शीर्षकं यांच्या संबंधाइतकाच फालतू, बिनमहत्त्वाचा वाटला, तरी 'वाजे पाऊल' सारखं एखादं नाटक पाहिल्यानंतर अनेक निरर्थक नावं खटकल्याशिवाय राहात नाहीत. गेल्या आठवडचातच याच सदरात 'घरोघरी हीच बोंब' या नाटकाविषयी लिहिताना मी या मुद्द्याला स्पर्श केला होता. 'वाजे पाऊल आपुले', हे शीर्षक, प्रा. भुस्कुटयांच्या फक्त मनात उगीचच वाजणाऱ्या मरणाच्या पावलांना उद्देशून तर आहेच; एका बिनबुडाच्या आणि गैरसमजातून उद्भवलेल्या भीतीचा, आपल्याच मनाच्या खेळामुळे केवढा बागुलबुवा होतो, त्याचं प्रतिनिधित्व तर हे शीर्षक करतंच; पण दुसऱ्या अंकातल्या स्वप्नदृश्यामुळे या शीर्षकाला आणखीही एक अर्थच्छटा प्राप्त होते असं मला वाटतं. या स्वप्नदृश्यात भुस्कुटे पतिपत्नींना, एकमेकांबद्दलच्या संशयामुळे, परस्परांची अस्तित्वातच नसलेली लफडी प्रत्यक्षात दिसतात. आपल्याच मनातल्या निराधार शंकेमुळे आपल्या प्रिय व्यक्तीचं चारित्र्यही संशयास्पद वाटतं, याचंही प्रतिनिधित्व 'वाजे पाऊल आपुले' हे शीर्षक करतं आणि तिसऱ्या अंकात या तथाकथित लफडचांना जे गंभीर स्वरूप प्राप्त होतं, ते लक्षात घेता या शीर्षकाची अचूकता व अर्थपूर्णता प्रकर्षानं जाणवते.

नाटकाची सुरुवात होते ती थेट मूळ विषयापाशीच—हृदयविकाराची लक्षणं—उपाय वगैरेंची शोधाशोध प्रा. भुस्कुटे 'दिव्यौषधिनिघंटू'मध्ये सुरू करतात तिथून. पहिल्या अंकाचा बहुतेक सर्व वेळ भुस्कुटयांची व्यक्तिरेखा ठळक करण्यातच जातो. अच्युत कर्वे आणि भुस्कुटयांचा वकीलमित्र ही दोन पात्रं अर्थात जरूर तो 'रिलीफ' पुरवितातच. अच्युतचा प्रवेश आणि वावर भुस्कुटयांच्या घरात आणि स्वयंपाकघरातही सुरू झाल्याचं दाखवून अंक संपतो.

दुसऱ्या अंकाच्या मध्यापर्यंत एक गोष्ट स्पष्टपणे ध्यानात येते ती अशी की, नाटकातल्या सगळचा प्रमुख व्यक्तिरेखा प्रा. भुस्कुटे आणि त्यांचा हृदयविकार यांच्याभोवती केंद्रित झालेल्या आहेत आणि नाटकात उपकथानकाची काहीच सोय-शक्यता नाही. या नाटकाची गती अत्यंत संथ असल्याची जी सार्वत्रिक तक्रार आहे ती याच कारणामुळे असावी. या सर्वांचा परिणाम म्हणजे दुसऱ्या अंकाच्या उत्तरार्धाच्या आसपास नाटक कंटाळवाणे झाल्यासारखे वाटते. त्यातच भर म्हणून प्राध्यापकांच्या मित्राची व्यक्तिरेखाही या अंकात फारशी प्रभावी ठरू शकत नाही. अर्थात अच्युत या विलंदर आणि कलंदर गृहस्थाला बऱ्यापैकी वाव या अंकात मिळतो आणि तो व चाकांच्या खुर्चीवरून हिंडणारे हृद्रोगी भुस्कुटे हा अंक थोडाफार सावरतात. दुसरा अंक नाटकात तसा मध्यवर्ती महत्त्वाचा आहे. या अंकाच्या प्रारंभी आणि अगदी शेवटी दोन स्फोट होतात. एक प्राध्यापकांच्या आजाराची लपवलेली खातरी सुशीलाबाईंना कळते. आणि दोन : आजार खरा नसल्याचाही सुगावाही सुशीलाबाईंना लागतो. थोडक्यात, क्लायमॅक्सकडे वाटचाल, क्लायमॅक्स, अँन्टिक्लायमॅक्सकडे वाटचाल आणि अँन्टिक्लायमॅक्स, हे सर्व या एकाच अंकात येऊन जातं, आणि तिसऱ्या अंकात शिल्लक उरतो तो फक्त शेवटापर्यंत उताराचा प्रवास (falling action), असं मला वाटतं. मागे उल्लेखिलेली दोनही स्वप्नदृश्यं याच अंकात येऊन जातात. ही दोन्ही दृश्यं कितपत आवश्यक—अपरिहार्य होती आणि ती यापेक्षा अधिक संक्षिप्त व सौम्य चालली नसती काय हे दोन्ही विवाद्य मुद्दे आहेत. अर्थात, नाटकाचा संथ व एकमार्गी प्रवास लक्षात घेता, ती अजीबात वगळणं फारसं स्वागतार्ह ठरलं नसतं, असं माझं मत झालं. काही गमतीदार प्रसंग या अंकात चांगले रंगवले गेले आहेत. सुशीलाबाई जुन्या आठवणी काढत असताना प्राध्यापकांना झोप लागते आणि सुशीलाबाई मात्र हृदय-झटक्याच्या शंकेनं घाबरतात हे एक उदाहरण.

तिसऱ्या अंकाचं स्वरूप बरंचसं जुने

गोंधळ घालवण्याचं आहे. प्रा.च्या वकील-मित्राची व्यक्तिरेखा या अंकात अतिशय इंटरेस्टिंग होते, चांगली उभी राहते. याउलट अच्युत कर्वेची व्यक्तिरेखा, त्याच्या वागण्या-बोलण्याचे अर्थ– उद्देश या अंकात काहीसे संदिग्ध होतात. संदिग्धतेमध्ये (ámbiguity) सौंदर्य कमी असतं असं नव्हे. 'रजनीगंधा' चित्रपटातली दिनेश ठाकूरनं रंगविलेली व्यक्तिरेखा हे संदिग्धतेतील सौंदर्याचं एक उदाहरण. पण ती तरलता इथे नाही; त्यामुळेच कदाचित अच्युत रंगमंचावरून गेल्याचं वाईट वाटत नाही.

लेखन–दिग्दर्शनात काहीसं रेंगाळलेलं हे नाटक प्रथम दर्जाच्या कलावंतांची जोड लाभल्यामुळे चांगलंच उचलून धरलं गेलं आहे. प्रा. भुस्कुटे (दाजी भाटवडेकर) आणि सुशीलाबाई भुस्कुटे (पद्मा चव्हाण) यांना वकील मित्र (दत्ता भट) आणि अच्युत कर्वे (माधव वाटवे) यांची उत्तम साथ लाभली आहे. विलक्षण सहजता हे चौघांच्याही अभिनयाचं प्रमुख वैशिष्ट्य मानता येईल. विशेषतः पद्मा चव्हाण यांच्याबद्दल काही वरं लिहिण्याची संधी त्यांनी फार काळानंतर दिली आहे. त्यांची इतकी अकृत्रिम आणि सौम्य भूमिका मी तरी प्रथमच पाहिली. आपल्या मित्राला आजारातला विरंगुळा म्हणून, त्याच्याच पहिल्या पुण्यतिथीला ठोकण्यासाठी लिहिलेलं भाषण वाचून दाखवणारा वकील, पाचपंचवीस इरसाल शिव्या तोंडात दातांइतक्याच घट्ट बसवलेला अच्युत आणि 'सुशीलेबरोबर सिनेमा पाहताना तिचासुद्धा हात कधी हातात धरला नाही– अंधारात दुसऱ्या कुणाचा तरी हात हातात येईल म्हणून' असं सांगणारा एकपत्नीव्रती प्राध्यापक या तीनही भूमिका दाजी, दत्ता भट, माधव वाटवे यांना शोभून दिसल्या आणि त्यांनीही त्या समजून रंगवल्या. सुहास भालेकर व इतरेजनांची दुय्यम भूमिकांमधली उपयुक्त जोड व सुबक दिग्दर्शन यांचाही उल्लेख केला पाहिजे. नाटकाचं हे पुनरुज्जीवन स्वागतार्ह करण्यात या सर्वांचाच वाटा आहे.

हिंदी चित्रपट

# अदालत

## आसमानसे गिरे और खजूर में अटके !

खरोखरच, पार आभाळातून कोसळलेला माणूस किरकोळ खजुराच्या झाडाला अडकावा तशी काहीशी अवस्था नडियादवाला फॅमिलीच्या 'अदालत' या नव्या चित्रपटाची झाली आहे. अनेक इंग्रजी सिनेमे मध्यंतरानंतरच चालू होतात, तसा हा चित्रपट, म्हटलं तर मध्यंतरापाशीच संपला आहे मध्यंतरानंतर मात्र तो अगदी ठार 'संपला' आहे. म्हणजे असं की मध्यंतरापर्यंत हा चित्रपट अगदी चाकोरीबाहेरचा वाटतो, बराच नाविन्यपूर्ण आणि कलात्मक, अगदी उच्च श्रेणीचासुद्धा वाटतो. किंबहुना तो धंदेवाईक हिंदी चित्रपट वाटतच नाही. मात्र मध्यंतरानंतर तो नुसता धंदेवाईक पिक्चर वाटतो, एवढंच नव्हे तर अनेक धंदेवाईक चित्रांचं मिश्रण आहेसा वाटायला लागतो. अर्थात अस्सल सिनेरसिकाला त्यावेळी चुकलेली पायवाट पुन्हा सापडल्याचा आनंद होत असेल ही बाब अलाहिदा.

तर खेड्यातून पोटासाठी मुंबईला आलेला धर्मा (अमिताभ बच्चन); त्याची पत्नी राधा (चक्क वहिदा रेहमान) आणि बहीण लक्ष्मी या कुटुंबावर शहरातल्या हितशत्रू स्मगलर्सपायी कोसळलेल्या संकटपरंपरेची कहाणी म्हणजेच 'अदालत.' अजितबाबू (अन्वर हुसेन) हा प्रथम त्याला आपल्या गुदामावर नेमतो आणि नंतर पडलेल्या पोलिसांच्या छाप्यात, स्मगल्ड मालाचा धनी म्हणून अडकावून तुरुंगात पाठवतो. मग त्याच्या कुटुंबाची यथास्थित वाताहत वगैरे. अजितचा एक हस्तक मुजित (सुजितकुमार) लक्ष्मीवर अत्याचार करतो, त्यामुळे ती विष पिऊन आत्महत्या करते; वगैरे वगैरे. शेवटी धर्माजी तुरुंगातून सुटतात, आणि आपल्याला दगा देणाऱ्यांच्या पाठीमागे सूडाची आग वगैरे घेऊन लागतात. मग धडधडीत खून–तेही तीनचार. आपल्या वैऱ्यांना नेस्तनाबूत केल्यानंतर धर्मासाहेब स्वतःच बडे स्मगलर बनून राज्य करतात. शेवटी त्यांचा एकुलता एक मुलगा राजू (अमिताभ बच्चन, अर्थातच डबल रोलमध्ये) परदेशाहून शिकून परत येतो, तेव्हा त्याच्यासाठी शेवटचे दोन मुडदे पाडून धर्मामहाराज इन्स्पे. खानच्या गोळीला शरण जातात. अशा या कथानकात नेहमीसारखे ॲक्शनपॅक्ड दणदणीत कोर्टसीन्स पाहायला मिळतील अशी जर कुणाची कल्पना 'अदालत' या नावामुळे झाली असेल, तर ती चुकीची ठरेल. या सिनेमात फक्त एक कोर्टसीन आहे. तोही असा यथातथाच. कारण त्यात आरोपी धर्मा पिंजऱ्यातनं उडी मारून साक्षीदाराला खोटं बोलल्याबद्दल पिटून काढतो. न्यायाधीशही निर्दोषी नायकाला सढळ हातानं शिक्षा ठोठावतात. तेव्हा सिनेमाच्या नावात अभिप्रेत असलेली अदालत म्हणजे दस्तुरखुद्द धर्माजीचं मन. या मनाचा कौल घेऊनच ते कायदा हाती घेतात आणि खलनायक टोळीचा जीवघेणा सूड उगवतात. मध्यंतरापर्यंत कथानक अतिशय वेगानं धावतं आणि सूडचक्र पूर्ण होतं. मध्यंतरानंतर मात्र चित्राची गती मंदावते. एक तर धर्माच्या स्वभावात आमूलाग्र बदल झालेला आहे. पूर्वीचा चित्याची चपळता असणारा धर्मा संपून एक थंड, उलट्या काळजाचं, हिशेबी गुन्हेगार व्यक्तिमत्त्व साकार झालेलं आहे. हा बदल लेखकदिग्दर्शकांनी उत्तम नोंदवला असला तरी त्यामुळे चित्रपट स्मगलिंगच्या मळलेल्या–रुळलेल्या राजमार्गावर येतो आणि शेवटाबद्दलचं औत्सुक्य संपतं. मध्यंतरापूर्वीचा भाग मात्र विलक्षण प्रामाणिकपणानं आणि व्यावसायिक तडजोड / सौदे-

बाजी कमीत कमी ठेवून पेश केल्याबद्दल दिग्दर्शक नरेंद्र बेदींना द्यावेत तितके धन्यवाद थोडेच. एक तर धर्माची व्यक्तिरेखा—रांगडा, फटकळ, बडबड्या, इमानदार, लाघवी, सरळ, साधाभोळा आणि सिंहाच्या काळजाचा हा देहाती—अत्यंत वारकाईनं आणि आकर्षक तपशिलासह उभी केलेली आहे आणि दुसरं, देहाती वातावरणही तितक्याच खूबसुरतीनं पेश केलेलं आहे. मध्यंतरापर्यंत जवळ जवळ सर्व पात्रांची भाषा कटाक्षानं बोली हिंदी (बहुधा भोजपुरी थाटाची हिंदी) राखली आहे. चित्रपटाच्या बाह्यचित्रणाची स्थळं—locations—अतिशय सुयोग्य आणि छायाचित्रण सुखद आहे आणि त्यांच्या निवडीमागचा चोखंदळपणा मुद्दाम उल्लेख करावा असा निश्चित आहे. गीते—पार्श्वसंगीत, कल्याणजी—आनंदजींचं असूनही श्रवणीय नक्कीच आहे. 'हमको ऐसा वैसा ना समझो' हे मुकेशच्या आवाजातलं गाणं विशेष उल्लेखनीय. मध्यंतरानंतर मात्र नीतूसिंग आणि धाकटे अमिताभ अवतरतात आणि चित्रपट इष्कप्यार, द्वंद्वगीतं, हॅपी बर्थ डे, स्मगलरांच्या कारवाया, पाटर्या, माफक भावनात्मक ताणतणाव, प्रेमिकांचा आईबापप्रणीत विरह व पुनर्मीलन, या आणि अशा नेहमीच्या रुळांवरून जाऊ लागतो.

कलाकारांमध्ये अग्रक्रम मिळेल तो अर्थातच अमिताभला—अर्थात धर्माच्या भूमिकेतील—त्याच्या चालू चलनी नाण्याच्या थोडं वेगळं असं हे काम होतं. कारंजासारख्या उसळत्या उत्साहातला देहाती धर्मा आणि मनानं थकलेला नि शरीरानं पिकलेला स्मगलर धर्मा ही दोन टोकांची व्यक्तिमत्त्वं एकाच भूमिकेत एकामागोमाग समर्थपणे प्रक्षेपित होताना दिसतात ती अमिताभच्या अभिनयनैपुण्यामुळेच. वहिदा रेहमानच्या वाट्याला तुलनेनं बरीचशी दुय्यम भूमिका आली असली तरी आरंभीच्या ठसकेबाज आणि नंतरच्या प्रौढ, गंभीर, वत्सल राधेच्या भूमिकेत या श्रेष्ठ अभिनेत्रीनं छान रंग भरला आहे. लक्ष्मीचं काम करणाऱ्या नवोदित नटीचाही उल्लेख जरूर करायला हवा. नीतूसिंगनं आपली sex doll ची प्रतिमाच पुढं चालू ठेवली आहे. तिच्या भूमिकेतच तिला त्या पलीकडे वाव नाही. तिचा जोडीदार शोभावा अशा उथळपणानंच अमिताभनं राजूची भूमिका वठवली आहे.

दिग्दर्शक नरेंद्र बेदी यांनी अनेक तरल परिणाम कौतुकास्पद साधले. आपल्या वहिणीचं लग्न कल्पनेनं गीताद्वारे रंगविणारा धर्मा तिच्या विरहाच्या जाणिवेनं डोळे गाळतो तो प्रसंग हे याचं एक चांगलं उदाहरण. पण यापेक्षाही लेखक-दिग्दर्शकांना मानलं पाहिजे ते अशासाठी की, एक सूडकथा यांनी त्यातल्या हिंस्र सूडभावनेची उग्रभीषणता कायम ठेवून धाडसानं सादर केली. 'धाडसानं' असंच म्हणतो, कारण एरवी चित्राचा नायक सहज चार—सहा खून केवळ जुन्या सूडापायी पाडतो, हे दृश्य आपल्याकडे तसं दुर्मिळच. त्यात अहिंसा, मजबूरी, पश्चात्ताप असलं काही तरी पाणी मिसळून पावन करून घ्यायची वृत्तीच जास्त. अर्थात धर्माची ही अदालत फोल असल्याची तितक्याच इमानदारीत शेवटी इन्स्पे. खानकडून सिद्ध केलंय, हेही रास्तच. या मंडळींचं आणखी अभिनंदन केलं पाहिजे ते या सूडकथेचा 'बारूद' (होय, तोच तो जगप्रवासवाला.) होऊ न दिल्याबद्दल ! □


## दहा दर्जेदार स्वस्त कादंबऱ्या

कोहिमा / केशव केळकर / डेमी ९६ / ३—०० 
बाबर / प्र. ना. शेणई / डेमी ८६ / ३—०० 
अंधाराचे अश्रू / हिदायतखान / डेमी १३२ / ३—०० 
प्रतीक्षा / प्रभाकर पेंढारकर / डेमी १०६ / ३—०० 
काळोख आणि किरण / ल. ग. जोग / डेमी ८८ / ३—०० 
प्रतिष्ठा / अनंत मनोहर / डेमी ८० / ३—०० 
'मे' तील सात दिवस / नऊभाऊ लिमये / डेमी १२८ / ३—०० 
अंतरपट / अ. ह. लिमये / क्राउन १४० / ३—०० 
जीवनसंगीत / ना. सी. फडके / क्राउन १९४ / ३—०० 
परशुरामाची सावली / रवींद्र पिंगे / बारावा डेमी / १३८ / ४—००

### विश्वकर्मा साहित्यालय

२०३५ / २ सदाशिव पेठ, 
टिळक पथ, पुणे ४११ ०३० दूरध्वनी : ४१२०९

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

५।२।७७ ते ११।२।७७

### लोकसभेची आगामी निवडणूक व उमेदवारांची निवड

मंगळ हा सत्तेचा कारक ग्रह असून रवी हा राजकारणाचा कारक ग्रह आहे. राजकीय स्पर्धेतून व गटातूनच उमेदवारांची निवड होत असते. तिकिटे मिळतात ती याच दृष्टिकोनातून. रवी, मंगळ हे दोन्ही ग्रह यावेळी भारताच्या मकर राशीत आहेत. खुद्द पंतप्रधान इंदिरा गांधी यादेखील मकर राशीच्याच आहेत. यावेळी उमेदवारांच्या याद्या देखील बऱ्याच प्रमाणात बाहेर पडल्या असतील. मकर राशीच्या भारताच्या पंतप्रधान याही मकर राशीच्याच असल्यामुळे त्या आपल्या मताची, आपल्या गटाच्या लोकांना जास्त तिकिटे देऊन संसदेत हा गट समर्थ करण्याचा प्रयत्न करतील. त्याचप्रमाणे जे लोक त्यांना नको आहेत ते बाहेर काढण्याचा प्रयत्न होईल यात शंकाच नको. रवी-मंगळ इंदिराजींचे अधिकार व संघटनात्मक सामर्थ्य वाढवणार आहेत. अनेकांच्या मनात यशवंतरावांबद्दल प्रश्न निर्माण झाला आहे. पण यशवंतरावांशिवाय केंद्रिय मंत्रिमंडळाला पूर्तता नाही. त्यांना साडेसाती आहे, पण त्यांचा मकर देखील सध्या प्रबळ आहे. महाराष्ट्रात यशवंतराववादी माणसे अधिक निवडली जातील. पुण्यात निकराची लढाई होईल.

---

### मेष : नोकरीत बढती

चंद्र-बुधाचा नवपंचम योग असताना आज आठवडा सुरू होत आहे. राशिस्वामी मंगळ मकर राशीत उच्चपदी आहे. रवी तेथेच आहे. इतकी छान ग्रहांची अनुकूलता गेल्या कित्येक दिवसांत लाभली नव्हती. धंद्याच्या, उद्योगांच्या व नोकरीच्या दृष्टीने फार छान असे हे ग्रहमान आहे. नोकरीतील अनेक दिवस उराशी बाळगलेल्या आशा-आकांक्षा सफळ होतील. नोकरीत बढती मिळेल. नोकरी खाजगी असो की सरकारी असो, राजकारणात तुमची प्रतिष्ठा वाढणार आहे. महत्त्व प्राप्त होणार आहे. धंद्यातील अंदाज अचूक ठरतील. भांडवल मिळेल. बेकारांनी एखादा उद्योग चालू करावा. त्यांना यश येईल. तुमच्यापैकी एखादा भाग्यवान लॉटरीच्या वा रेसच्या बक्षिसाचा धनी होईल. शुभ दिनांक ७–९.

**महिलांना :** नोकरीत बढती मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** स्पर्धेत मोठे यश पदरात पडेल.

### वृषभ : यशाचे वरदान

भाग्यस्थानी मंगळ व रवी आहे तर आज आठवड्याची सुरुवात सिंह राशीतील चंद्राने होत आहे. फार अनुकूल असे हे ग्रहमान आहे. प्रामुख्याने जुने तंटेबखेडे तडजोडीने पण बरेचसे तुमच्या बाजूने निकाली निघून तुमच्या डोक्यावर असलेली टांगती तलवार दूर होईल. नोकरीचे प्रयत्न फलदायी होतील. बेकारांना नोकरीत सामावून घेतले जाईल. ज्यांच्या नोकऱ्या कायम नसतील त्यांच्या नोकऱ्या कायम होतील. कापड व्यपारी अधिक नफा मिळवितील. नवीन धंदा सुरू करावयास हरकत नाही. व्यापार सुधारेल. कौटुंबिक स्वास्थ्य आणि आनंद मिळेल. भाऊबंदातील मतभेद असतील तर ते मिटतील. तुमच्यापैकी ज्यांचा लग्नाचा विचार असेल त्यांनी तो काही काळ पुढे ढकलावा. शुभ दिनांक ५–७.

**महिलांना :** शैक्षणिक संधी मिळेल. पैसे हाती येतील.

**विद्यार्थ्यांना :** बौद्धिक यशाबद्दल कौतुक होईल.

### मिथुन : अनपेक्षित लाभ

तुमची रास बौद्धिकदृष्ट्या श्रेष्ठ असून कार्यतत्पर आहे. अनेक योजना आखून त्या कार्यक्षमतेने राबविण्यात तुमचा हातखंडा आहे. यावेळी तुमच्या या प्रकारच्या यशाची सारी सूत्रे गुरू व रवी-मंगळ यांच्या हाती आहे. आठवे रवी-मंगळ थोडे जपूनच वागावयास लावणार आहेत. प्रामुख्याने वाहन हाकणाऱ्यांनी व ज्यांचा विस्तवाशी संबंध आहे त्यांनी काळजी घेतली पाहिजे. पण एवढी प्रतिकूलता सोडली तर तुमच्यापैकी कुणी एखादा भाग्यवान 'गरिबाचा' 'श्रीमंत' होण्यासारखा हा काळ आहे. रेस, लॉटरी, व्यापारात प्रचंड नफा असे काहीही घडू शकेल. नवीन वाहन खरेदी करू शकाल. धंद्याची परिस्थिती खूप चांगली होईल. नोकरीत तुमचा चांगला जम बसेल. बेकारांना शुभ काळ. शुभ दिनांक ५–८.

**महिलांना :** माहेरची संपत्ती अगर मदत मिळेल. नोकरीस ठीक.

**विद्यार्थ्यांना :** सोयी–सवलती मिळतील. कौटुंबिक सुख मिळेल.

### कर्क : सामर्थ्य वाढेल

राशीत शनी व समोरच रवी-मंगळ आहेत. रवी-मंगळाचा हा प्रतियोग शनीबरोबर झाला असला तरी तेवढ्याने घाबरून जाण्यासारखे मुळीच काही नाही. उलट तुमच्या बाबतीत हे समर्थ ग्रह एवढे अनुकूल फळ देणार आहेत की, तुमचे सामर्थ्य वाढेल. तुमचे वर्चस्व निर्माण होईल. तुमचे नोकरीतील स्थान बदलून जाईल. ते उंचावेल. तुम्ही 'अधिकारी' व्हाल. तुमच्या कार्यक्षमतेचा प्रत्यय येईल. वरिष्ठांवर प्रभाव पडेल. धंद्याची परिस्थिती समाधानकारक राहील. तुमच्यापैकी जो कोणी विवाहाचा प्रयत्न करीत असतील ते विवाहबद्ध होतील किंवा त्यांचा विवाह ठरेल. स्थावराचे तंटे तुमच्या बाजूने निकाली निघतील. प्रकृतिमान ठीक राहील. घरात उत्साहाचे वातावरण निर्माण होईल. तीर्थयात्रा व प्रवास घडेल. शुभ दिनांक ६–८.

**महिलांना :** नोकरीच्या दृष्टीने शुभ घटना घडतील.

**विद्यार्थ्यांना :** लेखन–वाङमयात लक्ष घाला. यश मिळेल.

**सिंह : प्रगतीकडे वाटचाल**

सिंह राशीच्या शत्रुस्थानी मकर रास असून, तेथे रवी–मंगळ आहेत. रवी मकर राशीत आल्यावर संक्रमण घडवतो व मंगळ या राशीत सामर्थ्यवान बनतो. हे दोन्ही ग्रह म्हणूनच तुम्हाला उपकारक होणार आहेत. तुम्ही राजकारणात वावरत असाल तर गुप्त विरोधकांना धडा शिकवण्याइतके राजकीय कौशल्य तुम्हाला प्राप्त होणार आहे. शनी बारावा असला तरी तो तुम्हाला अपायकारक होणार नाही. एरवी सर्वसामान्य लोकांच्या दृष्टीने हा आठवडा प्रगतीचाच जाईल. नोकरीची स्थिती समाधानकारक राहील. हाती घ्याल ते काम पुरे होईल. वरिष्ठांच्या मर्जीचा प्रसाद मिळेल. पगारवाढ होईल. लेखक म्हणून कीर्ती मिळेल. प्रवासास हा आठवडा उत्तम आहे. काहीतरी मनाजोगे घडू शकेल. हाती अधिकाराचे दोर येतील. तब्येत उत्साही राहील. घरगुती वातावरण समाधानकारक राहील विवाहेच्छूंचे विवाह जमून पार पडतील. शुभ दिनांक ७–८.

**महिलांना :** नोकरीत व सार्वजनिक कामात मान मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** तुम्ही कौतुकाचे व शावासकीचे धनी व्हाल.

**कन्या : थोडी अनुकूलता**

पंचमस्थानी असलेल्या रवी–मंगळाच्या हाती यावेळी तुमच्या कल्याणाची सारी सूत्रे आहेत. मकर ही दिलदार राशी पंचमस्थानी असून, मंगळ तेथे सामर्थ्यवान आहे. त्यामुळे यावेळी तुमच्या आशाआकांक्षांची बऱ्याच प्रमाणात पूर्ती व्हावी. वरिष्ठांच्या मर्जीने तुमच्या मागण्यांचा सहानुभूतिपूर्वक विचार व्हावा. नोकरीत साधारण अनुकूलता आहे. उद्योगात नवे तंत्र वापरा व योजनाबद्ध काम करा. आर्थिक बाजू थोडीफार सुधारेल. अडचणींवर मात करण्यात यश मिळेल. प्रवासाला उपकारक आहे कौटुंबिक स्वास्थ्य मिळेल. मुलांच्या कौतुकाचा आनंद मिळेल. पत्रव्यवहार उपकारक ठरेल. शुभ दिनांक ५–७.

**महिलांना :** एखाद्या स्वतंत्र उद्योगाची सुरुवात करा.

**विद्यार्थ्यांना :** उत्साह व आनंद मिळेल.

**तूळ : नोकरीत सन्मान**

सुखस्थान हे मानसिक सुख देणारे व उद्योगधंदा साकार करणारे स्थान आहे. तेथे जे ग्रह असतील ते मानसिक सुखाला उपकारक असतातच असे नाही. तुमची सध्या अशीच स्थिती आहे. रवी–मंगळ हे तसे तुम्हाला 'सुखाचा मूलमंत्र' देतीलच असे समजू नका. मनात काही ना काही शंकाकुशंका, काळजी घर करून राहील. मात्र प्रत्यक्षात तसे प्रतिकूल काहीच घडणार नाही. नोकरीत मात्र तुमचा सन्मान होईल. मान वाढेल. अधिकार वाढतील. उत्पन्नात भर पडेल. घराच्या जागेचा प्रश्न सुटेल. खूप दिवस मनात असलेला प्रवासाचा बेत तडीस जाईल. वृद्धांचा आशीर्वाद मिळेल. राजकारणातील उच्चपदस्थ व्यक्तींचा परिचय होईल. पैशाची स्थिती सुधारेल. शुभ दिनांक ७–९.

**महिलांना :** विवाहाचा प्रश्न सुटेल. संसारात समाधान राहील.

**विद्यार्थ्यांना :** कोणतेही नवे धाडस यशस्वी होईल.

**वृश्चिक : उपकारक**

हा आठवडा छान आहे. इतके अनुकूल ग्रह एकत्र असे गेल्या कित्येक दिवसांत आले नव्हते. रवी–मंगळ तुमच्याकडून बरेच काही घडवणार आहेत. धाडस, कर्तृत्व व कार्यक्षमता हे तुमचे खास गुण यावेळी प्रकर्षाने चमकणार आहेत. नोकरी असो की धंदा असो, नव्या क्षेत्रात–नव्या दालनात प्रवेश मिळून अंगभूत सुप्त गुणांना वाव मिळणार आहे. नोकरीत नवे काम मिळेल. कर्तृत्वाचा प्रकाश पडेल. मालक किंवा वरिष्ठ अधिकारी तुमच्यावर खूष राहतील. एखादी महत्त्वाची जबाबदारी अंगावर पडेल. धंदा कोणताही करा, यश तुमच्याभोवती वाटचाल करीत येईल. आर्थिक प्राप्ती चांगली होईल. शेती, व्यापार सुधारेल. फक्त पैशाचा वापर काळजीपूर्वक करा. शुभ दिनांक ८–९.

**महिलांना :** माहेरवास घडेल. जुनी प्रेमाची माणसे भेटतील.

**विद्यार्थ्यांना :** बुद्धिमत्तेचा प्रभाव पडेल.

**धनू : हितकारक घटना**

पाचवा गुरू, दुसरा रवी-मंगळ असे सामर्थ्यसंपन्न ग्रह यावेळी तुमच्या बाजूने आहेत. तुम्ही कोणत्याही क्षेत्रात काम करीत असा, तुमचे वर्चस्व वाढणार आहे. काही तरी महत्त्वाची हितकारक घटना तुमच्याबाबतीत घडणार आहे. नोकरीत काही तरी महत्त्वाचे घडेल. तुमचे अधिकार वाढतील. कदाचित कामात देखील उपकारक असा बदल होईल. आर्थिक परिस्थिती बऱ्याच प्रमाणात सुधारेल. तुमच्यापैकी ज्यांची लग्ने व्हावयाची असतील त्यांची लग्ने ठरतील. संसारात आनंददायक वातावरण निर्माण होईल. प्रवासाचा बेत सफल होईल. तुमच्याबद्दल प्रेम व आपुलकी वाढेल. जिथे तुमची गरज नव्हती तेथे तुमची गरज निर्माण होणार आहे. तब्येतीची काळजी दूर होईल. मन प्रसन्न राहील. शुभ दिनांक ९–१०.

**महिलांना :** संसारात सुखाचे व आनंदाचे वातावरण राहील.

**विद्यार्थ्यांना :** परीक्षेत यश मिळेल.


## पांढऱ्या डागावर मोफत इलाज

पांढरे डाग बरे करण्यात आमच्या उपचाराने मोठी ख्याती मिळविली आहे. उपचार सुरू झाले की सुधारणा दिसून येईल. रोगाच्या तपशिलासह लिहा. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

BHARAT AYURVEDASHRAM ( M ) P. O. KATRI SARAI ( GAYA )

**मकर : यश मिळेल**

राशीत रवी व उच्चीचा मंगळ असताना मकर राशीच्या व्यक्तींनी आता कुरकुर करण्यात अर्थ नाही. सामर्थ्य, कर्तृत्व व कौशल्य यांची देणगीच तुम्हाला या ग्रहांच्या कृपेने मिळालेली आहे. त्याचा पुरेपूर उपयोग करून घ्या. यावेळेचे ग्रहमान इतके छान आहे की, कोणत्याही क्षेत्रात प्रचंड यश मिळाल्याशिवाय राहणार नाही. कोणत्याही क्षेत्रात तुमच्या महत्त्वाकांक्षा सफळ झाल्याखेरीज राहणार नाहीत. तुम्ही राजकारणात असाल तर आगामी लोकसभा निवडणुकीत तुम्हाला तिकीट मिळाल्याशिवाय राहणार नाही. नोकरीत मागील अन्याय दूर होऊन पगारवाढ, प्रमोशन असे काही तरी मिळेल. वरिष्ठांच्या मर्जीचा प्रत्यय येईल. प्रवासाला हा आठवडा अनुकूल आहे. शुभ दिनांक ५–७–८.

**महिलांना** : सुखस्थानातील गुरू मनस्वास्थ्य पुरेसे देणार नाही.

**विद्यार्थ्यांना** : प्रयत्नपूर्वक केलेल्या श्रमाचे फल मिळेल.

**कुंभ : सावधगिरी बाळगा**

कुंभ राशीच्या व्यक्ती धूर्त व डावपेचात नेहमीच यशस्वी होणाऱ्या असतात. पण यावेळी रवी व मंगळ हे दोन्ही ग्रह सारखे आहेत. त्यांचेकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. कारण राजकारण व सत्ता हे दोन गुण तुमच्या कर्तृत्वाचे आधारस्तंभ असून, त्याचे कारक ग्रहच व्ययस्थानी आहेत. तरी पण तुमच्याबाबतीत उपेक्षा करून चालणार नाही, हे तुमच्या वरिष्ठांच्या लक्षात येईल. कुणी डावपेच लढवीत असतील तर ते फलदायी होणार नाहीत. नोकरीत तुमचे स्थान उंचावेलच. वरिष्ठांना तुमचे हक्क तुम्हाला बहाल करावेच लागतील. बेकारांना अजून काही काळ वाट पाहावी लागणार आहे. विवाहेच्छूंना ‘ हिरवा कंदील ’ मिळेल. शुभ दिनांक ६–९.

**महिलांना** : नोकरीत वरिष्ठ दर्जा मिळेल.

**विद्यार्थ्यांना** : काही तरी हितकारक घडेल.


**मीन : पैशाचे वरदान**

राशिस्वामी गुरू दुसरा म्हणजे धनस्थानी व रवी-मंगळासारखे ग्रह लाभस्थानी ही एक महत्त्वपूर्ण अशी घटना आहे. यावेळी तुमच्या बाबतीत कुबेराची कृपा तुम्हावर होणार आहे. त्याचा लाभ तुम्ही घ्या. दैवाची कृपा असली तरी हातपाय हलवलेच पाहिजेत. नाही तरी ‘ आळशावर गंगा ’ आल्यासारखे होईल. तात्पर्य, या वेळी रेस, लॉटरीपासून तुमचा भाग्योदय होऊ लागेल. चालू नोकरीत बरेच काही पदरात पडणार आहे. तुम्ही लेखक वा पत्रव्यवसायी असाल तर तुमचे लेखन लोकप्रिय होणार असून त्यापासून पैसादेखील मिळणार आहे. तुमचा ग्रंथ प्रसिद्ध होऊ शकेल. उच्च व्यक्तींबरोबर संबंध राहतील. शुभ दिनांक ७–९.

**महिलांना** : नोकरीत बढती मिळेल.

**विद्यार्थ्यांना** : यावेळी परीक्षेत प्रचंड यश पदरात पडणार आहे. ☐

**प्रसिद्ध झाले !**



लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी
१९४८-४९

**लेखक : पु. ल. इनामदार**

**मूल्य : वीस रुपये । राजहंस प्रकाशन, पुणे ३०**